समृद्ध विचार, उत्कट अनुभव,
सूक्ष्म अवलोकन
या तिन्हींच्या सुंदर मिलाफातून
साकारतो आकर्षक निबंध

सं. ठाणे.

भाग -१(इयत्ता ५ वी, ६ वी, ७ वी)

लेखनवसा निबंधाचा

पन्नास निबंध, पाच कल्पनाविस्तार, पत्रलेखन, मुद्यावरुन गोष्ट आणि परिच्छेद लेखन शिवाय सरावाकरिता भरपूर विषयांची सूची

REFBK-0026569

डॉ.ललिता गुप्ते

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठा

ाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासि
ल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्र
णी भरावी लागले.

OCT 1992

NOV 1992

JG 1997

संदर्भ
निबंध
उत्तर
दक्षिण
मध्य



लेखनवसा निबंधाचा : भाग - १

(इ. ५ वी ते ७ वी साठी)

डॉ. ललिता गुप्ते

एम. ए., एम. एड, पीएच. डी., रा. पंडित, साहित्यरत्न.

पर्यवेक्षिका, न्यू. इंग्लिश स्कूल, टि. रोड, पुणे.



REFBK-0026569

उन्मेष प्रकाशन

उन्मेष प्रकाशन (६५)

लेखनवसा निबंधाचा : भाग -१
(इ. ५ वी ते ७ वी साठी)

प्रकाशक - मुद्रक :
मेधा राजहंस
उन्मेष प्रकाशन
२६, पर्वती
पुणे ४११ ००९

© डॉ. ललिता गुप्ते
४८९ अ / २ 'गजानन प्रसाद'
व्होल्गा हॉटेलच्या माडीवर,
लक्ष्मीनारायण थिएटरसमोर,
स्वारगेट, पुणे ९

किंमत ५० रुपये

प्रथमावृत्ती :
जानेवारी १९९२

मुखपृष्ठ
धनंजय सस्तकर

टाइपसेटिंग :
प्रमोद प्रिंटर्स
प्रमोद वि. बापट
११२०, सदाशिव पेठ, पुणे ३०

मुद्रणस्थळ :
स्मिता प्रिंटर्स
प्रमोद वि. बापट
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ, पुणे ३०

ऋणनिर्देश

मराठी, हिंदी या भाषांचे अध्यापन करताना विशेषत्वानं निबंधवजा प्रश्नांचं मार्गदर्शन, अध्यापन करताना वर्षानुवर्षं, वेळोवेळी माझ्या विद्यार्थ्यांनी मला पुढील प्रश्न मोठ्या धिटाईने विचारले. निबंध म्हणजे नेमकं काय? तुम्हाला विचार कसे सुचतात? विषय वाचल्यावर नेमके मुद्दे झटकन् कसे काढावयाचे? परिच्छेद का व कसे पाडावयाचे? योग्य शब्द कसे निवडावयाचे? कुठल्या निबंधात कुठले सुविचार-वाक्प्रचार-काव्यपंक्ती इत्यादींचा वापर करावयाचा हे कसं ओळखायचं? निबंधाची सुरुवात वेगवेगळी असावी म्हणजे काय? निबंध पाल्हाळिक न लिहिता नेमका लिहावयाचा म्हणजे काय करायला हवं? निबंधाचा शेवट कसा करायला हवा? कल्पना कशा सुचतात? कल्पनाविस्तार कसा करावयाचा? काय केलं म्हणजे आम्हालाही चांगले निबंध लिहिता येतील? या आणि अशा प्रकारच्या प्रश्नांची उत्तरं देताना मीही नकळत खूप शिकले. म्हणून जिज्ञासा बाळगून प्रश्नांची सरबत्ती करत शिकू पाहणाऱ्या मुलांनी मला सहजस्फूर्तपणे दाद दिली, लिहिण्याची प्रेरणा दिली, प्रयोग करून पाहण्यासाठी उमेद दिली, संधी दिली असं मी अभिमानपूर्वक म्हणू शकते. आकलन-अभिव्यक्ती प्रभावी व्हावी, निबंधलेखनाच्या या दालनात विद्यार्थ्यांना आत्मविश्वासानं रमता-रेंगाळता यावं या हेतूनं लेखणी हाती धरलीय! म्हणूनच ही कलाकृती, हा वसा खेड्यात, गावांत, शहरांत, महानगरात-शाळाशाळांतून शिकणाऱ्या असंख्य विद्यार्थ्यांसाठी दिला आहे. त्यांच्यासाठी लिहिलेले पुस्तक त्यांनाच स्वयंअध्ययनासाठी सादर समर्पित.

– डॉ. ललिता गुप्ते

माझ्या काही छोट्या विद्यार्थिमित्रांनी मला लेखनाच्या कामी मदत केली. (१) गणेश नथु जाधव (५ वी अ), (२) रोहित जोशी (६ वी अ), (३) सुधीर टक्के (७ वी अ), (४) अनंत शेंड्ये (९ वी अ), (५) नंदन कुलकर्णी (९ वी अ), (६) संजय क्षीरसागर (९ वी अ), (७) जयंत खांबेकर (९ वी अ), (८) कुमार खांबेकर.

वर उल्लेखिलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर, पद्धती शिकवल्यानंतर बांधेसूद निबंध लिहिण्याचा तुम्हा छोट्यांसाठी प्रयत्न केला.

मनोगत

गेली तीस वर्षं अध्ययन-अध्यापनाच्या निमित्ताने मला भाषेच्या आवडत्या प्रांतांत अधिक काळ रमता, रेंगाळताना रसिकेतनं गोडी चाखत मनमुराद आनंद लुटायला मिळालाय. भाषेच्या अध्ययनातून भावनिक विकास साधू शकतो आणि जाणीवपूर्वक केलेल्या अध्यापनातून शिक्षकाला विद्यार्थ्यांना उत्कट अनुभव देत विकसित करता येतं, याचा प्रत्यक्षानुभव घेण्याचं भाग्यही मला लाभलंय. गेली काही वर्षं ५ वी, ६ वीला मराठी शिकवताना मी वेगवेगळे प्रयोग करून पाहिले आहेत, थोडाफार अनुभव गाठी बांधला आहे. त्यामुळे मला वेळोवेळी प्रकर्षानं जाणवलं आहे की, मुलांचं लेखन कौशल्यपूर्ण रीतीने, विशिष्ट कसब वापरून सुधारायला हवं, फुलवायला हवं. मुलांचं आकलन आणि त्यामुळं होणारी विशिष्ट प्रतिक्रिया, अभिव्यक्ती यावर त्यांच्या आशयघन, सुस्पष्ट, आकर्षक लेखनाची भिस्त अवलंबून असते. भाषेमध्ये कस लागण्यासाठी, दर्जा वाढविण्यासाठी अनुच्छेद लेखन, निबंधलेखन, पत्रलेखन, कल्पनाविस्तार, रसग्रहण, सारलेखन, मुद्द्यांवरून गोष्ट इत्यादी लेखनप्रकारांचा श्रीगणेशा त्यांच्याकडून प्रथम गिरवून, घटवून घ्यायला हवा, त्यांनी (कंटाळा न करता) सातत्याने यासाठी प्रयत्न करायला हवा. असं जर झालं नाही तर मुलं केवळ कारकुनी काम करत सगळे एकाच पद्धतीनं, रटाळपणे, साचेबंद आणि एकाच प्रकारचे तेच तेच कंटाळवाणे निबंध उतरवत राहतील. मुलांनी पुस्तकात पाहून किंवा दुसऱ्या मुलाच्या वहीत पाहून निबंध लिहिले, तर यातून काही साधू शकणार नाही असंही एक अनुभवी शिक्षिका म्हणून मला हल्ली प्रकर्षानं वाटायला लागलंय !

म्हणूनच मुलांनी स्वतः विचार करावा, मुद्दे शोधावेत, अनुभवांच्या

पोतडीतून, जवळच्या शब्द - सुविचार - सुभाषिते - म्हणी - वाक्प्रचार यांच्या साठ्यातून, साधर्म्य असणाऱ्या घटना-प्रसंगातून योग्य निवड करत कल्पकतेचा वापर करून सहजसुंदर निबंध लिहिण्यासाठी प्रयत्नाला लागावे. सातत्याने सराव करत निबंधलेखनात तरबेज व्हावे, चांगले निबंध लिहून शाबासकी मिळवावी आणि मुख्य म्हणजे त्यांना या लेखनानुभवातून आनंद मिळावा— या सद्हेतूने हा सारा प्रपंच मांडलाय ! मुलांनी यांतील निबंध पुनःपुन्हा वाचावेत, दिलेले आडाखे, ठोकताळे, कानमंत्र, इशारे, सूचना सारे स्वतः अजमावून पाहत धडाक्याने, नेमाने निबंध (विविध विषयांवरील) लिहायला सुरुवात करावी, म्हणजे त्यांचा आत्मविश्वास वाढेल, लिखाणात नेमकेपणा येईल, हस्ताक्षर सुधारेल, लिहिण्याची गती वाढेल. या साऱ्या फायद्यांबरोबरच भाषेच्या परीक्षेत निबंधांच्या प्रश्नांमध्ये (निबंधवजा-आकलन-अभिव्यक्ती) अधिकाधिक गुण मिळवता येतील. हे पुस्तक पालकांना आणि शिक्षकांनाही मार्गदर्शनपर ठरू शकेल. निबंधवजा प्रश्नांचं अध्यापन करताना शिक्षकांना योग्य दिशा मिळेल, तर पालकांना या पुस्तकाच्या मदतीनं मुलांना अभ्यासात, लेखनसरावात अपेक्षित मदत सुयोग्य रीतीने करता येईल.

विद्यार्थिमित्रांनो, या पुस्तकाच्या रूपाने दिलेला वसा श्रद्धेनं स्वीकारा, लेखनाचं व्रत नेमानं आचरा आणि भरपूर फायदा पदरात पाडून घ्या. पूर्वी म्हणत त्याप्रमाणे 'उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही,' असं मनोमनी म्हणत लेखणी सरसावत कामात लागा, जोमाने लिहायला लागा. लक्षात ठेवा, 'केल्याने होत आहे रे, आधि केलेचि पाहिजे.'

*

अनुक्रम

■ **भाग १** ९ ते ३२

(१) निबंध म्हणजे
(२) निबंध लिहिण्यापूर्वी
(३) विविधांगी लेखनप्रकार
(४) निबंधप्रकार
(५) हा वसा घ्यायलाच हवा !
(६) यशासाठी कानमंत्र

■ **भाग २– लेखनाचा शुभारंभ** ३३ ते ४६

(१) अनुच्छेद लेखन
(२) आकलन
(३) कल्पनाविस्तार

■ **भाग ३– निबंध लेखन (विविधांगी विषय)** ४७ ते १००

(१) माझी आई.
(२) नको तो उन्हाळा !
(३) मी पक्षी झालो तर !
(४) पुण्यातील गणेशोत्सव.
(५) आमचं पुणं.
(६) लोकमान्य टिळक.
(७) पक्षी माझे गुरू
(८) मी कचराकुंडी बोलतेय !
(९) आमचा दूधवाला : रामूभैय्या.
(१०) सूर्योदय.
(११) निसर्गाचा प्रकोप.
(१२) कष्टांचे महत्त्व.
(१३) गुढीपाडवा.

(१४) आठवड्याचा बाजार.
(१५) अशी झाली माझी फजिती.
(१६) यंत्र शाप की वरदान !
(१७) राष्ट्रीय सण असे साजरे करूया.
(१८) जीवनात खेळांचे महत्त्व.
(१९) रांगा ! रांगा ! रांगा !
(२०) पळा रे पळा !
(२१) निर्झर व्हा
(२२) वीज जाते तेव्हा !
(२३) माझा मित्र.
(२४) मी गिरणी बोलतेय !
(२५) चिमणीपासुनि शिकुनि घेऊ.
(२६) कटलेला पतंग बोलू लागला.
(२७) मी एक खोपटं !
(२८) मोडक्या छत्रीचे आत्मवृत्त.
(२९) माझे आवडते शिक्षक.
(३०) आमची सहल.
(३१) मी पाऊलवाट बोलतीय !
(३२) आमचे शेजारी.
(३३) निसर्ग माझा सखा !
(३४) माझा आवडता पक्षी.
(३५) थवे फुलपाखरांचे.
(३६) मी कचराकुंडी बोलतेय ! (विद्यार्थ्यांचे लेख)
(३७) आला कार्तिक !
(३८) दैनंदिनीचे एक पान.
(३९) जय स्वावलंबन.
(४०) मी एक श्रमिक.
(४१) असा न्यारा श्रावण.
(४२) वृक्ष खरे संत.

(४३) व्रतवैकल्ये आणि आम्ही.

मुद्दे वाचा आणि लिहून पाहा–

(१) माझे आजोबा
(२) जय स्वावलंबन
(३) दैनंदिनीचं एक पान
(४) माझा पक्षीमित्र
(५) निसर्ग माझा सखा
(६) माझं आवडतं वर्तमानपत्र
(७) यंत्र शाप की वरदान
(८) आकाशी मेघच नसते तर !
(९) क्रिकेटची बॅट बोलू लागली
(१०) माझ्या जीवनातला अविस्मरणीय प्रसंग
(११) आमचा दूधवाला
(१२) आवडता नेता : लोकमान्य टिळक
(१३) पडका किल्ला बोलू लागला
(१४) आमची सहल
(१५) बसच्या रांगेत एक तास
(१६) माझा आवडता उत्सव

■ **भाग ४** **१०१ ते १२८**

(१) पत्रलेखन
(२) कथालेखन, मुद्द्यांवरून गोष्ट
(३) शीर्षकावरून गोष्ट

परिशिष्ट

विषयसूची

*

भाग -१

निबंध म्हणजे–

आपल्या भाषाज्ञानाची खरी कसोटी म्हणजे निबंधलेखन. कुठल्याही भाषेच्या पेपरात निबंधलेखनाचा प्रश्न अनिवार्य असतो. दिलेल्या विषयांपैकी आपल्या आवडीचा विषय निवडून मनातले विचार-मुद्देसूद मांडणी करून सोप्या, सहज भाषेत, नेमक्या शब्दात विशिष्ट हेतूने आपण कलात्मक रीतीने मांडतो, त्याला 'निबंध' म्हणतात. असा लिहिलेला निबंध वाचणाऱ्याला विचार करायला लावतो, बुद्धीला खाद्य देतो, कल्पनांना, विचारांना चालना देतो आणि मुख्य म्हणजे भावनांना, संवेदनांना प्रकट व्हायला वाव देतो. विषय छोटा पण आशय मोठा असेल, तर त्याला आपण लघुनिबंध म्हणतो. सन्मित्राप्रमाणे हितगुज करणारा निबंध हा गुजगोष्टीसारखा असतो, तर ललित निबंधातून उणिवा हळुवारपणे सांगितल्या जातात. सुख-दुःख मोकळेपणाने सांगितले जाते. निबंध लिहिणारा आणि निबंध वाचणारा दोघांनाही निखळ आनंद मिळणं हे उत्तम निबंधाचं खास गमक आहे. स्वतःला सुचलेले विचार, स्वतःच्या भाषेत मांडणं म्हणजे निबंध.

जात्यावर बसलं की ओवी आठवते, पाण्यात पडल्याशिवाय पोहण्याची कला साधणार नाही, चालायला सुरुवात केल्याखेरीज पावलांना गती येणार नाही, यत्न केल्याशिवाय ध्येयसिद्धी होणार नाही हे जसं अनेकांना अनुभवातून पटेल, जाणवेल तसंच निबंध लिहिण्यासाठी लेखणी उचलली, नेमाने सरावाचा परिपाठ सुरू केला तरच आपल्याला निबंधलेखन छानपणे, समर्थपणे जमू

शकेल असं तुम्हाला स्वानुभवानं वाटू शकेल. निबंध म्हणजे एका विशिष्ट विषयासंबंधी मुद्देसूद, सलग विचार आकर्षक रीतीनं प्रभावी शैलीत, सहजसोप्या भाषेत शब्दबद्ध केलेला खास लेखनप्रकार. यात मुद्द्यानुसार परिच्छेद पाडून कौशल्याने केलेली शब्दगुंफण अधिक महत्त्वाची ! विचारपूर्वक लिहिलेला निबंध वाचणाऱ्याच्या मनात विचारांची आवर्तनं निर्माण करतो.

निबंधात पुढील गोष्टींना अधिक महत्त्वं असते.

निबंध

नि– निरीक्षणशक्ती, नियमितता, निवडक्षमता.

बं– बंधन (वेळ, मुद्दे, शब्दसंख्या, आकार मर्यादा)

ध– धनिकता– ज्ञान, अनुभव, विचार, कल्पना.

निबंधलेखन म्हणजे नुसते विचार खरडणं अगर इतरांचं पाहत खर्डेघाशी करणं नव्हे. निबंध ही विचारपूर्वक केलेली लेखनकृती आहे. परीक्षेच्या पेपरात दिलेल्या विषयांपैकी कोणत्याही विषयावर ऐनवेळी २०-२५ ओळी लिहिणं हे सहजसोपं नसलं, तरी नेमाने लेखनवसा घेतला असल्यास विद्यार्थ्याला सहजसाध्य मात्र निश्चितच वाटू शकेल. दिलेल्या विषयांपैकी सुयोग्य विषयाची निवड करणं, विषयानुषंगानं मुद्दे सुचणं, ज्ञान, अनुभव, विचार यांच्या साठवणीतून आवश्यक ते आठवून जुळणी करत संकलन करणं आणि क्रमाक्रमानं सलग विचार योग्य शब्दात गुंफणं हे सारं निबंधलेखनात अंतर्भूत असतं. निबंध प्रकारावरून त्याचा आकार, मर्यादा, शब्दसंख्या आपल्याला ठरवायला हवी. मुद्देसूद मांडणी करताना वेळेचं भान असायला हवं. निबंधात आपण मुद्दे ध्यानात घेऊन परिच्छेद पाडायला हवेत. पाठ्यपुस्तकावर आधारित असे निबंधांचे विषय असले, तरीही त्याआधारे केलेले लेखन हे मात्र एक प्रकारे स्वतंत्र असते. दिलेला विषय फुलवण्यासाठी पूर्वानुभव, घटना-प्रसंग, सुविचार-सुभाषितांची पखरण आणि ठोस विचार आपल्याला उपयोगी पडतात. या लेखनप्रकारात नावीन्य यावे म्हणून प्रारंभ, मध्य, अंत याकडे अधिक लक्ष द्यावे लागते. निबंधात आत्माविष्काराला, भावप्रकटीकरणाला खूप वाव असतो. साहित्यातला हा ललित लेखनप्रकार आहे. ज्ञान, अनुभव, विचार यांच्या त्रिवेणी मिलाफातून दिलेल्या विषयावर सहजसुंदर निबंध लिहिणं ही एक कला आहे.

निबंधलेखन शास्त्रही आहे आणि कलाही ! निबंधात अचूक निवड (दिलेल्या विषयांतून एक) ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. व्यक्ती तितक्या प्रकृती या न्यायाने प्रत्येकाची ज्ञानकक्षा, विचारांची पद्धती, मनाची बैठक, लिहिण्याची धाटणी वेगवेगळी असते. पांडित्यामुळे निबंध बोजड होतो, पाल्हाळामुळे कंटाळवाणा, नीरस होतो, तर साचेबंद लिखाणामुळे तो नकोसा होतो. खरा निबंध निखळ आनंद देतो, विचारांना दिशा देतो, रसिकतेला वाव देतो, कल्पकतेला खाद्य देतो. असा निबंध लिहावासा सर्वांनाच वाटत असतो, पण त्या दृष्टीने प्रांजल प्रयत्न करणारे मोजकेच असतात.

थोडक्यात, निबंध भारून टाकणारा, परिणामकारक, मतांना पुष्टी देणारा, नीटनेटका, पद्धतशीर, आकर्षक, सहजसुंदर, कलात्मक, विचारप्रवर्तक, सारगर्भ, आटोपशीर, बांधेसूद लेखनप्रकार आहे. फाफटपसारा— विस्कळीतपणा टाळून नेमका, नेटका निबंध सरावाने तुम्हा-आम्हाला नक्कीच लिहिता येईल.

लक्षात ठेवा— निबंध म्हणजे—

१. कलात्मक लेखनप्रकार.

२. दिलेल्या विषयावर केलेले सहेतुक लेखन.

३. मुद्देसूद मांडणी.

४. सलग विचारांची गुंफण.

५. माहिती संकलन

६. सहजसुंदर आविष्कार.

७. विचार, मत, भावभावना प्रकटीकरण.

८. परिच्छेद पाडून केलेले सुसूत्र लेखन.

९. प्रारंभ, मध्य, अन्त असा लेखनप्रवास.

१०. ज्ञान, अनुभव, कल्पना यांचा त्रिवेणी संगम.

११. सहजसोप्या पण अलंकारिक भाषेत, आकर्षक शैलीत लिहिलेला साहित्यप्रकार.

१२. बांधेसूद विवेचन.

१३. विचारप्रवर्तक, प्रेरक लेखन.

१४. विषयानुरूप केलेली सुयोग्य, सुबद्ध आटोपशीर मांडणी.

१५. विशिष्ट विषयावर केलेले नेमके, नेटके लेखन.

१६. विचारमंथनातून स्फुरलेले लेखन.

१७. सन्मित्राप्रमाणे केलेले हितगुज.

वेगवेगळ्या विषयांवर भरपूर विचार करा, अनुभव, घटना, प्रसंग तपासून पहा, भरपूर वाचा, टाचण करा, टिपणे काढा, सुविचार, सुभाषिते वेचून पाठ करा, शब्दसंपत्ती वाढवा, हस्ताक्षर घटवा, भाषाशुद्धीकडे लक्ष द्या, निरीक्षणशक्ती वाढवा, ज्ञानेंद्रियांचा उपयोग करा, रसग्रहण शिका आणि मग नेमाने प्रथम छोटे परिच्छेद आणि मग विविध विषयांवर निबंध लिहायला सुरुवात करा. लिहिता-लिहिता ही कला हस्तगत करा.

*


निबंध लिहिण्यापूर्वी...

तुमच्या-आमच्या लिखाणाचे, भाषेचे, लेखनशैलीचे, रचनेचे, मांडणीचे, निवेदनाचे खरे कौशल्य निबंधलेखनात जणू पणाला लागते. म्हणून निबंधलेखनाकडे दुर्लक्ष न करता बारकाईने जाणीवपूर्वक लक्ष द्यायला हवे. लिहिण्याचा आळस, उदासीनता, निबंधलेखनाबद्दल नावड, गैरसमज, मनात उगाचच निर्माण झालेली भीती, धसका, अनास्था, लिहिण्याच्या सवयीचा अभाव, विचार-कल्पना-शब्दसंपत्ती यांचा अभाव या आणि अशा अनेक कारणांमुळे विद्यार्थी निबंधलेखनापासून चार हात दूर राहतात. त्यांना निबंधलेखन म्हणजे कटकट, त्रास, वैताग वाटतो. निबंधाचा विषय दिला की, मुलं गप्प होतात, हवालदिल होतात, डोकं खाजवत आढ्याकडे पाहत, बराच वेळ पेनशी खेळत बसतात, लिहिण्यापेक्षा जास्त वेळ खोडतच बसतात. मुलांना यासंबंधी विचारलं तर त्यांच्या बोलक्या प्रतिक्रिया पुढीलप्रमाणे असतात—

१. काय लिहू ? काहीच आठवत नाही.
२. विचार मनात येत नाहीत.
३. लिहायला सुचत नाही.
४. मुद्दे कसे शोधावयाचे ?
५. सुरुवात कशी करावयाची ?
६. शेवटी काय लिहावयाचे ?
७. आकर्षक शैलीत कसं मांडायचं ?

८. कल्पनाच सुचत नाही.

निबंध लिहिताना सुरुवातीला अशी स्थिती तुम्हा छोट्यांप्रमाणे सराव नसला, तर आम्हा मोठ्यांचीही होते बरं का ! म्हणून गोंधळून जायचं, घाबरायचं नाही बरं का ! प्रयत्न केले की सारे जमेल, जमायलाच हवे असे मनाला बजावत लिहायला सुरुवात केली पाहिजे. उत्तम निबंध लिहिता आले पाहिजेत, असं वाटत असेल तर तुम्ही विद्यार्थ्यांनी निबंधलेखनासाठी भरपूर पूर्वतयारी केली पाहिजे. पूर्वतयारी चांगली झाली की, निबंधलेखनाची आवड निर्माण होईल. सरावाने आत्मविश्वास वाढेल, गोडी निर्माण होईल, लिहिणे जमायला लागेल. चांगले लिहिता येऊन शाबासकी मिळेल, उत्साह-उमेद वाढेल. निबंधात भरपूर गुण मिळावेत, आपला निबंध वाचनीय व्हावा असे मनापासून वाटत असेल, तर भरपूर पूर्वतयारी करायला हवी खरं ना ! निबंध लिहिण्यापूर्वी काय काय करायला हवं ते म्हणूनच जाणून घ्या. वाचा, विचार करा, कृतीत उतरवा.



१.निबंधाबद्दल गोडी, आवड निर्माण होऊ द्या.

२.मानसिक तयारी.

३.लेखनसराव.

४.सूक्ष्म अवलोकन.

५.डोळे, कान उघडे.

६.अनुभव घेण्यासाठी खुले मन.

७.विचारांना चालना द्या.

८.कल्पनाशक्ती वाढवा.

९.जिज्ञासेने घटना, प्रसंग, अनुभव तपासा, अभ्यासा.

१०.लक्षपूर्वक ऐका.

११.मन लावून वाचा.

१२.मनन, चिंतनाची सवय लावा.

१३.सुविचार, म्हणी, वाक्प्रचार, विविध भाषांतील सुभाषिते, शब्द या साऱ्यांचा संग्रह करा, भरपूर पाठांतर करा.

१४.चांगल्या विचारांची, गोष्टींची साठवण करून योग्यवेळी आठवण्याचा सराव करा.

१५.पद्धतशीर लेखन करा.

१६.चौफेर वाचन करा.

१७.बहुश्रुत व्हा.

१८.स्मरणात ठेवा, लिहून पाहा.

१९.विविधांगी अनुभव वेचा.

२०.निसर्गाशी जवळीक साधा.

२१.जाणून घ्या, समजून घ्या.

२२.अवधान हवे, एकाग्रता हवी,

२३.पाहिलेल्या गोष्टी, घडलेले प्रसंग-घटना. आलेले अनुभव, पाहिलेली दृष्ये यांचे वर्णन करण्याचा, निवेदनातून, संभाषणातून दुसऱ्यांना सांगण्याचा प्रयत्न करा.

२४. प्रचार-प्रसार माध्यमांतून मिळणारे अनुभव वेचा.

२५. ज्ञानेंद्रिये सतत परजत रहा, उपयोगात आणा.

२६. वेगवेगळे विषय वाचून मुद्दे आठवा, त्यांचा क्रम लावा.

२७. अनुभव आठवा, पडताळून पहा.

या पूर्वतयारीमुळे तुमचा आत्मविश्वास वाढेल. तुमची भाषा तयार होईल, तुम्हाला रचनाकौशल्य जमायला लागेल, मुद्दे आठवतील, सुसंगत विचार मांडायला जमेल आणि चांगले, आकर्षक, दर्जेदार निबंध तुम्हालाही लिहिता येतील. कुठल्याही विषयावर मुद्देसूद, पद्धतशीर, सलग, सुसंगत आणि आकर्षक-प्रभावी स्वरूपात केलेले लेखन म्हणजे निबंधलेखन, हे तुम्हाला सरावाने, अभ्यासाने कळेल आणि हळूहळू तसे लिहायला जमेलही !

*

विविधांगी लेखन प्रकार

कुठल्याही लेखनप्रकारात आकलनक्षमता आणि अभिव्यक्तीकौशल्य दोन्हींची नितांत आवश्यकता असते. हे साधण्यासाठी पुढील टप्पे, पायऱ्या यांचा सराव व्हायला हवा.

१. सूक्ष्म अवलोकन– कुठल्याही घटना-प्रसंगाकडे, भोवतीच्या जगाकडे, आसपास वावरणाऱ्या माणसांकडे, त्यांच्या प्रतिक्रियांकडे आपण जाणीवपूर्वक बघायला शिकलं पाहिजे. यात डोळसपणा, निरीक्षणातले बारकावे, सखोलता, अभ्यास हे सारे अभिप्रेत आहे. बारकाईने केलेल्या पाहणीमुळे अनुभवविश्व समृद्ध होते. मनुष्यस्वभावातले बारकावे टिपता येतात.

२. मनन चिंतन– आपल्यासमोर हरघडी जे जे घडते, आपल्याला जे अनुभवावे लागते, आपल्याला जे दिसते, जाणवते ज्या परिस्थितीतून आपल्याला जावे लागते, त्या साऱ्यांतले बारकावे टिपून आपण साठवण करायला हवी, त्यानंतर या साऱ्यांचे मनन-चिंतन करून योग्य-अयोग्य, उचित-अनुचित, अर्थपूर्ण-निरर्थक यातला भेद जाणून घ्यायला हवा. मनन-चिंतनामुळे आडाखे-ठोकताळे बांधता येतात, अनुभव पारखता येतात. विचारांना चालना मिळते.

३. आकलन– एखाद्या गोष्टीचे आकलन होणे म्हणजे त्या गोष्टीची जाणीव होणे, विषयातला बारकावा कळणे, परिपूर्ण माहिती होणे, परिस्थितीचे वास्तव ज्ञान होणे, तारतम्य ओळखून वागण्यासाठी दिशा मिळणे, सखोल ज्ञान मिळणे.

४. समीक्षण, परीक्षण यांच्या बळावर विषयाचे आकलन पक्के होते. समीक्षण-परीक्षणामुळे नकळत चुका, दोष, अडचणी समजून येतात, ते सारे दूर व्हावे.म्हणून निखळ परीक्षण होणे अगत्याचे आहे.

५. या साऱ्या वाटचालीनंतर होणारी अभिव्यक्ती ही अधिक सुस्पष्ट, नेमकी, नेटकी, अचूक, सुयोग्य होऊ शकते. ग्रहण-स्मरण आणि शेवटी अभिव्यक्ती यामुळे विचारांना निश्चित दिशा मिळते, मतांना परिपुष्टी मिळते. आपले विचार, आपली मते परिपक्व होतात, सुयोग्य होतात. 'अंतरी असे जे स्वभावे बाहेर येतसे' या न्यायाने अभिव्यक्ती सहजस्फूर्त, निर्दोष, निश्चित स्वरूपाची, निखळ आणि वाचणाऱ्याच्या मनावर इष्ट परिणाम करणारी अशी होऊ शकते. ही अभिव्यक्ती शब्दबद्ध करताना सरावासाठी काही लेखनप्रकार आपण शिकतो. सरावामुळे आत्मविश्वास वाढतो. लिखाणात नेमकेपणा येतो. निबंधलेखनाचा मूळ पाया त्यामुळे घातला जातो, म्हणूनच हे लेखनप्रकार तुम्ही शिकले पाहिजेत, अभ्यासले पाहिजेत. परीक्षेत आकलन-अभिव्यक्तीसाठी निबंधवजा प्रश्न जवळजवळ ५०-५५ गुणांचे असतात. हे लेखनप्रकार पुढील होत :

१. अनुच्छेद लेखन

२. आकलन

३. कथालेखन– मुद्द्यांवरून गोष्ट, शीर्षकावरून गोष्ट.

४. संवाद, संभाषण

५. सारलेखन (८ वी, ९ वी, १० वी)

६. अनुवाद (हिंदी, इंग्लिश भाषांच्या संदर्भात)

७. पत्रलेखन

८. कल्पनाविस्तार, रसग्रहण

मुलांनो, पाठ्यपुस्तकातील पाठांचा अभ्यास करताना पुढील गोष्टी आवर्जून करा.

१. पाठ्यपुस्तकातील परिच्छेद निवडा.

२. परिच्छेद पुन्हा पुन्हा वाचा.

३. त्यातील मुख्य मुद्दा, विचार शोधा.

४. तो विचार किंवा मुद्दा तुमच्या शब्दांत मांडण्याचा प्रयत्न करा.

५. परिच्छेदावर मनाने प्रश्न काढा, स्वतःच्या शब्दात उत्तरे लिहा.

६. परिच्छेदाला शीर्षक द्या.

७. पाठाचे तात्पर्य शोधून काढा व लिहा.

८. अवांतर वाचन करताना चांगले विचार, सुभाषिते, काव्यपंक्ती शोधून वहीत सुंदर अक्षरात व्यवस्थितपणे लिहून ठेवा.

९. दिलेल्या सुविचाराचे स्पष्टीकरण करणारी पाच-सहा वाक्ये सुसंगतवार लिहा.

१०. मुद्दा फुलवा.

११. वाक्प्रचार, म्हणी यांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.

१२. एखादी घटना, प्रसंग, ठिकाणाचे वर्णन, सभा, समारंभ, उत्सव हे सारे अनुभवलेले स्वतःच्या शब्दात लिहा.

१३. परिच्छेद (अनुच्छेद) लेखनाचा सराव करताना विषय, विचार (तुमच्या अनुभवविश्वातले, अनुभूतीतले) तुम्हीच शोधा.

१४. हस्ताक्षर, भाषाशुद्धी, मांडणी यांकडे काळजीपूर्वक लक्ष द्या.

१५. पाहिलेले, ऐकलेले, वाचलेले आठवून स्वभाषेत लिहिण्याचा सराव करा.

१६. शब्दसंपत्ती वाढवा, सुविचार, सुभाषिते, काव्यपंक्ती, श्लोक यांची साठवण करा. पाठांतर शक्ती वाढवा.

लिहिताना सुरुवातीला क्षणाक्षणाला गाडी अडेल, सारखे खोडावे लागेल, वेळेवर आठवणार नाही, विचार सुचणार नाहीत, शब्दात मांडता येणार नाही पण तरीही न गांगरता, गोंधळता किंवा निराश न होता जिद्दीने प्रयत्नाला लागा. या लेखनप्रकारांचा सराव करता करता एकीकडे तुमचे अनुभवविश्व समृद्ध करा. हे कसे करायचे हे तुम्हाला नुसते पाहूनही चटकन कळेल. पहा, वाचा, विचार करा, अनुभव घ्या, समृद्ध व्हा.

कुठल्याही प्रकारचा अनुभव घेताना डोळसपणा हवा. जिज्ञासा, चौकसबुद्धी, अभ्यासूवृत्ती, मानसिक तयारी, जागृती, उत्कटता हवी. सूक्ष्म अवलोकन, सावधानता, जागरूकता, संवेदनशीलता, ग्रहणशक्ती, विचारक्षमता, तारतम्य, एकाग्रता, स्मरणक्षमता, कल्पनाशक्ती या साऱ्यांचा एकत्रित परिणाम झाल्यावरच अनुभवांची पातळी उंचावते, अनुभवविश्व समृद्ध होते. मग लेखनात उणेपणा, थिटेपणा, तोकडेपणा न जाणवता लेखनात ठोसपणा, भरीवपणा, आशयघनता,



उत्कटता, आकर्षकता, सारगर्भता आणि प्रभावोत्पादकता जाणवते. विचारांना चालना मिळाली की कल्पना भरारते. कल्पकता जागी होऊन वर्णनशैली अचूक, प्रभावी होण्यास नकळत मदत मिळते. वैचारिक समृद्धी, अनुभवसंपन्नता, बहुश्रुतता यामुळे लिखाणाला अर्थ प्राप्त होतो, भाषेला डौल येतो. मर्मग्राही वाचनक्षमता हळूहळू आपल्याला भाषाप्रभुत्व बहाल करते. आपलीही भाषा अर्थवाही, सूचक, प्रवाही, प्रभावी-परिणामकारक सुबोध, सहज-सोपी रसाळ होऊ शकते. ही किमया घडते अर्थातच नेमाने, सतत, मनापासून केलेल्या लेखनाने ! लिहा, लिहीत रहा, लिहिता लिहिता शिकत रहा. उत्साह, उमेद वाढवा.

*

निबंध प्रकार

नीटनेटका, पद्धतशीर, बांधेसूद, परिणामकारक, शैलीदार निबंध लिहिणाऱ्याबरोबर वाचणाऱ्यालाही सच्चा आनंद देतो. सूक्ष्म अवलोकन, कल्पकता, ग्रहणक्षमता, विचारशीलता, विवेचनक्षमता, स्मरण या साऱ्यातून अंती घाटदार निबंध साकारतो, आविष्कृत होतो. निबंध लेखनाचे विविध प्रकार तुम्ही अभ्यासायला हवेत. त्यानंतर आपले अनुभव, मते, विचारक्षमता, शैली, मांडणीकौशल्य, संवेदनशीलता या साऱ्यांचा आवाका (पूर्वानुभवावरून) लक्षात घेऊन मगच आपण निबंधाचा विशिष्ट प्रकार लिहून पाह्यला हवा. पुढील निबंध प्रकारांचा आपण संक्षिप्त, सूत्रबद्ध पद्धतीने विचार करूया.

निबंध प्रकार– (स्थूलरूपाने)

१. वर्णनात्मक

२. कल्पनात्मक

३. कथनात्मक– निवेदनात्मक.पोटप्रकार (आत्मवृत्त)

४. वैचारिक, चिंतनपर

५. विवेचन– चर्चात्मक

६. व्यक्तिचित्र

७. चरित्रात्मक

८. लघुनिबंध.

तसं पाहिलं तर केवळ आपल्या सोयीसाठी आपण हे प्रकार कल्पिलेले

आहेत. कुठलाही विषय असू दे, त्यासाठी कुठलाही निबंध प्रकार सूचित केला असू दे, तरीही या प्रकारांची एकमेकांत सरमिसळ झालेली आपल्याला दिसेल. व्यक्ती, ठिकाण, अनुभव-अनुभूती, घटना, प्रसंग, आठवणी यांचे वर्णन रंगवून-खुलवून विविध प्रकारांत करावेच लागते. आपण पूर्वानुभव-अनुभूती घटना-प्रसंग हे सारे साठवणीत असलेले आठवतो, त्यात कल्पनेचे रंग भरून विषय फुलवून-खुलवून मांडतो. याचाच अर्थ निबंधाचा विषय कुठल्याही प्रकारचा असू दे, त्यासाठी विचार सुचावे लागतात, कल्पना लढवाव्या लागतात, बुद्धी वापरावी लागते, पूर्वानुभवांचा आधार घ्यावा लागतोच. त्यामुळे वर्णनशैली आणि निवेदन किंवा कथनपद्धती यांच्या आधारेच कुठल्याही विषयाची गुंफण करणे हे ओघाने येते, अभिप्रेत असते. पण तरीही आपण हे प्रकार वेगवेगळे मानतो कारण त्या त्या विषयांमध्ये महत्त्वाचा गाभा बदलता असतो. कल्पनात्मक निबंधात कल्पकतेला अधिक वाव, तर विचारप्रधान चिंतनपर निबंधात विचारांना अधिक महत्त्व असते. वर्णनात्मक निबंधाचा आत्मा म्हणजे वर्णनशैली तर कथनात्मक निबंधात कथनाला, निवेदनाला झुकते माप द्यावे लागते. मुलांनो, कथनक्षमता-सामर्थ्य आणि वर्णनशैली या दोन्हींची सर्वंकष तयारी म्हणजे निबंधलेखनाचा हुकमी एक्का होय. प्रत्येकाच्या लिखाणात विचार, कल्पना, वर्णन, निवेदन हा सारा मालमसाला असला तरीही प्रत्येकाची मांडणी वेगळी, पद्धती धाटणी वेगळी, विचारांची बैठक वेगळी, भाषेची सहजता वा अलंकारिकता वेगळी, शैलीची जातकुळीही वेगळी. व्यक्ती तितक्या प्रकृती या न्यायाने हे वेगळेपण अपेक्षितच आहे. प्रत्येकाची आवड-नावड वेगळी, विषयातला रस, विषयातली गती वेगळी, अनुभवांचा-अनुभूतींचा स्तरही भिन्नच. प्रत्येकजण आपल्या आवडीनुसार, स्वभावानुसार लेखनप्रकार निवडेल, म्हणूनच सुरुवातीला वेगवेगळ्या प्रकारांचा अभ्यास करा, सरावही करा आणि मग विचारपूर्वक निबंधविषय निवडून लिहायला सुरुवात करा. भरपूर वाचन आणि लेखन करून मगच आपला आवडता, साधू शकणारा निबंधप्रकार निश्चित करा. रचनाकौशल्य, संवाद-संभाषण कसब, वातावरणनिर्मिती आणि निवेदनकौशल्य हे लेखनगुण अभ्यासाने, सरावाने आपल्याला आत्मसात करता येतात.

वर्णनात्मक निबंध

जे पाहतो, ऐकतो, अनुभवतो, वाचतो ह्या साऱ्यांची माहिती, हकीगत हुबेहूब पण आकर्षक-चपखल शब्दात लिहिणे म्हणजे वर्णन करणे, वाचणाऱ्याच्या (आपण लिहिलेल्या निबंधाचा वाचक) डोळ्यासमोर ते दृश्य, तो प्रसंग, ती घटना हे सारं हुबेहूब उभं राहिलं पाहिजे, साकारलं पाहिजे. इतकंच नव्हे, तर या साऱ्यांचा आपल्या मनावर झालेला परिणामही शब्दांतून व्यक्त होत वाचणाऱ्याच्या हृदयापर्यंत पोहोचला पाहिजे.

वर्णनात्मक निबंधाचे पोटप्रकार विषयानुरूप-विभागानुरूप पडतील–

१. स्थलवर्णन– किल्ला, देवालय, सागरकिनारा, गाव, शहर, एस.टी. स्टँड, बस स्टँड इत्यादी.

२. निसर्गवर्णन– सूर्योदय, सूर्यास्त, वनराई, ऋतू, चांदणी रात्र इत्यादी.

३. प्रसंगवर्णन– पाहिलेला अपघात, परीक्षेपूर्वी, निवडणूक, सभा, संमेलन इत्यादी.

४. प्रवासवर्णन– सहल– गोवा, कोकण, डोंगरदऱ्यांत भटकंती, मोटरचा प्रवास.

५. प्रदेशवर्णन– महाराष्ट्र, दिल्ली, अजिंठा परिसर, काश्मीर, नेपाळ, अंदमान.

(१) विषय व्याप्ती, मुद्दे निश्चिती

(२) आकर्षक प्रारंभ, सम्यक शेवट

(३) भाषा व शैली विचार

(४) पोषक घटना, अनुभव (विषयानुरूप)

कथनपर निबंध

यात वर्णनाबरोबरच क्रिया, घटना, प्रसंग यांनाही महत्त्व असते. माहिती, हकीकत, टिपणे या साऱ्यांची एकत्रित गुंफण कथनपर निबंधात करावी लागते. दैनंदिनी, आठवणी, ऐतिहासिक घटना-प्रसंग, घडामोडी, आदर्शचरित्र व चारित्र्य, जीवनात आलेले अनुभव हे सारे कथनपर निबंधात अंतर्भूत आहे. यातलाच एक आणखी प्रकार म्हणजे आत्मकथन. एखादा पशू, पक्षी, वस्तू, व्यक्ती आपल्या

जीवनाविषयी, अनुभवांविषयी, व्यथा-वेदनांविषयी, घडामोडी-प्रसंगांविषयी आपल्याच शब्दांत मांडतात, बोलतात. आजची स्थिती, मूळ– पहिले अनुभव, आजच्या स्थितीबद्दल काय वाटते हे सारे सुसंगत, क्रमवार, सुयोग्य जुळणी करूनच लिहावे लागते. यात प्रांजलपणा, उत्कटता, भावभावना प्रकटीकरण आणि नकळत शिकवण हे सारे सूचकतेने, समर्पकपणे, प्रभावी-आकर्षक शैलीत मांडले की निबंधात जिवंतपणा येतो, लालित्य निर्माण होते. यासाठी कल्पकता, सहजता, सूक्ष्म अवलोकन दृष्टी आणि आस्वादनकौशल्य या साऱ्यांची मदत होते. हा निबंध लिहिताना पुढील गोष्टी ध्यानात घ्या :

१. निबंधातील प्रत्येक शब्द, प्रथमपुरुषी एकवचनी 'मी' याला समोर ठेवून लिहिलेला असावा.

२. लिहिणाऱ्याने तटस्थ, अलिप्त असावे.

३. प्रथम वेचक, नेटक्या शब्दांतून आजची स्थिती व्यक्त व्हावी. नंतर भूतकाळात-पूर्वायुष्यात डोकावून ते दिवस, ते अनुभव, ती स्थिती या साऱ्यांचे वर्णन करावे.

४. क्रमवार विकास– मधले खाचखळगे– पतन या साऱ्यांचा संक्षिप्त उल्लेख व्हावा.

५. भूमिका आशादायी असावी. व्यथा-समाधान-खेद-राग-चिंता या भावना सूचकतेने प्रकट व्हाव्यात.

६. भाषा ओघवती, सहजसोपी, विषयानुकूल आणि उत्कट-भावपूर्ण असावी.

चिंतनपर– वैचारिक निबंध

या निबंधाचा आत्मा विचाराधिष्ठित असतो. कल्पनेपेक्षा, वर्णनापेक्षा ठोस विचारांना अधिक महत्त्व असते. विचारप्रधान, विवेचन-चर्चात्मक हे सारे प्रकार यातच सामावलेले असतात. मुद्देसूद विचार तुलनात्मक दृष्टीने, चर्चारूपात, मतं व्यक्त करत मांडले जातात. या विषयाचा समारोप करताना दोन्ही बाजूंचा, विविध मतांचा साधकबाधक विचार केला जातो. काही वेळा निर्णय घेण्याची प्रक्रिया वाचकाने करावी, असे सुचवले जाते. विषयाचे सखोल ज्ञान, मनन-चिंतनातून होणारे अनुभव, विचारमंथन, बहुश्रुतता, वाचनाचा नाद, अनुभवसंपन्नता, विचारी

वृत्ती, अद्ययावत माहिती, त्यानुसार उदाहरणे, दाखले, सुयोग्य मांडणी, प्रभावी मतप्रतिपादन हे सारे ज्याला जमते, आवडते तोच समर्थपणे असे निबंध लिहू शकतो. अशा प्रकारचा निबंध लिहिताना–

(१) विषयाचे सम्यक ज्ञान

(२) प्रभावी आरंभ करून वाचकाच्या विचारांना, जिज्ञासेला चालना देणे.

(३) सुस्पष्ट, संतुलित विचार मांडण्यासाठी निर्भयता हवी.

(४) विचारांना पुष्टी देणे, चर्चेतून विषय खुलवत-फुलवत, मते खोडत, स्वमते जोरदारपणे मांडत पटवून देण्याची क्षमता हवी.

(५) सत्यता, वास्तवता यांच्या आधारावर निबंधलेखन व्हावे.

(६) भाषा प्रभावी, ढंगदार, भारदस्त असावी.

(७) विचारांच्या क्रमानुसार परिच्छेद रचना केली जावी.

कल्पनात्मक निबंध

अनुभवसंपन्नता, बहुश्रुतता, कल्पकता, जिज्ञासा, बारकावे टिपण्याची सवय हे सारे आपण सरावाने मिळवले की, कल्पनारम्य विश्वात रममाण होत आपण छान छान कल्पना प्रभावी शब्दांत लिहू शकू, मांडू शकू, व्यक्त करू शकू. आपले विचार कल्पनांवर आधारित असले तरी ते अवास्तव, अतिरंजित वाटता कामा नयेत. कल्पना करताना वास्तवाचे भान हवे. अव्यवहारी, निरर्थक, बिनबुडाच्या कल्पना वाचणाऱ्याला पटणार नाहीत, खेचून घेऊ शकणार नाहीत.

हा निबंधप्रकार हाताळताना पुढील गोष्टी ध्यानात असू देत–

(१) कल्पना ही वास्तवतेला धरून हवी.

(२) पाल्हाळ-विस्तार नको.

(३) संक्षिप्तता हवी.

(४) कल्पनेच्या भोवती ठोस विचारांची पेरणी, गुंफण करावी.

(५) कल्पनेमध्ये नावीन्य जरूर हवे, पण विषयांतर नको.

(६) कल्पनेचा पूर्णत्वाने विचार करून मगच निबंधाची मांडणी, शैली निश्चित करावी.

(७) आवश्यक तेवढाच विस्तार करावा.

(८) भाषा सालंकृत असावी. पण बोजड नसावी.

(९) शैली ढंगदार असावी.

(१०) सारगर्भ पण परिपूर्ण विचार कल्पनेतून सहजस्फूर्त मांडले जावेत.

(११) कल्पनेची भरारी मारताना सारासार विचार करून मगच सुबक कौशल्यपूर्ण लेखन करावे.

(१२) निबंधाचा समारोप करताना निष्कर्ष सूचकतेने व्यक्त व्हावा.

(१३) वाचणाऱ्याच्या मनाला आपल्या कल्पना पटल्या पाहिजेत, रुचल्या पाहिजेत, मनाल्या थेट भिडल्या पाहिजेत. वाचणारा विचारांशी सहमत झाला पाहिजे.

*

हा वसा घ्यायलाच हवा !

भाषा सहजसोपी आकर्षक, रसाळ आहे. शब्द अर्थपूर्ण, अचूक, नेमके आहेत. विचार योग्य, नेमके, ठोस आहेत असा प्रभावी, आशयपूर्ण, विचारांना चालना देणारा निबंध तुम्हालाही लिहिता येईल. विचार सुचायला लागले, कल्पना मनमुक्त स्वैर भरारी मारू लागल्या, साठवणीतलं आठवायला लागलं, अनुभव बोलायला लागले की मग चांगला निबंध आकाराला येतो. कलात्मक निबंधाचा आविष्कार लिहिणाऱ्याला आनंद देतो, वाचणाऱ्याला समाधान, प्रेरणा ! यासाठी पुढील महत्त्वाच्या गोष्टींचा वसा श्रद्धेने घ्यायला हवा, निष्ठेने जोपासायला हवा.

(१) दिसामाजी काहीतरी लिहीत जावे, प्रसंगी अखंडित वाचीत जावे. ह्या समर्थांच्या शिकवणुकीचा वसा जपा. आचरणात दिसू द्या.

(२) सोद्देश वाचा. वाचल्यावर मनन-चिंतन करून सारगर्भ मुद्दे, नवे शब्द, विचार, शब्दालंकार-वाक्यालंकार, काव्यपंक्ती, सुभाषिते या साऱ्यांचे टिपण करा.

(३) रोज नेमाने वेगवेगळ्या विषयांवर अनुच्छेद, निबंध लिहिण्याचा सराव करा.

(४) चांगले चांगले वेचा, पाठ करा. योग्य ठिकाणी लिहिण्याच्या ओघात त्या साऱ्याचा उपयोग करा.

(५) अवतीभवतीचे वातावरण, परिसर, व्यक्ती, त्यांचे विचार, वर्तन, प्रतिक्रिया यांचा बारकाईने अभ्यास करा.

(६) ज्ञानेंद्रियांचा अधिकाधिक उपयोग करा.

(७) डोळस बना, सूक्ष्म अवलोकन करा, मथितार्थ ध्यानात घ्या.

(८) निसर्गाशी गट्टी करा.

(९) पूर्वानुभव-संदर्भ तपासून पहा.

(१०) भाषाभ्यास वाढवा.

(११) विषय निवडा, सर्वांगीण विचार करा, मुद्दे शोधून काढा.

(१२) सुस्पष्ट मांडणीचा सराव करा.

(१३) लेखनशैली परिश्रमपूर्वक कमवा. शैली स्वतंत्र, सुबोध, नवीन, घाटदार, खुमासदार, सहजसुंदर व्हावी यासाठी इतरांच्या लेखनशैलीचाही बारकाईने अभ्यास करा.

(१४) कुठल्याही अनुभवाचे, दृश्याचे, लेखनप्रकाराचे रसग्रहण करायचा, दिलखुलास आस्वाद घ्यायचा प्रयत्न करा.

(१५) निबंधलेखनाचे विविध प्रकार—

वर्णनपर

वैचारिक, विचारात्मक

कल्पनात्मक

विवेचनात्मक

निवेदनात्मक (आत्मवृत्त)

चर्चात्मक

इत्यादी लिहिण्याचा नेमाने प्रयत्न करा, सराव करा.

(१६) संचय करा—

अ) शब्द संपदा (अनेक शब्दांबद्दल एक, समानार्थी, विरोधी, शब्दछटा, एकाबद्दल अनेक शब्द)

ब) नित्यनूतन कल्पना

क) विविध भाषांतील सुविचार, सुभाषिते


ड) म्हणी, वाक्प्रचार

इ) श्लोक, काव्यपंक्ती, उतारा (ससंदर्भ) पाठांतर

फ) विविधांगी अनुभव

य) घटना व प्रसंग जंत्री
र) व्यक्तिविशेष
ल) बहुविध माहिती (संकलित)
ग) मोठ्या व्यक्तींची शिकवण, महत्त्वाचे उद्‌गार

*



यशासाठी कानमंत्र

भाषेच्या पेपरात निबंधवजा प्रश्नांमध्ये अधिकाधिक गुण मिळावेत, तुमच्या लिखित निबंधाचे कौतुक होऊन शाबासकी मिळून आणि परीक्षेत, जीवनात भरघोस यश मिळावे म्हणून पुढील कानमंत्र मनात ठसवा, आचरणात उतरवा.

(१) हस्ताक्षर अधिकाधिक वळणदार, आकर्षक व्हावे म्हणून संथा घ्या, पाठपुरावा करा, भरपूर लिहा.

(२) लिखाण निर्दोष व्हावे म्हणून व्याकरण, शुद्धलेखनाचे नियम इत्यादींचा अभ्यास करून भाषाशुद्धीसाठी प्रयत्नशील रहा.

(३) लेखन निश्चित वेळेत व्हावे, म्हणून लिखाणाचा नेमाने सराव करा. घड्याळ लावून लिहिण्याची सवय केल्यास लेखनात गती येईल आणि लिखाण परिपूर्ण व्हायला मदत होईल.

(४) दिलेल्या विषयांबद्दल इतरांची मते जाणून घेण्यासाठी भरपूर चर्चा करा.

(५) निबंधांवरची जास्तीतजास्त पुस्तके वाचा. बारकावे टिपा, मांडणीचा अभ्यास करा. सुरुवात-मध्य-शेवट-पद्धती-भाषा-विचार, मुद्दे यांबद्दल तुलनात्मक विचार करा. आडाखे-ठोकताळे बांधा. पूर्वानुभवाशी सांगड घालून स्वतःची मते, स्वतःचे विचार स्वतंत्रपणे मांडण्यासाठी सतत प्रयत्नशील रहा.

(६) वाचन, लेखन, मनन, चिंतन, श्रवण या साऱ्या माध्यमांतून आपले अनुभवविश्व समृद्ध करा. ज्ञानेंद्रिये डोळसपणे-विचारपूर्वक परजून चांगलं ते ते वेचून विविधांगी विषयांवर मुद्देसूद, सलग, सुसंगत, आकर्षक, समर्पक

लिहिण्याचा शुभारंभ करा. लिहीत रहा, लिहिते व्हा. सुज्ञास अधिक सांगणे न लगे !

ध्यानात ठेवा,

विषयाची अचूक निवड

मुद्द्यांचा क्रम आणि मांडणी

विचार आणि मतांच्या पुष्टीसाठी घटना-प्रसंग, प्रारंभ - मध्य - शेवट (आकर्षक, समर्पक, प्रभावी) सहजसोपी भाषा, ढंगदार शैली.

या साऱ्यांचा सुरेख मेळ साधणे म्हणजे हमखास यशाची हमी !

*

भाग - २ : लेखनाचा शुभारंभ

अनुच्छेद लेखन

निबंधलेखनाच्या पूर्वतयारीत अनुच्छेद लेखनाला अतिशय महत्त्व आहे. निबंध म्हणजे मुद्देसूद लेखन, सुसंगत विचारांचं सलग लेखन हे आपण यापूर्वीच पाहिलं आहे. दिलेल्या शब्दांच्या, शीर्षकाच्या आधारे अनुच्छेद लिहिण्याचा सराव तुम्ही विद्यार्थ्यांनी नेमाने, सातत्याने करायला हवा. मुद्दा फुलवणं, विचार क्रमाने मांडणं– घटना-प्रसंगातून खुलवणं हे कौशल्य तुम्हाला या सरावातून साधू शकेल. उदाहरणादाखल काही अनुच्छेद लिहून दाखवणार असून काही अनुच्छेद शीर्षकाच्या, दिलेल्या विषयाच्या, विचाराच्या आधारे तुम्ही लिहावेत, अशी अपेक्षा बाळगली आहे. सुरुवातीला पाठ्यपुस्तकांच्या आधारे लिहिण्याचा सराव आपण करणार आहोत.

स्वावलंबन (पाठ्यपुस्तक इ. ५ वी)

विचारार्थ मुद्दे–

(१) स्वावलंबन म्हणजे

(२) स्वावलंबनाचे फायदे

(३) स्वावलंबनाबद्दल मोठ्या माणसांचे विचार

(४) परावलंबित्व का नको

विद्यार्थिमित्रांनो, या विषयावर निबंधही (४-५ परिच्छेदांत) लिहिता येईल आणि अनुच्छेदही ! एक वाक्य म्हणजे एक विचार ! प्रत्येक विचार फुलवला,

तर वेगवेगळे परिच्छेद तयार होतील.

अनुच्छेद १ –

स्वतःचं काम स्वतः करणं, लहान-मोठ्या गोष्टींसाठी इतरांवर अवलंबून नसणं म्हणजे स्वावलंबन. कोणतंच काम तुच्छ मानलं नाही आणि श्रम करण्यात आनंद मानला की, स्वावलंबनाचा धडा गिरवला असं समजायला हरकत नाही. परावलंबी जिण्यापेक्षा मरण परवडलं, असं म्हणतात ते खोटं नाही. 'जो दुसऱ्यावरी विसंबला, त्याचा कार्यभाग बुडाला' यातही स्वावलंबनाचा मंत्र सांगितलाय. स्वावलंबनामुळे आत्मविश्वास वाढतो. जिद्द, उमेद वाढते, हाती घेतलेले काम वेळेवर आणि बिनबोभाट पार पडते, वेळ वाचतो. कष्टांचं चीज होतं आणि कार्यपूर्तीचा आनंद मिळतो. अडचणींवर मात करता येते. 'स्वावलंबन की एक झलकपर निछावर हो कुबेरका भंडार' यातलं मर्म हेच आहे. स्वावलंबन म्हणजे यशाची गुरुकिल्ली.

या विषयावर जर निबंध लिहावयाचा असेल तर मोठ्या लोकांच्या जीवनातून जाणवलेले स्वावलंबन, मोठ्यांचे या संबंधीचे विचार, शिकवण, घटना-प्रसंगातून परावलंबनातले दुःख, व्यथा आणि स्वावलंबनातले फायदे, लाभ, त्यातून मिळणारा निखळ आनंद हे सारे त्यात समाविष्ट करता येईल. निसर्गातील स्वावलंबनाचे धडे पशू, पक्षी कीटक यांचे वर्तन, यांचा योग्य तो उल्लेख निबंधात यायला हवा. स्वावलंबनासंबंधी आजवर काढलेले सहजोद्गार, काव्यपंक्ती, सुविचार, सुभाषिते यांचीही सुयोग्य मांडणी लेखनाच्या ओघात व्हायला हवी, तरच आपल्या निबंधलेखनाला ठोस स्वरूप मिळू शकेल असा विश्वास वाटतो. 'स्वावलंबनाचं बीज लहान वयातच जयप्रकाशजींच्या जीवनात पेरलं गेलं' ही ठाऊक असलेली गोष्ट– तिचा उल्लेख तुम्ही लिहिण्याच्या ओघात करायला हवा. क्रिकेटचं शिक्षण चंदू बोर्डे यांनी स्वावलंबनातून मिळवलं, किंवा

देखा पिलांसाठी तिनं
झोका झाडाले टांगला
खोपा इनला इनला

यात पक्ष्याचं घरटं बांधताना जाणवलेलं स्वावलंबन तुम्ही उल्लेख करून

दाखवायला हवं !

छंद–

यावर निबंधही लिहिता येईल. माझा आवडता छंद, छंद जोपासूया किंवा छंद हेच जीवन, असे निबंधाचे विषय असू शकतील. या विषयांवर निबंध लिहिताना तुम्हाला दगड शोधूया, एक ऐतिहासिक क्षण, छंद हेच जीवन इत्यादी धड्यांचा उपयोग करून घेता येईल.

(१) छंद म्हणजे

(२) विविध छंद

(३) छंदामुळे होणारे फायदे

(४) मोठ्यांची उदाहरणे.

अनुच्छेद २

छंद म्हणजे नाद, छंद म्हणजे आवड, छंद म्हणे चांगल्या गोष्टींचा ध्यास, वेड. प्रत्येक माणसाला कोणता ना कोणतातरी छंद जोपासायला आवडतो. दुर्मिळ वस्तूंचा संग्रह, संचय करणे, निसर्गनिरीक्षण, पक्षीनिरीक्षण, गिरिभ्रमण, चित्रे काढणे, हस्तकला-शिल्पकला, छायाचित्रण यात रंगून जाणे; वाचन, लेखन, वादन, संगीत, खेळ यांपैकी कुठलातरी छंद जोपासणं; स्वाक्षरी जमवणं, पोस्टाची तिकिटे जमवणं, रानोमाळ भटकणं, संशोधन करणं हे आणि या प्रकारचे अनेक छंद माणसं जपतात, जोपासतात. छंदांमुळे पुढील फायदे होतात–

(१) रिकाम्या वेळेचा सदुपयोग.

(२) निखळ आनंद.

(३) अनुभवविश्व समृद्ध होणं.

(४) कार्यसिद्धी होते.

(५) यश, नाव, कीर्ती, सन्मान यासाठी छंद जोपासला नाही, तरीही त्यातून हे सारं कळत-नकळत मिळू शकतं.

म्हणूनच आपण छंद जोपासूया.

निसर्ग

(१) निसर्ग म्हणजे
(२) निसर्गाची संगत
(३) फायदे

अनुच्छेद ३–

विशाल निळं आकाश, धीरगंभीर समुद्र, भरती-ओहोटीच्या लाटा, हिरवीगार शेतं, वनस्पती, तृणं, कळ्या फुले, झाडे-वेली, अवखळ झरे, वेगाने पुढे धावणारी नदी, चमकणारी वीज, कोसळणाऱ्या धारा, इंद्रधनुष्य, सूर्योदय-सूर्यास्त, अवतीभवतीचे डोंगर, दऱ्या, जलप्रपात, माळरानं, जंगलं, बदलते ऋतू, रंगीबेरंगी फुलपाखरं, पक्षी हे सारं म्हणजे निसर्ग. दैनंदिन चाकोरीतून बाहेर पडून आपण निसर्गाशी गट्टी केली पाहिजे. निसर्गाजवळ जाऊन सौंदर्य निरखलं पाहिजे. एकान्त मिळवला पाहिजे. सुख, शांती, प्रसन्नता, आनंद हे सारं आपल्याला निसर्गाच्या संगतीत मिळतं. कष्टांचा परिहार होतो. दुःख, वेदना, थकवा यांचा विसर पडतो.

अनुच्छेद ४

राष्ट्राची खरी गरज

(१) उत्साही कार्यकर्ते, आदर्श नेते
(२) भावभावना, गुण (व्यक्ती, समाज)
(३) संदेश

देश उभारणीच्या कार्यात गरज आहे ती स्वयंस्फूर्तीने, एकोप्याने काम करणाऱ्या, आचरणातून देशप्रेम, देशभक्ती, सर्वसमर्पणाची शिकवण देणाऱ्या उत्साही कार्यकर्त्यांची ! वायफळ बडबड न करता काम करणारे कर्तव्यनिष्ठ, देशहिताची कळकळ बाळगून त्यागास सिद्ध असणारे त्यागी, आदर्श पुढारी हवेत. जात, धर्म, पंथ विसरून बंधुभाव जपणारा समाज हवा. प्रत्येक कामात झोकून द्यायची वृत्ती हवी, शिस्त हवी. कष्टांची तयारी हवी. क्षुद्र विचार, संकुचित वृत्ती, स्वार्थ टाकून देऊन राष्ट्रउभारणीसाठी प्रत्येक भारतीयाने सिद्ध व्हायला हवे.

अनुच्छेद ५

मन

(बहिणाबाई चौधरी यांची 'मन' ही कविता आणि रामदासांचे 'मनाचे श्लोक' यांचा आधार घ्या.)

मन ही न दिसणारी पण जाणवणारी अशी गोष्ट आहे. जो मन जिंकेल तो जग जिंकेल, असं म्हटलं तर चुकीचं ठरणार नाही. मन हे चंचल असतं. अनेक विकार त्यात ठाण मारून जणू बसलेले असतात. माणसाच्या मनाचा थांगपत्ता लागत नाही. मानवी मनाच्या विविध प्रवृत्ती असतात. मन ओढाळ असतं, अस्थिर असतं, मनाला आवर घालणं खूप कठीण असतं कारण ते अचपळ असतं. मन सैरावैरा धावत असतं. मन पाखरासारखं क्षणार्धात खूप लांबवर भिडून येतं. मन खुजं, लहान, थिटं, संकुचित असतं पण मनात आलं, तर ते आभाळाएवढं विशाल, मोठ्ठं होऊ शकतं. मन खंबीर हवं, विवेकी विचारी हवं. मन शुद्ध, निर्मळ, पवित्र, शांत, प्रसन्न हवं. 'मन करा रे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण' यातले मर्म हेच आहे.

वाचा, विचार करा–

मन शुद्ध तुझं गोष्ट हाये पृथवी मोलाची ।
तू चाल पुढं, तुला रं गड्या, भीती कुणाची, पर्वाबी कशाची ?

*

आकलन

भाषा शिक्षणात आकलन आणि अभिव्यक्ती या दोन प्रक्रियांना खास महत्त्व आहे. गद्या किंवा पद्य (पाठ्यपुस्तकातील) अध्ययन– अध्यापनानंतर मुलांना काय आणि किती समजले, हे जाणून घेण्यासाठी प्रश्नोत्तर हे एक उपयुक्त साधन आहे. उत्तरांतून होणारी अभिव्यक्ती मुलांना कितपत आकलन झाले आहे याची चाचपणी असते. ही प्रश्नोत्तरे साचेबंद असतात. बऱ्याच वेळा त्यामध्ये सारखेपणा असल्याने तोच तोचपणा, एकसुरीपणा आणि रटाळपणा नकळत शिरतो, दिसतो, जाणवतो. निबंधलेखनाच्या पूर्वतयारीत घटना, प्रसंग, परिस्थिती, भोवतीचा निसर्ग यांचे योग्य आकलन होणे अत्यावश्यक असते, तरच परीक्षेच्या वेळी अपेक्षित अभिव्यक्ती मुलांच्या निबंधवजा प्रश्नांच्या उत्तरातून डोकावेल, दिसेल, जाणवेल. विषयविवेचनात नेमकेपणा, नेटकेपणा यावा म्हणून पाठ्येतर परिच्छेद मुलांना आकलनासाठी दिले जातात. अपरिचित परिच्छेद वाचून, त्यातील सारगर्भ विचार टिपून, ग्रहण करून मुलांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहावीत अशी अपेक्षा असते. उताऱ्यातील वाक्ये जशीच्या तशी न उतरवता आपल्या भाषेत मुलांनी उत्तरे लिहावीत, नव्हे, तसा प्रयत्न जाणीवपूर्वक करावा असा हेतू बाळगून आकलनाचा प्रश्न विचारला जातो. यासाठी तुम्ही मुलांनी सराव करायला हवा, तरच ऐन परीक्षेत तुम्हाला हा प्रश्न सहजतेने सोडविता येईल. सरावासाठी छोटे छोटे परिच्छेद तुम्हाला दिले आहेत. वाचा, विचार करा, जाणून घ्या आणि अर्थपूर्ण उत्तरे लिहिण्याचा प्रयत्न करा. लिहा म्हणजे जमेल

आणि जमले की जमल्याचा आनंद मिळेल. या परिच्छेदांचा उपयोग तुम्हाला विषयांनुसार निबंधलेखनातही करता येईल.

परिच्छेद १

ही शाळा तुमची, माझी, आपल्या सर्वांचीच आहे. ती सुंदर, स्वच्छ, प्रसन्न ठेवणे हे कुण्या एकाचे नव्हे, तर आपणा सर्वांचेच काम आहे. रोज प्रत्येकाने फक्त दहा मिनिटे जाणीवपूर्वक खर्च करून आपला वर्ग, व्हरांडा, आवार, बसण्याची जागा इत्यादी स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न केला, तर एकोप्याने केलेल्या कामामुळे शाळेची स्वच्छता नजरेत भरण्याइतकी छान होईल. शाळेच्या सौंदर्यात भर पडून वातावरण रम्य, प्रसन्न राहील. शाळेच्या स्वच्छतेची जबाबदारी काय फक्त सेवकांवर टाकायची ? ते बिचारे दिवसभर राबले तरी त्यांचे हात, त्यांची शक्ती तोकडी पडेल. हाताच्या बोटावर मोजता येईल इतक्या माणसांनी सफाई करायची आणि इतर हजारो हातांनी मात्र घाण करायची, अस्वच्छता वाढवायची हे योग्य आहे काय ? स्वच्छतेचा वसा घ्या. एकजुटीने कामाला लागा, तरच सुंदर, स्वच्छ शाळेचं स्वप्न सत्यात उतरेल.

प्रश्न–

(१) सुंदर, स्वच्छ शाळेचं स्वप्न सत्यात केव्हा उतरेल ?

(२) शाळा स्वच्छ राखण्याची जबाबदारी कुणाकुणाची आहे ?

(३) शाळा कुणाची आहे ?

(४) एकोप्याने काम केल्याने काय होईल ?

(५) योग्य शीर्षक द्या.

परिच्छेद २

आपले मन कमकुवत असते. ते चंचलही असते. त्यामुळे आपल्या मनात कुविचार येतात. चटकन राग येतो. लहान लहान गोष्टींचा मोहही आपल्याला होतो. आपण रुसतो-रागावतो, अविवेकी, अविचारी बनतो. पण रामदासांच्या मनाच्या श्लोकांतील शिकवणुकीप्रमाणे निग्रह, निर्धार करून या गोष्टी आपल्याला टाळता येतात. क्रोधामुळे आपण अविवेकी बनतो, मोहामुळे हातून नकळत पाप घडते. वाईट सवयी, बेशिस्त यामुळे जीवनाला वाईट वळण लागते आणि मग नशिबी दुःख, अपयश येते. वाईट सवयी, कुपथ्य यामुळे शरीर व

मनाचे आरोग्य बिघडते, चिंता केल्याने मन अशांत, अस्वस्थ होते. निंदा, वैर यामुळे मनाचा तोल जातो, मनाची शांती बिघडते. आयुष्याचा खेळखंडोबा होतो, म्हणूनच मनाला आवर घालून निग्रहपूर्वक वाईट गोष्टी टाळायला हव्यात.

प्रश्न–

(१) जीवनाला वाईट वळण कसे लागते ?

(२) चिंता का करू नये ?

(३) क्रोध आणि मोह यांमुळे काय घडते ?

(४) मनाचा तोल केव्हा जातो ?

(५) रामदासांची शिकवण कोणती ?

(६) योग्य शीर्षक द्या.

परिच्छेद ३

आजच्या धकाधकीच्या, धावपळीच्या जीवनात, अस्थिर वातावरणात माणसाची माणुसकीच हरवली आहे. संतांनी अखिल विश्वावर प्रेम करण्याचा कानमंत्र दिला. पण आपण आपल्याजवळच्या शेजाऱ्यांवरसुद्धा प्रेम करण्यात कुचराई करतो. हल्लीच्या फ्लॅट संस्कृतीत आपल्या मनाची कवाडेही सदा झाकलेली, घट्ट मिटलेली आहेत. आपल्या शेजारी कोण राहतो, हेही ठाऊक नसणारे महाभाग आज कैक आहेत. शेजाऱ्यांवर प्रेम करणे, त्यांच्या अडीअडचणीला उपयोगी पडणे, त्यांच्या दुःखावर हळुवार फुंकर घालून त्यांना दिलासा देणे हे माणूस म्हणून आपले कर्तव्यच आहे. स्वतःच्या सुखाचाच विचार करणे सोडून द्या. दुसऱ्यांच्या भावनांचा आदर करा. सर्वांना प्रेम द्या, मदतीचा हात सदैव पुढे करा. अनाथ, अपंगांना आपले माना. हीच खरी माणुसकी.

प्रश्न–

(१) खरी माणुसकी कोणती ?

(२) संतांनी दिलेला कानमंत्र कोणता ?

(३) माणूस म्हणून आपले कर्तव्य कोणते ?

(४) आपण काय करायला हवे ?

(५) आपण काय सोडायला हवे ?

(६) योग्य शीर्षक द्या.

परिच्छेद ४

यश मिळावे म्हणून, खूप प्रगती व्हावी म्हणून धडपडणारा विद्यार्थी रोज नेमाने सूर्योदयापूर्वी उठतो. नित्यकर्म उरकून तो पहाटेच्या प्रसन्न हवेत फिरून येतो किंवा व्यायाम करतो. सूर्यनमस्कार, जोर, दोरीच्या उड्या यामुळे त्याचे शरीर निरोगी राखण्याचा तो प्रयत्न करतो. व्यायामामुळे आपण सुदृढ, सबळ, सुडौल आणि उत्साही होऊ, हे त्याला ठाऊक असते. व्यायामानंतर थंड पाण्याने स्नान करून तो पूजापाठ करतो, एकाग्र मनाने प्रार्थना करतो. चहा-कॉफी यांसारखी उत्तेजक पेये न घेता तो नेमाने दूध घेतो. त्यानंतर वर्तमानपत्र चाळून तो नवीन माहिती मिळविण्याचा प्रयत्न करतो. त्यानंतर तो भरपूर अभ्यास करतो. स्वयंअध्ययनावर त्याचा विशेष भर असतो. वेळ वाया न दवडता वाचन, लेखन, पाठांतर यांद्वारे तो अभ्यास घटवतो, पक्का करण्याचा प्रयत्न करतो. घरातल्या एका तरी कामात तो आईला नेमाने मदत करतो. मोठ्यांबद्दल आदर, वागण्यातील नम्रता, अभ्यासू वृत्ती आणि शिस्तप्रियता या त्याच्या गुणांमुळे तो सर्वांना प्रिय होतो.

प्रश्न–

(१) सर्वांना प्रिय होण्यासाठी विद्यार्थ्याच्या अंगी कोणते गुण असायला हवेत ?

(२) यश, प्रगतीसाठी विद्यार्थी काय करतो ?

(३) यशाची इच्छा करणारा विद्यार्थी सकाळच्या वेळी काय करतो ?

(४) सूर्योदयापूर्वी उठणारा विद्यार्थी व्यायाम का करतो ?

(५) स्नानानंतर लगेच विद्यार्थी काय करतो ?

(६) परिच्छेदाला योग्य मथळा द्या.

परिच्छेद ५

वेळ ही एक मौल्यवान वस्तू आहे. गमावलेला वेळ पुन्हा परत मिळत नाही. जीवनाची यशस्विता वेळेच्या सदुपयोगावर अवलंबून आहे. 'एक क्षणही वाया दवडू नका' असे रामदास स्वामींनी आपल्याला कळकळीने सांगितले आहे. ज्यांना वेळेचे महत्त्व कळत नाही, अशी माणसं आपला वेळ आळसात, निरर्थक गप्पाटप्पा करण्यात, लोळण्यात, भांडणतंटा करण्यात व्यर्थ वाया घालवतात.

ज्याला ज्ञान मिळवायचंय, यश, कीर्ती, पैसा या गोष्टी हव्या आहेत, त्यानं वेळेचा सदुपयोग करणं अत्यावश्यक आहे. वेळेचं नियोजन हवं, वेळेवर प्रत्येक गोष्ट करण्याचा नेम हवा, उरक हवा. वेळ काटकसरीनं आणि क्षणाक्षणाचा हिशोब ठेवत घालवायला हवा, तरंच आपण जीवनात आनंदाचं नंदनवन फुलवू शकतो.

प्रश्न–

(१) आपल्या जीवनात आपण आनंदाचं नंदनवन कधी फुलवू शकू ?

(२) रामदासस्वामींनी आपल्याला काय सांगितलंय ?

(३) बहुसंख्य माणसे आपला वेळ कसा दवडतात ?

(४) वेळेचा सदुपयोग करणं आवश्यक का आहे ?

(५) योग्य शीर्षक द्या.

आकलन करताना पुढील गोष्टी न विसरता करा.

(१) परिच्छेदाचं काळजीपूर्वक वाचन

(२) अर्थपूर्ण टिपण (मानसिक नोंद)

(३) प्रश्नांचा रोख पाहून उत्तरे शोधा.

(४) स्वतःच्या शब्दांत उत्तर लिहा.

(५) लिहिण्यात नेमकेपणा असू दे.

(६) हस्ताक्षराकडे, शुद्धलेखनाकडे लक्ष द्या.

(७) शीर्षक छोटे, सुटसुटीत, समर्पक हवे.

सरावासाठी अवांतर वाचनाच्या पुस्तकांतील, निबंधावरील प्रकाशित पुस्तकांतील परिच्छेद शोधा. स्वतः प्रश्न तयार करा. तयार केलेले प्रश्न लिहिण्याचा परिपाठ ठेवा. आकलनातील गुण हुकमी असतात. सुरुवातीला पाठ्यपुस्तकातील चांगल्या परिच्छेदांचाही उपयोग करायला हरकत नाही. सारगर्भ विचार करण्याची, मुद्देसूद लिहिण्याची सवय तुमच्या अंगी यातूनच निर्माण होईल.

*

कल्पनाविस्तार

लेखक, साहित्यप्रेमी, कवी लेखनाच्या ओघात एखादी कल्पना, एखादा विचार सूत्ररूपाने, बीजरूपाने समोर ठेवतात. त्यातून प्रेरणा देतात, उद्बोधन करतात, विचार देतात. इथे तुम्हाला अभ्यासासाठी तीन कल्पनांचा विस्तार देत आहे. तो वाचा, आपल्या अनुभवांशी पडताळून पहा, बारकाईने अभ्यासा. मग पाठ्यपुस्तकातील कल्पना शोधून, सुविचार धन शोधून त्याचा विस्तार आपल्या शब्दांत करण्याचा विचारपूर्वक प्रयत्न करा.

१. तुले देले रे देवानं–

बहिणाबाई चौधरी यांनी अस्सल अहिराणी बोलीत 'खोप्यामधी खोपा' ही कविता लिहिली असून, सुगरण पक्ष्याची मादी आपल्या छोट्या चोचीच्या मदतीने सुबक, सुंदर, कलात्मक, मजबूत घरटे बांधते याकडे आपले लक्ष वेधून पाखरांपासून माणसानंही खूप शिकायला हवं, देवानं दिलेल्या गोष्टींचा अधिकाधिक उपयोग करायला हवा, असा विचार कल्पकतेने कल्पनेच्या माध्यमातून समोर ठेवलाय ! सुगरणीची चोच छोटी आहे. पण ती चोच म्हणजेच तिचं करामत करण्याचं, कारागिरी करण्याचं एकमेव साधन आहे. याउलट माणसाला मात्र देवानं दोन हात आणि दहा बोटांचं वरदान दिलं आहे. चिमुकल्या पाखरापासून माणसानं शिकावं, बोध घ्यावा आणि परमेश्वरानं हात-बोटं यांच्या रूपानं कृपालेणं दिलं आहे त्याचा अधिकाधिक उपयोग

करावा, असा विचार या कल्पनेतून बहिणाबाईनं आपल्यासमोर ठेवला आहे. कष्ट, जिद्द, परिश्रम यांच्या बळावर मनात आणलं, तर माणूस दोन हात-दहा बोटं यांचा जास्तीत जास्त उपयोग करून खूप काही चांगलं, नवीन, कौशल्यपूर्ण असं करू शकेल.

२. वृद्ध चंदन ते माझे, नित्य जपले, जपेन–

कवी कृ. ब. निकुंब यांनी आपल्या 'चंदन' या कवितेत कल्पना केली आहे की, आपली आई चंदनाप्रमाणे झिजून आपले जीवन आनंदी करण्याचा प्रयत्न करत आहे. या कल्पनेतून कवीची आईबद्दलची आपुलकी, कृतज्ञता, उदात्त भावना आणि उतराई होण्याची मंगल इच्छा फार समर्पक शब्दांत व्यक्त झाली आहे. 'माझे' या शब्दातून कवीची आईबद्दलची आत्मीयता व्यक्त झाली आहे. स्वतः झिजून इतरांना सुगंधित करणे, शीतलता देणे, हा चंदनाचा विशेष ! आपली वृद्ध आईही आपल्यासाठी आयुष्यभर चंदन बनून झिजली आहे, ही कल्पना करून पुढे कवी सद्भावाने, उत्कटतेने म्हणतोय की चंदनरूपी माय मी आयुष्यभर जपली, ती वृद्ध झाली तरी तिची माया, भावना आजही उत्कट आहे. आजवर मी माझ्या मायमाऊलीला जपले आहे आणि अखेरपर्यंत जपणार आहे. देवपूजेला चंदन वापरतात. पण आई मात्र आपल्या मुलाच्या सुखा-समाधानासाठी झिजते आणि मुलाचं मायेनं करणं, त्याची काळजी घेणं, खस्ता काढणं हीच तिच्या दृष्टीनं खरी देवपूजा असते. चंदनासारखी शीतल, सदैव झिजणारी, कष्टणारी आई. तिला जपणं मुलाचं कर्तव्य आहे, असं जाता जाता हळुवारपणे कवीनं आपल्या मनावर ठसवलं आहे, बिंबवलं आहे.

३. तपश्चर्या केल्याशिवाय प्रकाश दिसणार नाही–

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपल्या विद्यार्थ्यांना शिकवण देताना वरील सहजोद्गार काढले आहेत. यातून त्यांनी कल्पना मांडली आहे, विचार दिला आहे की प्रकाश हवा असेल तर तपश्चर्या करायला हवी. तपश्चर्या केल्याशिवाय प्रकाश दिसणार नाही, हे त्यांचं अनुभवसिद्ध मत आहे. तपश्चर्या म्हणजे तप. कायिक, वाचिक, मानसिक साधना, कठोर-उग्र उपासना. प्रकाश हवा असेल तर तुझं काम तू कर, असं वसतिगृहात राहणाऱ्या आपल्या विद्यार्थ्याला


(शंकरराव खरात यांना) कर्मवीरांनी सांगितलं. ओली लाकडं पेटताना त्रास होतो, पेटवताना कष्ट पडतात, धूर— त्रास सहन करावा लागतो. पण तरीही प्रयत्न चालू ठेवले, तर तपश्चर्या फळास येऊन प्रकाश दिसतो, असं त्यांनी आपल्या कृतीतून सुचवलं. पारतंत्र्याचा, गुलामीचा अंधार दूर करण्यासाठी असंख्य देशभक्तांना उग्र तपश्चर्या करावी लागली. कारागृहातील यमयातना सोसाव्या लागल्या, तेव्हाच कुठे भारत स्वातंत्र्याच्या प्रकाशात न्हाऊन निघाला. अज्ञान, गरिबी, निरक्षरता यांचा अंधार दूर करून ज्ञान, समता, साक्षरता यांचा प्रकाश दिसावा म्हणून अगणित समाजसेवकांनी उभं आयुष्य तपश्चर्येसाठी घालवलं. प्रकाश हवा असेल तर प्रयत्नांची पराकाष्ठा, उग्र तप हवंच.

*

भाग - ३ : निबंध लेखन

(विविधांगी विषय)

वर्णनपर निबंध


(व्यक्ती)
आई, आजी, बाबा
आजोबा, ताई, दादा,
वर्गमित्र, जिवलगमित्र
शिक्षक
अन्य
छंद
प्रवास
प्रयोग
विरंगुळा
आवड
आकांक्षा
आत्मीयता, आपुलकी, जिव्हाळा
माझा/माझी/माझे
उत्कटता, अभिमान, अनुभूती
प्राणी
कुत्रा, मांजर, गाय
अन्य पाळीव प्राणी
खेळगडी, सोबती
पक्षी
पोपट, मोर, हंस,
मैना, कोकिळा
निसर्ग-मित्र
दृष्टिकोण
अनुभव
स्वभाव
वस्तू
खेळणी, घर, खोली, शाळा, बाग, पुस्तक
आवडता— नेता, कवी, साहित्यिक, खेळाडू, वर्तमानपत्र, संत, कला,
ठिकाण
अनुभव — बालपण, घटना, प्रसंग, परिसर, निसर्ग, प्रवास

(व्यक्ती)

गवळी, मोलकरीण, शेजारी,
पाहुणे, सवंगडी, शाळेचा शिपाई
वर्गप्रतिनिधी
माणसांचे नमुने

मातृभाषा
राष्ट्रभाषा
राष्ट्रीय निशाण
संस्कृती
परिसर
प्रेक्षणीय स्थळे
धर्म

एकता, समता, बंधुता, एकात्मता

आमचा/आमची/आमचे

आपलेपणा, सहानुभूती, अभिमान

प्राणिमित्र पक्षिमित्र
निसर्ग सोबती खेळ
शाळेचे मैदान
स्नेहसंमेलन
उत्सव
शिबिरे
सहली, प्रवास सण
परंपरा

सार्वजनिक उत्सव
देवालये
आमचे आदर्श
(शास्त्रज्ञ, समाजसेवक, संत, राष्ट्रभक्त, धर्मग्रंथ)

गाव, शहर, प्रांत, राज्य, देश, विश्व
शास्त्रप्रदर्शन, जत्रा, समाजसेवा,
साक्षरता प्रसार

लिहिण्यापूर्वी थोडेसे

आपण जेव्हा आपल्याबद्दल, अनुभवांबद्दल, सवंगड्यांबद्दल, नातेवाइकांबद्दल, आवडी-निवडीबद्दल, ध्येय-आकांक्षेबद्दल, आवडत्या वस्तूबद्दल, अनुभूतीबद्दल बोलतो, लिहितो तेव्हा त्यातून (शब्दाशब्दांतून) ऐकणाऱ्याला, वाचणाऱ्याला आपल्या मनातील आपुलकी, आत्मीयता, जिव्हाळा, उत्कटता, अभिमान या साऱ्या भावभावना समजतात, जाणवतात. या विषयांवरील आपले निबंध वाचून इतर आपले अनुभव पडताळून पाहतात, विचारांना चालना मिळते, तुमच्या भल्या-बुऱ्या अनुभवातून त्यांना प्रेरणा मिळते, शिकायला मिळते. उदाहरणार्थ 'माझी आई' हा एकच विषय वेगवेगळ्या वयात, वेगवेगळ्या स्तरांवर, विविध भाषांत, वेगवेगळ्या शैलीत लिहिला जाईल. जसजसे वय वाढेल, अनुभवविश्व विस्तारेल, संवेदनशीलता कमी-अधिक प्रमाणात बदलेल, विचारांची दिशा बदलेल, श्रवणाने बहुश्रुतता येईल तसतशी या निबंधाची धाटणी-पद्धती-मांडणी बदलेल. शब्द-भाषा-रचना-शैली तसेच प्रारंभ-मध्य-अन्त याही गोष्टी बदलत जातील. माझी आई-ताई, आजी-मैत्रीण, माझे बाबा, आजोबा, सवंगडी, माझा दादा, वर्गमित्र यासंबंधी लिहिताना ५ वी-६ वी त मुलं वर्णन जास्त करतील. ७ वी-८ वी पासून इतरांचे अनुभव नमूद करतील. ९ वी-१० वीत इतरांची मते आणि त्यावर आपले विचार मांडतील. भाषा अधिकाधिक अलंकारिक पण सहज, रसाळ, आकर्षक होत राहील. सुविचार, सुभाषिते, वाचनात आलेले इतरांचे विचार-मते इतर भाषेतले वेचक

वेधक, काव्यपंक्ती या साऱ्यांचा मेळ घालत विषय अधिक सुंदरतेनं, आकर्षक शैलीत खुलवला, फुलवला जाऊ शकेल.

'माझी आई' या विषयावर लिहिताना हळूहळू काळी आई-जमीन, गोमाता, जन्मभूमी किंवा गीताई, गुरुमाऊली यांचाही लिखाणाच्या ओघात उल्लेख केला जाईल.

निबंध लेखनातले गमभन निष्ठेने गिरवा म्हणजे छान छान निबंध तुम्हीही लिहू शकाल.

माझी आई–

पहिला परिच्छेद– आईचे बाह्य रूप– वर्णन.

दुसरा परिच्छेद– गुणविशेष, स्वभावविशेष, वागणूक, घरातील स्थान.

तिसरा परिच्छेद– तुम्ही आणि आई यांच्यातले नाते, तुमच्या जीवनातील, मनातील तिचे स्थान.

चौथा परिच्छेद– आईची शिकवण, महत्त्वाची वाक्ये, विचार.

शेवट– आईची महती, श्रेष्ठत्व, आदर्श.

माझी आई–

लहानपणी अंगाईगीत गाऊन थोपटून झोपवणारी, मायेनं खाऊ घालणारी, छान छान गोष्टी सांगणारी, आजारी पडल्यावर सेवा करणारी, रात्र-रात्र जाग्रणं करणारी अशी आई तुम्हा-आम्हा सर्वांना खूप खूप आवडते. माझीही आई मला अत्यंत प्रिय आहे. किंबहुना आईच्या रूपात मी देव पाहतो. (आठवी-नववी-दहावी या वर्गातील विद्यार्थी अशी पल्लेदार वाक्यं लिहून निबंधाची सुरुवात करेल.)

तुम्ही मात्र आईबद्दल लिहिताना छोटी छोटी वाक्ये लिहावयाची. चला, आता हा निबंध वाचा, विचार करा. यात तुमच्या अनुभूतीप्रमाणे योग्य तो बदल करा.

*

माझी आई

बेताची उंची, सुदृढ बांधा, हसतमुख चेहरा, ठसठशीत कुंकू. स्वच्छ, नीटनेटकी साधी राहणी हे सारं वर्णन हुबेहूब माझ्या आईचं आहे. शांत चेहरा, सात्त्विक वृत्ती, प्रेमळ, अगत्यशील स्वभाव यांमुळे माझी आई घरादाराला प्रिय आहे. आजी-आजोबांच्या गळ्यातला जणू ताईत आहे.

आळस तिला ठाऊक नाही. कामाचा दांडगा उरक, घरादारावर माया, बारीक लक्ष, नजरेत प्रेमळ धाक, मृदू, गोड बोलणं आणि सर्वांसाठी झीज सोसणं, हसतमुखानं राबत राहणं ही तिची काही खास वैशिष्ट्ये आहेत. खोटं बोललेलं तिला खपत नाही, आळसात वेळ दवडलेला तिला रुचत नाही आणि अव्यवस्थितपणा, गवाळेपणा, बेशिस्त, छानछोकी यांपैकी काहीही तिला मान्य नाही. शिवणकामात तरबेज, सुंदर सुंदर रांगोळ्या काढण्यात पटाईत आणि हातच्या स्वयंपाकाला खास गोडी यामुळे शेजाऱ्यांत-नातेवाइकांत कार्य-समारंभात माझ्या आईला खास आमंत्रण असते.

ती माझ्या चुका मला हळुवारपणे समजावून देते. अभ्यासात मार्गदर्शन करते, शिक्षण, कला, विविध उपक्रम यासाठी ती मला संधी देते, प्रेरणा देते. तिच्या-माझ्यात मित्रत्वाचे, विश्वासाचे, जवळीकेचे नाते आहे. ती माझा आधार आहे, आदर्श आहे. घराला घरपण देणारी माझी आई-माझ्या जीवनात, मनात तिचे स्थान अढळ आहे. माझे कुठलेही यश मी प्रथम तिला सांगतो. तिचा आशीर्वाद मला लाखमोलाचा वाटतो. तिच्या कौतुकात न्हाऊन निघालो की जणू श्रमपरिहार झाल्याचे समाधान मनाला मिळते.

'सुदृढ शरीर, निर्मळ मन खरा दागिना', 'हात घेण्यासाठी नव्हे, इतरांना भरभरून देण्यासाठी पुढे व्हावा.', 'श्रमाची, कष्टांची लाज बाळगू नये, सर्वांशी गोड बोलावं, श्रमाचा पैसा लाखमोलाचा' असे छान छान सुविचार सांगून ती माझ्यावर उत्तम संस्कार करते. मला कुणी नावं ठेवू नयेत, वाईट म्हणू नये यासाठी ती जागरूक असते. मी मोठ्ठा होईन, खूप नाव कमवीन हा विश्वास तिला आहे. मी आईच्या रूपात परमेश्वर पाहतो. आईचे छत्र, तिच्या मायेची ऊब देवानं मला अखरेपर्यंत द्यावी, हीच माझी आंतरिक इच्छा आहे. 'आईचे उपकार फिटती

न काही केल्या' हे मला पटते म्हणूनच माझ्या आईला सुखात ठेवून अखेरपर्यंत तिचा सेवा करत तिच्या प्रेमाच्या ऋणात गुंतून राहणे मला मनापासून आवडते. 'न ऋण जन्मदेचे फिटे' हे तुमच्याही ध्यानात असू दे आणि माझ्या आईप्रमाणे तुमचीही आई तुमच्या हृदयात चिरंतन वसू दे.

नको तो उन्हाळा !

'उष्माघाताने मृत्यू' ही बातमी वाचली की वाटतं, माणसाचा जीव घेणारा हा उन्हाळा नको बुवा ! गोठ्यातल्या गुरांना, शेतात राबणाऱ्या बैलांना जेव्हा हिरवा चारा मिळेनासा होतो, पाण्याचा खडखडाट होतो तेव्हा गरीब बिचाऱ्या शेतकऱ्यांना वाटतं, हा छळणारा उन्हाळा चटकन् सरावा. हैराण करणारा उन्हाळा मुळीच नसावा. उन्हात काम करणाऱ्या मजुराला, तहानेनं शोष पडलेल्या पांथस्थाला, रणरणत्या उन्हात शेतात राबणाऱ्या शेतकऱ्याला सुद्धा उन्हाळा नकोसा वाटतो आणि वैतागून तेही म्हणतात, छे, नको तो उन्हाळा !

घामाच्या धारा लागल्या आहेत, घामोळ्यानं जीव हैराण झालाय; अंगाची लाही लाही होतेय, जीवाची उलघाल होतीय अशा वेळी उन्हाळा केव्हाही नकोसाच वाटणार ! पण आम्हा विद्यार्थ्यांना मात्र अभ्यासातून सुटका करून भरपूर सुट्टी उपभोगू देणारा हा उन्हाळा हवाहवासा वाटतो. नकोसा कसा वाटेल बरं ? अभ्यासाला बुट्टी असली तरीही उन्हामुळे आई खेळायला बाहेर जाऊ देत नाही. सारी दुपार घरात डांबून रहावं लागतं, तेव्हा मात्र उन्हाळा नकोसा होतो. पुण्याच्या माणसांना मात्र उन्हाळा नकोसा वाटतो. लोकलच्या खेचाखेचीत मुंबईकरांना विशेषतः उन्हाळ्यात अधिक त्रास होतो. पाहुण्यांची लागलेली रीघ, त्यामुळे होणारा भरमसाठ खर्च, पाहुणचार करता करता घरातल्या बायकांची दमणूक; कामाचा पिट्टा यामुळे त्यांनाही वाटतं की नको तो उन्हाळा !

आंब्यावर ताव मारायला, थंडगार सरबतं ढोसायला, लज्जतदार पन्हं चाखायला आणि यथेच्छ आइस्क्रीम खायला आम्हा मुलांना उन्हाळ्यातच मिळतं. हे सुख चाखताना मात्र उन्हाळा हवा, असंच वाटतं बरं का ! मला

पोहायला, पाण्यात डुंबायला खूप आवडतं. ती हौस याच ऋतूत भागविता येते, हे खरं असलं तरीही पशुपक्षी, माणसं यांना हैराण करणारा उन्हाळा नकोसाच वाटतो.

मी पक्षी झालो तर !

लहानपणापासून निळ्या आकाशात स्वैर विहार करणारे रंगीबेरंगी पक्षी पाहण्याचा मला खूप नाद आहे. पक्षिनिरीक्षण मंडळाचा मी सदस्यही आहे. त्यामुळे माझ्या मनात नेहमी कल्पना येते, आपणही पक्षी झालो तर ! जादू झाली. अस्मादिकांची ही कल्पना सत्यात उतरली, आणि खरंच मी पक्षी झालो तर ! कोण होईन बरं मी ! गाणारा बुलबुल, झेप घेणारा गरुड, आपल्या चालीतल्या डौलानं भुरळ पाडणारा राजहंस की नयनरम्य पिसारा फैलावून नाचणारा मोर ! कुठला का पक्षी होईना मी– पण एवढं मात्र खरं खूप खूप मजा येईल अनुभवताना ! शाळेत जायला नको, अभ्यासाची कटकट नको. हे करू नको, असं वागू नको– असलं आईचं जाचक बंधन नको, फक्त मजा ! निळ्या आकाशात मनमुक्त उडावं, एकही पैसा खर्च न करता दूरदूरचा प्रवास करावा, नवे नवे देश पहावेत, रम्य वसुंधरा डोळे भरून पहावी, कधी डहाळीवर बसावं, तर कधी झऱ्याकाठी रमावं, आहे की नाही गंमत ?

मी पक्षी झालो तर मला आकाश ठेंगणं वाटेल. मी रानोमाळ रमेन. पंख पसरून आकाशात झेप घेईन, निसर्गाशी गट्टी करेन, झऱ्याचे गोड, थंडगार पाणी पिऊन तहान भागवीन. सुमधुर रसाळ फळांवर यथेच्छ ताव मारीन, गोड गोड गाणी गाऊन लोकांना रिझवीन. छान छान घरटी बांधीन, वाऱ्याशी दोस्ती करीन आणि स्वातंत्र्यातले सुख मनमुराद लुटीन. माणसांच्या मनाला प्रसन्नता देत, आनंदाची खिरापत वाटत सांगेन, 'रडू नका, चिडू नका, अडू नका.' आळसात लोळणाऱ्या माझ्या मित्रांना किलबिलाट करून, पंख फडफडवून सांगेन, 'उठा, कामाला लागा.' बालकवींच्या कवितेत वर्णन केलेला आनंदी पक्षी होऊन मी आनंदाची गाणी गात दशदिशा भारून टाकीन. पण हे सारं केव्हा ? मी पक्षी झालो तरच ना !

पुण्यातील गणेशोत्सव

'पुणं तिथं काय उणं' असं म्हणतात, ते काही खोटं नाही ! पुण्यातल्या बागा, प्रेक्षणीय स्थळं, देवळं सगळंच न्यारं ! पुण्यातील धूमधडाक्यात साजरा होणारा गणेशोत्सवही असाच धमालीचा, उत्साहाचा, आगळावेगळा उत्सव ! त्याची मौजमजा लुटायला, आरास पहायला खेडोपाडीचे आणि आसपासच्या शहरांतले असंख्य लोक भाऊगर्दी करतात.

देशाचं भूषण असलेल्या लोकमान्य टिळकांनी जनतेला एकत्रित करण्यासाठी शिवजयंती व गणेशोत्सव हे दोन सार्वजनिक उत्सव सुरू केले. ही प्रथा पुणेकरांनी उत्साहात, धूमधडाक्यात चालू ठेवली आहे. मंडईचा गणपती आणि दगडूशेटचा गणपती ही पुण्याची दोन मानाची दैवतं आहेत. गणरायाच्या आगमनाची आणि त्याच्या स्वागताची तयारी कित्येक महिने आधी सुरू होते. ठिकठिकाणची गणेश मंडळं वर्गणी गोळा करतात. विविध कार्यक्रम आखतात. नावीन्यपूर्ण सजावट करण्यासाठी एकोप्याने कामाला लागतात. कारागीर आकर्षक मूर्ती बनवतात. डोळ्यांचं पारणं फिटेल अशी कलाकुसरीची सजावट कलाकार करतात. विजेची रोषणाई, सुरेल संगीत, साग्रसंगीत पूजा, मंत्र, आरती, आवर्तनं आणि जयघोष, जल्लोष असा दणक्यात खाजगी व सार्वजनिक गणेशोत्सव साजरा होतो. भाद्रपदातील पहिल्या पक्षातील चतुर्थीला गणरायाला वाजत-गाजवत मिरवत आणून त्याची प्राणप्रतिष्ठा करतात. रंजन, कलानंद आणि शिकवण अशा तिहेरी हेतूंनी सजावट करण्यात येते. दहा दिवस उत्साहाला उधाण येते. दर्शनासाठी भाविकांची रीघ लागते. अनंत चतुर्दशीला थाटामाटात शिस्तीत– मिरवणूक काढतात. ढोल, झांज, लेझीम यांच्या निनादात मिरवणूक दणाणत राहते. बालगोपाल आणि अन्य मंडळी रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून मिरवणूक सोहोळा पाहण्याचा आनंद डोळे भरून घेतात. 'मंगलमूर्ती मोरया', 'गणपती बाप्पा मोरया', 'पुढल्या वर्षी लवकर या' असं म्हणत विसर्जन केलं जातं. येताना आनंद, उत्साह, जल्लोष घेऊन आलेला गणपती जाताना पुणेकरांना हुरहूर लावून जातो आणि निरोप घेताना पुढील वर्षी येण्याचं आश्वासनही जणू देतो.

आमचं पुणं

'पुणं तिथं काय उणं ?', 'पुणं म्हणजे पेशवाई थाट', 'पुणं विद्येचं माहेरघर', 'पुणं म्हणजे पुण्यनगरी' असे सहजोद्गार येता-जाता कानी पडतात आणि मग अभिमानानं म्हणावंसं वाटतं, आहेच मुळी आमचं पुणं छान !

फार पूर्वीपासून आमचे खापर-खापर पणजोबा पुण्यात येऊन स्थायिक झाल्याने आमच्या घराण्याला, घरादाराला, घरातील मंडळींना पुण्याविषयी खास अभिमान आहे. मी तर कुठेही बाहेरगावी गेलो की मित्रांना-तिथल्या माणसांना पुण्याबद्दल रसभरीत माहिती सांगतो आणि मग कॉलर ताठ करत म्हणतो, 'आमचं पुणं एकदम मस्त आहे. मला नाही दुसरीकडे करमत !'

मुंबईचं जीवन भाऊगर्दीचं, धकाधकीचं, धावपळीचं पण आमचं पुणं मात्र आजही शांत आहे. आमचं पुणं युगपुरुष लोकमान्यांच्या पदस्पर्शानं पावन झालेलं आहे. विद्वान, ज्ञानवंत, कलावंत, गुणवंत मंडळींनी आजही आमचं पुणं गजबजलेलं आहे. त्यांच्यामुळे पुण्याचा नावलौकिक, कीर्ती पसरत आहे– वाढत आहे.

शनिवारवाडा, पर्वती, चतुःश्रृंगी, पुणे विद्यापीठ, राजा केळकर म्युझियम, केसरी वाडा अशी कितीतरी प्रेक्षणीय ठिकाणे आहेत. पुण्याचे गल्लीबोळ आजही अस्तित्वात असले, तरी आमचं पुणं झपाट्याने बदलत आहे, वाढत-विस्तारत आहे. पुण्यात अनेक देवी-देवतांची मंदिरे आहेत. रमणीय बागा आहेत. बेलबाग-तुळशीबाग यांना समाजजीवनात स्थान आहे. संसारोपयोगी सर्व वस्तू तुळशीबागेत मिळतात. पुण्यात क्लासेसचं जणू जाळं पसरलंय ! पुणेरी भेळ, पुण्याचे सायकलवाले, चौकाचौकांत उभे असलेले पुतळे ही काही खास वैशिष्ट्ये आहेत. चाळी, वाडे जाऊन आता अपार्टमेंट, ब्लॉक, फ्लॅट संस्कृती येऊ पाहात आहे. सदाशिव पेठ, नाना पेठ, बुधवार पेठ, रविवार पेठ, नारायण पेठ– अशा अनेक पेठा पुण्यातच पाहायला मिळतात. पुण्याची मंडई, पुण्यातील गणेशोत्सव यांची शान निराळीच आहे. स्वच्छ शहर, सुंदर शहर म्हणजे आमचं पुणं व्हावं म्हणून सगळ्यांचे प्रयत्न चालू असतात. मे महिन्याच्या सुट्टीत येऊन पाहुणेमंडळी पुण्याची मजा लुटतात. पुणं आमचं तसं तुमचंही आहे बरं का !

लोकमान्य टिळक

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवीनच मिळवीन.' असं निर्भयपणे ठासून सांगणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आदर्श लोकनेते होते. उभे आयुष्य त्यांनी राष्ट्रहितार्थ वेचले. देशवासियांना स्वातंत्र्याचा कानमंत्र देऊन त्यांनी जागृत केले.

लोकमान्यांचा जन्म रत्नागिरीच्या जवळ चिखली गावात २३ जुलै १८५६ मध्ये झाला. त्यांचे शिक्षण पुण्यात झाले. लहानपणापासून त्यांच्या अंगचे स्वाभिमान, निर्भीडता, बाणेदारपणा, जिद्द हे गुण इतरांना प्रकर्षाने दिसले, जाणवले. शरीर बलदंड व्हावे, म्हणून एक वर्ष शिक्षण सोडून त्यांनी व्यायामाची कास धरली. पुण्यात वकिलीची परीक्षा देतानाच आपले ज्ञान यापुढे लोकशिक्षणासाठी उपयोगात आणावयाचे, असे त्यांनी ठरवले.

जनजागृतीसाठी त्यांनी गणेशोत्सव आणि शिवजयंती हे दोन सार्वजनिक उत्सव सुरू केले. राष्ट्रीय शिक्षण मुलांना द्यावे, म्हणून त्यांनी पुण्यात १८८० मध्ये न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली. विचारजागृती व्हावी म्हणून 'केसरी' व 'मराठा' ही दोन वृत्तपत्रे त्यांनी चालविली. त्यांनी लिहिलेल्या जहाल लेखांनी चिडून जाऊन इंग्रज सरकारने त्यांना तुरुंगात डांबून ठेवले. धीरगंभीर टिळक तुरुंगातही विचलित झाले नाहीत. त्यांनी 'गीतारहस्य' हा बहुमोल ग्रंथ मंडाले येथील तुरुंगातच लिहिला.

देशकार्य करता करता त्यांनी आपल्या चरित्र आणि चारित्र्याचा ठसा दुसऱ्यांवर उमटविला. जनतेमध्ये त्यांनी सद्विचारांचे बीज पेरले. त्यांचे वागणे, बोलणे स्पष्ट, परखड, चोख होते. सरकारला ते कधीही शरण गेले नाहीत. परकी सत्तेपुढे ते कधी नमले नाहीत. देशसेवेसाठी त्यांनी उभे जीवन झोकून दिले. साधी राहणी, उच्च विचारसरणी यांचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे लोकमान्य टिळक. देशकार्य करत असतानाच १ ऑगस्ट १९२० रोजी ते अनंतात विलीन झाले. कार्यरूपाने मात्र ते सदैव अमर आहेत. या लोकोत्तर पुरुषाची शिकवण आठवत त्यानुसार आपण वागणं, हे नितान्त आवश्यक आहे. हीच खरी आदरांजली.

पक्षी माझे गुरू

हल्ली भल्या पहाटे मी न कुरकुरता उठतो. ही सवय मला आजोबांनी लावलीय, तशीच ती पहाटेच्या वेळी किलबिलाट करून उठविणाऱ्या पक्ष्यांनीही लावलीय. 'ऊठ, बिछाना सोड, आळस झटक, कामाला लाग' असं माझ्या अंगणात बागडणाऱ्या, खिडकीच्या गजावर बसून चिवचिवणाऱ्या आणि कधी तर माझ्या गादीपर्यंत येऊन उडणाऱ्या पाखरांनी मला वेळोवेळी सांगितलंय. हे पक्षी माझे गुरू आहेत, असं मी म्हणूनच मानतो.

माझी आजी रोज नेमानं चिमण्या पाखरांसाठी धान्याचे दाणे टाकते. ते टिपायला चिमण्या आल्या की बघत राहतो. अंगणात घाणही असते, माती, दगड इत्यादी वस्तू पडलेल्या असतात. पण या हुशार चिमण्या नेमके दाणेच टिपतात. त्या जणू मला शिकवतात, 'चांगलं वेचावं, वाईट सोडून द्यावं.' माझ्या आईनं तिच्या लहानपणची कविता सांगून माझा चिमणीविषयीचा आपलेपणा – आदर वाढवलाय–. ही कविता वाचून तुम्हालाही पटेल की 'पक्षी माझे गुरू' असं मी का मानतो ते !

चिमणीपासुनि शिकुनि घेई ।
बाळा तू आनंद ॥
रडणे-कढणे सोडुनि देई ।
भलता सलता छंद ॥
मातीमध्ये जिकडे तिकडे ।
पडले सुंदर दाणे ॥
कसे वेचुनि घ्यावे त्याते ।
हीच खरोखर जाणे ॥

चिंता, व्यथा, काळजी न करता आनंदात रहा, चांगलं घ्या हे पक्षी सांगतात. म्हणून पक्षी माझेच नव्हे, तर तुमचे-आमचे सर्वांचे गुरू आहेत. उंच, उंच, निळ्या आकाशात झेप घेणारा चिमुकला पक्षी मला सांगतो, 'निर्भय बन, यश हवं असेल तर झेप घे. पुढे, पुढे वर, वर जा, शिखर गाठ.'

मला पक्षिमित्र खूप आवडतात. सुट्टीच्या दिवशी माझ्या इतर मित्रांसमवेत

मी पक्षीनिरीक्षण करत रानोमाळी, डोंगरदऱ्यांत भटकतो. एकाग्र मनाने घरटी बांधणारे पक्षी जणू मला सांगतात, 'काम फत्ते होण्यासाठी एकाग्रता हवी, चिकाटी हवी, जिद्द हवी. माझ्यासारखा स्वावलंबी हो. माझा चारा मी आणतो, माझे घरटे मी बांधतो, लांबचा प्रवास करून दूरदूरचे प्रदेश साहसाने मी धुंडाळतो. माझी चोच दिसायला लहान आहे, पण तिचा उपयोग मला घरटे बांधताना होतो. तुला तर देवानं दोन हात दिलेत. आळस झटक आणि उद्योगाला लाग.'

राघू-मैना मला गोड बोलायला शिकवतात. कोकिळा गाण्याचा छंद, नाद शिकवते. गरुड झेप घ्यायला सुचवतो. राजहंस नीर-क्षीर विवेकी हो असे सांगतो. मोर 'इतरांना रिझव' असे सांगतो. हे सारे पक्षी म्हणूनच माझे गुरू आहेत. ते मला आनंद, स्वावलंबन, जिद्द, चिकाटी, निर्भयता हे गुण अंगी बाण अशी शिकवण देतात. म्हणूनच मला ते गुरुस्थानी आहेत. या बिनभिंतीच्या शाळेत त्यांच्याबरोबर वावरताना मी खूप काही चांगल्या गोष्टी शिकतो. माझ्याप्रमाणेच तुम्हीही पक्ष्यांना आपले गुरू माना आणि आपला उत्कर्ष करून घ्या.

मी कचराकुंडी बोलतेय !

इच्छा नसतानाही अवतीभवतीच नव्हे, तर अंगाखांद्यावर, पोटात जिकडे तिकडे घाण बाळगतीय मी ! अंगाला कुबट वास, दुर्गंधी हवेत पसरलेली आणि तुडुंबलेली, नव्हे— ओसंडून वाहणारी मी ! या घाणीला खरं तर तुम्ही माणसंच जबाबदार आहात. पण गरीब बिचारी मी— इमाने इतबारे सेवा करून मला पदरी काय मिळतंय तर— येणाऱ्या-जाणाऱ्यांचे शिव्याशाप, नाकं मुरडणं, उपेक्षा, घृणा ! खरं तर या घाणेरड्या वागण्याचाच त्रास होतोय बघ ! तू लहान आहेस, मनानं निष्पाप आहेस, तुम्ही मुलं मनात आणलं, तर माझ्यातली घाण दूर करून मला सेवेची संधी देऊ शकाल. मोठी माणसं आपल्याच कामात गर्क असतात. अवतीभवती असणाऱ्या दुःखी-कष्टी माणसांकडे त्यांचं लक्ष जात नाही. मग मी

तर काय बोलून चालून एक कचराकुंडी !

आजही मला तो दिवस आठवतोय ! तुमच्या कलानंद सोसायटीत तुमच्याबरोबर मीही वस्तीला आले. सोसायटीतले रस्ते स्वच्छ, आवार स्वच्छ, मीही जाड पत्र्याची, चमकदार लाल रंगाची आणि हो, आतून-बाहेरून अगदी चकाचक असलेली ! १००-१२५ घरांची घाण पोटात ठेवत आपल्याला सेवा करायचीच ही तेव्हाही जाणीव होती मला ! आपला जन्म घाण स्वीकारत मोबदल्यात सेवा करण्याचा आहे हेही मला ठाऊक होते पण—

सोसायटीत आल्यावर प्रत्येकजण मालक झाला, सार्वजनिक स्वच्छतेत आपलाही सहभाग हवा हे जो-तो विसरला. माणसं यायला लागली, कचऱ्याच्या बादल्या तिन्ही त्रिकाल माझ्यात येऊन पडू लागल्या. मोलकरणी लांबनंच कचऱ्याचे डबे रिकामे करायला लागल्या. घाण वाढायला लागली. भर पडत होती पण कचरावाहतूक कामगारांकडून उपसा वेळेवर होत नव्हता. खरकटं अन्न, भाज्यांची सालं, कागदाचे कपटे, जुने झालेले कापडाचे बोळे, चिंध्या, कापूस, मेलेली जनावरे, नासकी-कुजकी-सडलेली फळं सारं माझ्यात येऊन पडायला लागलं. मी निमूटपणे सोसत होते. पाय असते तर चक्क उठले असते आणि गेले असते त्या हॅपी कॉलनीत सेवा करायला ! अरे, का म्हणून काय विचारतोस ? तिथले नागरिक म्हणे, आवारातली कचराकुंडी स्वतः स्वच्छ ठेवतात. शास्त्रात तुम्ही शिकता. नागरिकशास्त्रातही तुम्हाला स्वच्छतेसंबंधी, कर्तव्यासंबंधी खूप सांगितलं जातं. परीक्षेत यासंबंधीची उत्तरं बरोबर लिहिता, पण प्रत्यक्षात मात्र स्वच्छता, आरोग्य, नागरिक कर्तव्य याकडे चक्क डोळेझाक करता, पाठ फिरविता.

मुलांनो, घाणीमुळे आरोग्य बिघडतं, स्वास्थ्य हरवतं, हवा प्रदूषित होते, हे ठाऊक आहे ना तुम्हाला ? मग चला, लागा पाहू कामाला ! 'हात फिरे तिथे लक्ष्मी वसे' असं नुसतं म्हणून काय उपयोग ? प्रत्यक्ष कामाला लागू या. घाण करणार नाही आणि घाण ठेवणार नाही, असा निश्चय करा आणि मला सेवेची संधी द्या. सेवेतला आनंदही मिळवून द्या.

आमचा दूधवाला : रामूभैय्या

पुण्यात आजकाल घरोघरी दूध हे पिशव्यांतून किंवा बाटल्यांतून येतं. कात्रज डेअरीचं दूध, चितळ्यांचं दूध, फडके डेअरीचं दूध, अभ्यंकर डेअरी, साने डेअरी अशा अनेक ठिकाणचं दूध घरपोच केलं जातं. दूधकेंद्र जवळ असेल, तर केंद्रावर जाऊन भल्या पहाटे रांगेत उभं राहून दूध आणलं जातं. आमच्याकडे मात्र गेली दोन तपं न चुकता रामूभैय्या दुधाचा रतीब घालतात. साधी पण स्वच्छ राहणी, धिप्पाड देहयष्टी, पिळदार मिशा आणि शांत-अदबशीर वागणं ही रामूभैयांची वैशिष्ट्ये आहेत. लहानपणी त्यांच्या मिशा पाहून मी खूप घाबरायचो. पण त्यांच्या मळ्यातले ताजे पेरू, शेंगा, बोरं हा रानमेवा ते आम्हाला आणायला लागले, 'काय धाकलं मालक, बरं आहे ना !' असं विचारायला लागले आणि मग आम्हा बालगोपाळांना ते आपल्या घरातले, नात्यातले वाटायला लागले.

त्यांच्या दुधाचा भाव इतरांपेक्षा जास्त आहे खरा, पण दाट गंधासारखे दूध, चोख माप आणि खाडा नाही. रोज नेमानं एका ठराविक वेळी येणं यामुळे आमच्या आसपास राहणाऱ्या अनेक बिऱ्हाडांत त्यांच्याच दुधाला मागणी आहे. त्यांचा रतीब कुणालाही बंद करावासा वाटत नाही तो या गुणांमुळेच !

भल्या पहाटे धारा काढणं, गोठ्यातली कामं उरकणं आणि घरोघरी जाऊन रतीब घालणं, परत सायंकाळी सफाई-धारा काढणं ही काम असतातच. रामूभैय्या कष्टाळू आहेत, मनानं सच्चे आहेत. मोठमोठ्या बरण्या-शिगोशीग भरलेल्या वाहून नेणं, जिने चढणं-उतरणं ही सगळी कामं खूप कष्टाचीच आहेत. आळस त्यांना ठाऊक नाही, कुठल्याही कामाची लाज नाही. आपल्या जनावरांबद्दल प्रेम-आस्था बाळगून त्यांची काळजी घेणं ह्यामुळे आमचे रामूभैय्या आम्हाला वेगळे वाटतात, हवेसे वाटतात.

सूर्योदय

उदयाचलि रवी आला ।
पसरित तेजा दाही दिशांना ॥

रात्रीच्या अंधाराला हुसकावून लावत हळूहळू सूर्यभगवान जेव्हा प्रकट होतात तेव्हा दिशा फाकतात. तेजाळलेले सूर्यबिंब ढगांचा पडदा बाजूस सारून मोठ्या डौलात, दिमाखात अवतरते. त्या सूर्योदयाचे चित्र रेखाटताना शब्द अपुरे पडतात. निसर्गाच्या साम्राज्यात सूर्योदय आणि सूर्यास्त या दोन्हीही गोष्टी नित्य नेमाच्या असतात. पण आपण करंटे- नभी सूर्याचे आगमन झाले तरीही बऱ्याच वेळा झोपलेले असतो. सूर्योदय-सूर्यास्ताची न्यारी, अवर्णनीय शोभा पाहण्याचं भाग्य आपण अनुभवत नाही. घराच्या गच्चीतून, पूर्वेकडच्या खिडकीतून, रानोमाळी भटकताना, टेकडीवर फिरायला गेलं असताना, महाबळेश्वर, माथेरान, उटी, दार्जिलिंग, सागरतीरी, नदीकिनारी यांपैकी कुठल्याही ठिकाणी जाऊन सूर्योदय-सूर्यास्ताची शोभा पाहताना जणू डोळ्यांचं पारणं फिटतं.

दैनंदिन चाकोरीत आपण गुंततो, गुरफटतो आणि निसर्गरूपी खजिन्याचा जणू आपल्याला विसर पडतो. सूर्योदयाची अवर्णनीय शोभा लुटायला, अनुभवायला रसिकता हवी. लवकर उठायची सवय हवी आणि मुख्य म्हणजे झोपेचा मोह सोडायला हवा. भल्या पहाटे उठून निसर्गाच्या सान्निध्यात रमायची ओढ हवी.

रोज सूर्य उगवतो अन् रोज न चुकता मावळतोही ! पण या दोन्हीही वेळी आकाशातली रंगांची उधळण न्यारी. डोंगरावर जाऊन सूर्योदय-सूर्यास्ताची शोभा अनुभवणं, डोळ्यांत साठवणं हा एक अलौकिक अनुभव आहे.

गडद अंधारात निघून डोंगरावर जायचं अन् मग सूर्योदय-सूर्यास्ताची अवीट गोडी चाखायची. अंधार कमी होत जातो. हळूहळू वाटा, डोंगर, झाडं यांचं दर्शन घडायला लागतं. प्रथम आकाश गुलाबी होतं, तांबड फुटतं. एकाएकी डोंगराच्या कडेवर एक लाल सोनेरी रेघ दिसायला लागते. रेषा—अर्धवर्तुळ बघता बघता पूर्णगोल होत जाते. डोंगराच्या बाहेर पडून तो लाल लाल सोन्याचा गोळा भोवतीचा अंधार दूर करत विविध रंगांची उधळण करत पुढे पुढे

सरकायला लागतो. दिशा फाकायला लागतात. प्रकाशानं, तेजानं सृष्टी न्हाऊन निघते, तेज वाढत जाते. अशा तेजस्वी सूर्याकडे पाहणे आपल्याला अशक्य होते. तिमिरातून तेजाकडे नेणारा, आपल्या कोवळ्या सोनेरी किरणांनी चराचर सृष्टीला प्रसन्न करणारा सूर्य तो उदयास येताना आपली सोनेरी पावले जणू डौलात-दिमाखात टाकतो अन् सगळ्यांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतो. डोंगराआड दडी मारून बसलेला सूर्य नेमाने, न चुकता प्रकाशाची उधळण करण्यासाठी कसा येतो, हे एक न सुटणारे जणू ईश्वरी कोडे आहे. हा सूर्य अस्ताला जातो तेव्हा 'कुठे बुडाला पलीकडील तो सोन्याचा गोळा ?' असा प्रश्न तुमच्या-आमच्या मनात निर्माण करतो.

निसर्गाचा प्रकोप

निसर्ग माझा सखा, निसर्ग माझी माता । निसर्ग माझा गुरू, निसर्ग कल्पतरू । असं ममत्व, अशी आपुलकी वाटणारं, असं नातं निर्माण करणारा निसर्ग उदार आहे. तो आपल्याला अंगाखांद्यावर खेळू-बागडू-वाढू देतो. निसर्ग महान जादूगार आहे.

झाडं, वेली, आकाश, सागर, नद्या, झरे, ढग, अखिल सृष्टी ही त्याचीच रूपे आहेत. तो दयाळू आहे, दानी आहे. सौंदर्याचा खजिना रिता करत सर्वांना सुखविणारा आहे. पण तो कधी कधी रागवतो. गमजा करणाऱ्या मानवाला जणू फटकारतो. मग निसर्गाचा प्रकोप झाला असं आपल्याला वाटतं, जाणवतं.

धरणीकंप होतो. हादरे बसून भूकंपात हजारो बेघर होतात, गावंच्या गावं उद्ध्वस्त होतात. लाव्हा उसळतो, ज्वालामुखी पेट घेतो, नद्यांना पूर येतो, महापुरात प्राणहानी, वित्तहानी, मनुष्यहानी मोठ्या प्रमाणावर होते. गावं, शहरं जलमय होतात. तुफान होते, वीज कडाडते-कोसळते, अतिवृष्टी आणि अनावृष्टीमुळे दुष्काळ पडतो. अशा रीतीने जेव्हा निसर्ग कोपतो तेव्हा या प्रकोपात हाहाकार उडतो. सारं अशान्त, अशाश्वत वाटू लागतं. देश संकटात सापडतो, विनाश अटळ असतो.

पण हाच प्रकोप आपल्याला शिकवतोही. जात, धर्म, विषमता, भेद, भांडणतंटे, वैमनस्य– हे सारे विसरून माणसं एक होतात. एकजुटीने, एकदिलाने संकटांना सामोरे जातात. जगाच्या कानाकोपऱ्यांतून प्रकोपग्रस्त भागाकडे मदतीचा ओघ येऊ लागतो. क्षुद्र, स्वार्थी वृत्ती सोडून माणसं एकमेकांना मदत करायला, एकमेकांसाठी खस्ता काढायला, कष्ट करायला, त्याग करायला तयार होतात. निसर्ग प्रकोपाचा फटका गरीब-श्रीमंत, उच्च-नीच, शिक्षित-अशिक्षित साऱ्यांना सारखाच बसतो. माणसातली माणुसकी जागी होते. हेही नसे थोडके.

कष्टांचे महत्त्व

तुझ्या कामामधून, तुझ्या घामामधून ।
उद्या पिकंल सोन्याची रास ॥

किंवा 'हरामाचा पैसा नको, कष्टाची मीठ-भाकरी चांगली' किंवा 'काम करा काम, घाम गाळा घाम ।' या साऱ्या ओळी आपल्याला नकळत कष्टांचे महत्त्व सांगतात. शेतकरी वादळवाऱ्यात, पावसापाण्यात, रणरणत्या उन्हात राबतात. निढळाचा घाम गाळतात, तेव्हाच शेतं पिकतात, कणसं डोलायला लागतात. गिरणीत, खाणीत, बांधकामावर असंख्य मजूर भरपूर कष्ट करतात. अन्न, वस्त्र, निवारा ह्या आपल्या गरजा या कष्टकरी- कामकऱ्यांच्या श्रमांमुळे पूर्ण होतात.

आळस हा माणसाचा फार मोठा शत्रू आहे. बऱ्याच जणांना श्रमायला, कष्ट करायला आवडत नाही. श्रम करण्याची लाज बाळगणं खरं तर चूक आहे. कष्टाशिवाय भाकर नाही आणि परिश्रमाशिवाय विकास नाही, प्रगती नाही. स्वावलंबन, श्रमातले सुख, कष्टांचे महत्त्व ज्याला कळते, पटते त्याचा नेहमी उत्कर्षच होतो. कुठलेही काम लहान-मोठे, क्षुल्लक-क्षुद्र-मोठे, चांगले-वाईट आहे, असं मानणं चुकीचं आहे.

महात्मा गांधी यांनी सूत कताई करायला लावून जनतेला कष्टांचे महत्त्व पटवून दिले. संत गाडगेबाबांची शिकवण असे की, 'काम केल्याशिवाय कोणाकडेही काहीही खाऊ नये.' महर्षी कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील, सेनापती

बापट, ईश्वरचंद्र विद्यासागर इत्यादी अनेकांनी कष्टांचे महत्त्व ओळखून इतरांना आपल्या आचरणातून कष्ट करण्याची प्रेरणा दिली. जपान या उद्योगप्रिय देशाने कष्टांचे महत्त्व ओळखून प्रगतीच्या दिशेने पावले टाकली. तुम्ही-आम्हीही म्हणूनच भरपूर कष्ट करायला हवेत. महत्त्व ओळखून वागायला हवे.

गुढीपाडवा

गुढीपाडवा सुखवित सकला ।
नववर्षाचा नव दिन आला ॥

ह्या दोन ओळींत गुढीपाडव्याचं महत्त्व किती छान सांगितलं आहे नाही ! चैत्र शुद्ध प्रतिपदा– वर्षप्रतिपदा म्हणजेच गुढीपाडवा. नव्या वर्षाचा शुभारंभी दिवस. सगळ्यांना सुख देणारा, आनंदाची खिरापत वाटणारा असा हा गुढीपाडवा. साडेतीन शुभमुहूर्तांपैकी एक खास मुहूर्त.

हिंदू पंचांगानुसार नव्या वर्षाचा शुभारंभ या दिवशी होतो. शालिवाहन शकाची सुरुवात या दिवशी झाली. गुढी उभारून लोक आपला आनंद व्यक्त करतात. चौदा वर्षांचा वनवास संपवून प्रभू रामचंद्र याच दिवशी अयोध्या नगरीत परतले. असं मानतात, की ब्रह्मदेवाने ही सृष्टी निर्मिली ती याच दिवशी. यामुळे फार पुरातन कालापासून गुढीच्या रूपात घरोघरी जणू विजयपताका, गौरवपताका उभारली जाते. भल्या पहाटे शुचिर्भूत होऊन उंच काठीला वस्त्र गुंडाळून वर चंबू किंवा तांब्या ठेवून ही गुढी उभारतात. साखरेची गाठी, हार घालून तिची पूजा करतात. गोडधोड करून नैवेद्य दाखवितात. या दिवशी नव्या पंचांगाचीही पूजा करतात. या मंगलदिवशी गुळाचा खडा आणि कडुनिंबाचे पान खाण्याची प्रथा आहे.

शुभकार्याची सुरुवात करण्याची प्रेरणा देणारा, नवे संकल्प, नव्या योजना, नवे बेत करण्याची स्फूर्ती जणू या दिवशी मिळते.

आला चैत्राचा महिना ।
सुख मनात मावेना ॥

नवे संकल्प योजना ।
याच दिवशी आखा ना ॥

असंही ही गुढी जणू सर्वांना सांगत सुचवत असते.

आठवड्याचा बाजार

शहरात हमरस्त्याला, चौकाचौकांत, इतकेच नव्हे, तर अगदी गल्लीबोळांतसुद्धा हवी ती वस्तू हव्या त्या वेळी सहजतेनं मिळू शकते. आकर्षक, मोहमयी, झगमगाटाच्या प्रसन्न वातावरणात आम्हा शहरवासियांची खरेदी होते. पण याउलट खेडोपाडी मात्र आठवड्यातून एकदाच हवी असलेली, गरजेची वस्तू खरेदी करता येते. म्हणूनच खेड्यांतील लोकांच्या दृष्टीनं बाजारचा दिवस महत्त्वाचा, आनंदाचा आणि चैतन्याचाही !

सुट्टीत मी दरवर्षी पिंपळनेरला मामाच्या गावी जातो. तेव्हा हटकून बाजारात फेरफटका मारतो. शिक्षक वर्गात नसले आणि गडबड-गोंधळ सुरू झाला की, शेजारच्या वर्गातले शिक्षक मध्येच येऊन चिडून विचारतात, "काय बाजारबिजार भरवला आहे की काय ?" मामाच्या गावी बाजारात गेल्यावर याची प्रचीती येते. मालाची खरेदी-विक्री करायला एकच झुंबड उठलेली दिसते. आरडाओरडा, गलका, गोंधळ आणि मूर्तिमंत चैतन्य म्हणजे गावचा बाजार. हा आठवड्याचा बाजार बहुधा शनिवारी भरतो.

आदल्या दिवसापासून आसपासच्या खेड्यांत राहणारे खेडूत आपापल्या मालाची लहान-मोठी गाठोडी घेऊन मोठ्या आशेने गावच्या बाजारात जणू हजेरी लावायला येतात. प्रत्येकाला बाजारात बसण्यासाठी चांगली मोक्याची जागा हवी असते. अन्नधान्य, संसारोपयोगी वस्तू, भाजीपाला, फळं सारं काही बाजारात मिळतं. एका बाजूला जुन्या वस्तूंचा तसंच जनावरांचा बाजारही भरतो. कुणी चालत तर कुणी बैलगाड्यातून तर कुणी सायकलीवरून येतात. आपला माल विकतात आणि मग आलेल्या पैशांतून आपल्या गरजेच्या वस्तू विकत घेतात.

बाजार म्हणजे मौजमजा, गोंधळ, जल्लोष, उत्साह, चैतन्य. बाजारच्या दिवशी शाळा लवकर सुटते. आईबाबांबरोबर जाऊन खाऊ, खेळणी, कपडे खरेदी करताना मुलांना खूप मजा वाटते. बाजारच्या दिवशी जत्रेचं स्वरूप येतं. बाजारात गेलं की वेळ कसा जातो हेच कळत नाही. किंमत विचारणं, घासाघीस करणं यातही एक वेगळी गंमत असते. अंधार पडतो. बाजार उठतो. माणसं एकमेकांचा निरोप घेत घरी परततात. आठवड्याच्या बाजाराकडे म्हणून खेडोपाडीची माणसं डोळे लावून बसतात.

अशी झाली माझी फजिती !

'मान सांगावा जनात आणि अपमान ठेवावा मनात' असं म्हणतात खरं, पण निबंधाच्या निमित्ताने मी माझी फजिती कशी झाली ते सांगणार आहे. ऐका हं !

माझी कथाकथनाची सवय वर्गात सर्वांना माहिती आहे. मला कथाकथनाचे इतके वेड आहे की, कथाकथनाचा एकही कार्यक्रम मी सोडत नाही. श्री. द. मा. मिरासदार हे माझे आवडते कथाकथनकार. त्यांचा एकही कार्यक्रम मी बुडवला नाही. जर एखादी स्पर्धा असेल, तर मग आमचा सहभाग निश्चित असतो (हे शाळेपुरतंच मर्यादित. आंतरशालेय स्पर्धेत भाग घ्यायची छातीच होत नाही आपली.) जणू टेनिससारखं पहिलं मानांकन आणि पहिलं बक्षीससुद्धा. अशा ह्या सवयीनंच माझा घात केला.

झाले काय की, इतिहासाचा तास होता पण सर न आल्याने तो ऑफ होता. सर्व मित्रांनी मला पुढं येऊन कथाकथन करण्यास सांगितले. सर्वांच्या शिफारशीवरून तानाजी कोंडाणा सर करतो तो प्रसंग घेतला. कथाकथनाला सुरुवात झाली आणि सर्वजण मंत्रमुग्ध झाले. तानाजीची उदेभानबरोबर लढाई चालू असताना वर्गात देखील लढाई हातघाईवर आली होती. वर्गात गोंधळ झाला.

त्या गोंधळात मुख्याध्यापक केव्हा येऊन उभे राहिले, हे कळलेच नाही. वर्गातल्या एका मुलाने ते पाहिले आणि लागलीच वर्ग विसावला. माझ्यात

संचारलेला तानाजी अचानक उतरला. सर्वजण का गप्प झाले ते बघण्यास मी दाराकडे पाहिले. दारात उभ्या असलेल्या मुख्याध्यापकांची रागीट नजर व छडीवरून फिरणारे हात, बरंच काही सांगून गेले. पाच छड्या खाऊन मुकाट्यानं जागेवर जाऊन बसलो. मित्रांचा अस्सा राग आला म्हणता की काही विचारूच नका ! मुख्याध्यापक गेल्यावर सर्व मित्र माझ्याभोवती गोळा झाले. म्हणाले, "तुझं कथाकथन खरंच खूप सुंदर होतं, पण सॉरी दोस्त ! आमच्यामुळे तुला मार खावा लागला." माझा राग कुठच्याकुठे पळून गेला. अशी झाली माझी फजिती. पण तुम्ही कोणालाही सांगू नका बरं का. नाहीतर माझी फटफजिती होईल.

आता कानाला खडा लावला की, वर्गात कथाकथन करायचं नाही.

यंत्र शाप की वरदान

यंत्र म्हणजे आजच्या युगातील देव, दैत्य आणि जादूगारही. त्याची किमया बघूनच सर्वजण थक्क होतात. असे हे यंत्र काम सोपे, सुलभ व सुबक व्हावे म्हणून निर्माण केले गेले आहे.

ह्या यंत्रामुळे 'घंटों का काम मिनिटोमें होने लगा ।' काम अतिशय सुबक आणि सुंदर पाहून मानवाने स्वतःचीच पाठ थोपटली आणि पुढे संशोधन जारी ठेवले. पूर्वी जी कामं करायला तासच्या तास लागे, ते काम एका तासात होऊ लागले. घराघरांतून स्वयंपाकासाटी जाते जाऊन मिक्सर अन् ओव्हन आले. मग मानवाने अजून संशोधन करून वाहने तयार केली. विमाने, रेल्वे, दुचाकी वाहने, मोटारगाड्या निर्माण झाल्या. वाहतूक सुलभ झाली. माणसाने वीज शोधली. घराघरांत विजेचा वापर मोठ्या प्रमाणावर होऊ लागला. दूरध्वनीने परदेशातील माणसांशी सुद्धा बोलता येऊ लागले. दूरदर्शन आले आणि एक करमणुकीचे साधन उपलब्ध झाले. शिक्षण क्षेत्रात संगणक आले. इलेक्ट्रॉनिक्स– इलेक्ट्रिक अशा अभ्यासाच्या शाखा निर्माण झाल्या. अवकाश सफरीसाठी माणसाने रॉकेटस् तयार केली. त्यात बसून तो जाऊ लागला. शेतीत बदल झाले. शेती ट्रॅक्टरच्या साहाय्याने होऊ लागली. युद्धातली विविध शस्त्रास्त्रे निर्माण झाली.

फायदा आणि तोटा या एकाच नाण्याच्या बाजू असतात. यंत्र आल्याने माणसे कमी झाली अन् बेकारीची समस्या वाढली. वाहनामुळे प्रदूषण होऊ लागले. रॉकेटस्मुळे ध्वनिप्रदूषण होऊ लागले. वीज वापरल्याने ती संपू लागली. विविध शोधांमुळे निसर्गाचे संतुलन ढळले. माणूस यंत्राच्या आहारी जाऊन माणूसपण गमावून बसला. फ्लॅट संस्कृती आली. माणूस यांत्रिक बनला.

आपण मनात आणले तर अग्नीचा उपयोग जाळण्यासाठी आणि अन्न शिजवण्यासही करता येतो. त्याप्रमाणे हे यंत्र चांगल्या कामास वापरायचे का वाईट, तेही आपणच ठरवायचे आहे. म्हणतात ना, आपण चष्मा जसा घालतो तसे जग दिसते. विवेकानंद म्हणतात, 'कोणतीही कृती अथवा वस्तू वाईट नसतात. आपले विचारच तसे बनवतात.' आता आपणच ठरवायचे,

'यंत्र शाप की वरदान ?'

राष्ट्रीय सण असे साजरे करूया !

राष्ट्रीय सण म्हणजे सबंध राष्ट्राने, विविध जातीधर्मांतील लोकांनी स्वीकारलेले सण. १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी हे आपले राष्ट्रीय सण आहेत. १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश स्वतंत्र झाला. २६ जानेवारी १९५० रोजी भारत प्रजासत्ताक राष्ट्र बनल्याची घोषणा झाली. म्हणूनच या राष्ट्रीय सणांना महत्त्व आहे. हे राष्ट्रीय सण दरवर्षी मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात.

राष्ट्रीय सण हे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक आहेत. हिंदू, मुसलमान, शीख वगैरे सर्वधर्मीय लोक हा सण साजरा करतात. १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला. पण आता त्याचे स्वातंत्र्य टिकवणे आपल्याच हाती आहे. राष्ट्रीय सणांमुळे प्रत्येकाच्या मनात भारतमातेविषयीचा अभिमान जागृत होतो. आपल्या तिरंगी राष्ट्रध्वजाला वंदन करताना हा ध्वज असाच चिरकाल फडकत रहावा, अशी भावना निर्माण होते. या ध्वजाखाली 'भारत माझा देश आहे. . .' ही प्रतिज्ञा आपण घेतो. आपला देश व देशबांधवांशी निष्ठा राखण्याचा आपण प्रयत्न

करतो.

१५ ऑगस्ट व २६ जानेवारीस सर्व शाळांत, कॉलेजांत, महापालिकेत, संसदेत साऱ्या देशभर हा सण साजरा होतो. या वेळी भारताचा तिरंगी झेंडा मोठ्या डौलाने फडकू लागतो. या वेळी त्या त्या जागेच्या मोठ्या अधिकाऱ्यांकडून ध्वजारोहण होते. ध्वजवंदन होते. आणि सर्वजण प्रतिज्ञा म्हणतात. यानंतर राष्ट्रगीत होते आणि कार्यक्रम संपतो. स्वातंत्र्यासाठी ज्या थोर व्यक्तींनी आपले सर्वस्व अर्पण केले आहे त्यांची आठवण, शिकवण, आचरण, समर्पण यांना पुन्हा उजाळा मिळतो. त्यांचे सद्‌गुण, राष्ट्रभक्ती, ध्येयनिष्ठा, स्वावलंबन यांचा आपण स्वीकार करावा. त्यांच्याप्रमाणेच आपले सर्वस्व राष्ट्रोन्नतीसाठी पणास लावावे, हाच यामागचा हेतू आहे. राष्ट्राविषयीची जी भावना आपली शालेय शिक्षणामुळे बनत नाही ती अशा कार्यक्रमांतून बनते. तेव्हा 'मी राष्ट्रासाठी काही करीन, राष्ट्राचे नाव उज्ज्वल करीन. 'आधी राष्ट्र मग मी.' या भावनेनंच हे राष्ट्रीय सण यापुढे साजरे करूया..

जीवनात खेळांचे महत्त्व

आज या जगात प्रत्येक गोष्टीत स्पर्धा चालू आहे. जो तो पुढे जाण्यासाठी दुसऱ्याचा पाय ओढत आहे. अभ्यासात स्पर्धा, नोकरीची स्पर्धा, राजकारणात स्पर्धा आणि खेळात तर कित्येक स्पर्धा आहेत. पण या स्पर्धेत जर जिंकायचे असेल, तर आरोग्याचीही काळजी घ्यायला पाहिजे.

प्रत्येक माणसाला काहीना काही व्यायाम हा जरुरी असतो. विविध खेळांतून तो आपल्याला मिळतही असतो. पण फूटबॉलमध्ये धक्काबुक्की होते. क्रिकेटमध्ये लागते. धावताना पाय दुखतो असे म्हटले, तर आपण खेळापासून दूर होतो. खिलाडू वृत्ती नाहीशी होते. व्यायाम होत नाही.

खेळांमुळे माणूस धष्टपुष्ट बनतो. त्याच्यातील खिलाडू वृत्ती वाढते. त्याला नवीन अनुभव मिळतात. खेळताना एक प्रकारचा आनंद मिळतो. माणूस नेहमी ताजातवाना राहतो. खेळ हा आवश्यकच आहे. पण खेळासाठी सगळा वेळ

घालवावा असेही नाही. खेळावे पण मर्यादितच. त्यामुळे आपण निरोगी राहतो. इंग्रजीत एक म्हण आहे. A sound mind in a sound body– म्हणजे निरोगी शरीरातच निरोगी मन वास करते.

खेळ हे विविध आहेत– मैदानी आणि बैठे. पण सगळेच खेळावेत असे नाही. कोणताही एक खेळ नेमाने खेळावा. मग खो-खो, कबड्डी, आट्यापाट्या, क्रिकेट, फूटबॉल, टेनीस, जलतरण, नौकानयन, स्केटिंग असे अनेक खेळ आहेत. खेळात हार-जीत असे दडपण मनावर ठेवू नये. आनंदाने खेळावे. नाचावे बागडावे. खेळताना आपण पडतो, लागते पण त्यातही एक मजा असते. म्हणूनच जीवनात खेळांना खास महत्त्व आहे, स्थान आहे. ताज्या, प्रसन्न वातावरणात, खुल्या मैदानात सवंगड्यांसमवेत म्हणून तुम्ही-आम्ही नेमाने खेळायला हवे.

रांगा रांगा रांगा

'रांगेत उभे रहा,' 'रांगेतूनच पुढे जा', 'येथे रांग लावावी' अशा कितीतरी प्रकारच्या पाट्या आपल्याला दिसतात. आजचे जीवन हे गर्दीचे जीवन आहे. त्यामुळे रांगा ह्या आपल्या जीवनातली नित्य गोष्ट झाली आहे. जिकडे तिकडे रांगाच रांगा असतात. 'बस'ला रांग लागलेली असते, सिनेमाला गेले तर तिथे रांग लागलेली असते. रॉकेलला रांग असते, दुधाला रांग असते, गॅससाठी रांग लागलेली असते. अगदी हॉटेलात गेले तरी तेथे चक्क रांगच असते. एवढेच नाही तर, थोडीशी साखर खाली सांडली तरी तेथेही मुंग्यांची रांग लागते. देवाचे दर्शन घ्यावे म्हटले तरी रांगच लावावी लागते, नोकरी मिळविण्यासाठी मुलाखत देताना रांगेनेच जावे लागते. शाळेत प्रवेश करायचा म्हटले तरी तेथे अर्जासाठी रांगच असते. म्हणजे जिकडे-तिकडे आपल्याला रांगेनेच सुरुवात करावी लागते.

या रांगेचा उपयोग खरे पाहिले, तर आपल्याला शिस्त लावण्यासाठीच असतो. परंतु आता 'रांगेचा फायदा सर्वांना' म्हणण्याऐवजी 'रांगेचा फायदा भाग्यवंताला' असेच म्हणावे लागेल. कारण रांगेमध्ये जी दुःखे भोगावी लागतात ती निराळीच असतात. आपला क्रमांक जर रांगेत पाचवा असेल तर बस

आल्यानंतर शेवटी कसा जातो, हे आपल्यालाही कळत नाही. जर रेशनच्या भल्या मोठ्या रांगेत आपण उभे असलो, तर आपला क्रमांक येईपर्यंत धान्य संपलेलेच असते. सिनेमा हाऊस फुल्ल झालेला असतो. रांगेत उभे राहून अफाट वेळ जाऊनही आपल्या पदरी काहीच पडत नाही. कितीतरी तास ताटकळत उभे राहावे लागते. पण उपयोग मात्र शून्य ! जरा आपण रांगेत इकडचे तिकडे झालो की शिव्याशाप मिळतात आणि घाईगडबडीत आपले पाकीट देखील मारले जाते. मग अशा वेळी रांग ऐवजी 'रा'वरचा टिंब पुसला जाऊन रागराग आणि राग होतो.

परंतु या रांगा अटळ आहेत. त्यांच्याशिवाय काही गत्यंतरच नाही. त्यामुळे यात काहीच फरक पडू शकणार नाही. जिकडे तिकडे रांगाच असणार. संपाच्या वेळी रांगा असणार, मतदानाच्या वेळी रांगा असणार. शाळेत सायकलींच्या देखील रांगा असणार हॉस्पिटलमध्ये चेकअपसाठी रांगा असणार आणि मंडळी, कदाचित पुढे वर जाण्यासाठीसुद्धा रांगा ह्या नक्कीच असणार !

पळा रे पळा !

आजचे जग हे शर्यतीचे, स्पर्धेचे जग आहे. सर्वत्र धावपळ चालली आहे. ह्या युगाचा मंत्र आहे, 'पळा रे पळा, कोण आधी पळे तो !' सर्वजण पळत आहेत. कुणी कशासाठी तर कुणी कशासाठी !

सर्वत्र शर्यत आहे. नोकरी मिळवायला, शाळेत प्रवेश घ्यायला, बस पकडायला, दवाखान्यात लवकर जायला, कारखाने काढायला, सदनिका (फ्लॅट) मिळवायला, अगदी प्रत्येक क्षेत्रात ही शर्यत चालली आहे. सर्वजण, अगदी तळाच्या शिपायापासून ते वरच्या अधिकाऱ्यांपर्यंत, सर्वजणच ह्या शर्यतीत पळत आहेत. पण कोणाला तरी ह्या शर्यतीत मागे पडावे लागत आहे. आपली कुवत, क्षमता न ओळखता सर्वजण धावत असतात. ज्यांच्याकडे जास्त क्षमता, कुवत नाही त्यांची मात्र ह्या शर्यतीत पुरती दमछाक होते.

'स्थिती पकडू नका, गती पकडा.' परंतु प्रत्येकाने आपली गती ओळखली

पाहिजे आणि त्याच गतीने धावायला पाहिजे, कमी किंवा जास्त गतीने नाही. उद्या कासवाने सशाच्या किंवा बैलगाडीने मोटारीच्या वेगाने धावण्याचा प्रयत्न केल्यास, त्यांचे जे काय होईल, तेच आपले होईल जर आपण आपली गती न ओळखता धावलो तर !

आजच्या जगात गती हवी आहे. गतीने सतत धावणाराच विजय मिळवतो. म्हणून ह्या वेगाने धावणाऱ्या जगात पुढे जायचे असल्यास गती हवी. पण पळपुटेपणा मात्र नको. तुमच्या पळण्याला वेग हवा, मात्र आवेग नको. तुम्ही गतीचा कायदा पाळला पाहिजे. अडचणींची वळणे, गतिरोधक आले असताना तुमची चाल, गती कमी होईल. परंतु खचू नका. नंतर गतीने पळा. यश तुमच्याच हाती आहे !

'निर्झर व्हा !'

पर्वतांच्या कुशीत बागडणारा, त्यांच्या दुलईत चुळबुळ करणारा, हसतहसत पुढे जाणारा, डोळे मिचकावणारा, तुषारांच्या टिचक्या अंगावर मारणारा, हळूच, नकळत, पायातील चप्पल नेणारा असा हा अवखळ, उच्छृंखल निर्झर सर्वांचाच लाडका आहे.

पण हा निर्झर म्हणजे पाण्याचाच साठा. मग पाण्याचे ते छोटे डबके आणि यात फरक तो काय ? आहे ! फरक आहे ! निर्झर हा स्वैरपणे पुढे वाहत जातो, तर डबक्यातील पाणी जागेवरच स्वस्थ बसलेले असते. पण निर्झर ठिकठिकाणी जात असला तरी तो स्वच्छ, निर्मळ असतो, तर डबक्यातील पाणी किती गढूळ असते ते सांगणे न लगे ! निर्झराचा स्पर्श मनाला उत्साही करतो. अशा रीतीने निर्झर सतत वाहत असतो, निर्मळ राहतो व सदा उत्साही असतो.

पण हा निर्झर शिक्षकही आहे बरं का ! तो सतत पुढे वाहत जाऊन '(तुम्ही) प्रगती करा, पुढे चला' असा संदेश देतो. तो निर्मळ असतो म्हणूनच सांगतो, 'मनाने, शरीराने निर्मळ रहा.' तो उत्साही मुलासारखा उड्या मारीत पुढे जाताना सुचवितो, 'उत्साही रहा' मध्ये आलेल्या खडकांवरून-अडथळ्यांवरून वाहताना

तो 'अडचणींवर' मात करावी, रडत बसू नये असे शिकवतो.

हा निर्झर इतर ठिकाणांचा वाईटपणा, घाण स्वतःबरोबर नेतो व त्यांना आपला निर्मळपणा उत्साह देतो. तो मोठा दाता आहे. आपल्या सौंदर्यनि तो अनेक सौंदर्यरसिकांचे समाधान करतो.

हा निर्झर पूर्वीपण वाहत होता. आजपण वाहत आहे, उद्यापण वाहत राहील. ह्या परोपकारी निर्झरास कोण अडवू शकणार आहे ?

बा निर्झरा, वाहत रहा ! तुझ्या संगीतानं आसमंत निनादून टाक. निर्झर व्हा, हा तुझा कानमंत्र सगळीकडे पसरू दे.

वीज जाते तेव्हा

आपण जीवनातल्या काही गोष्टींकडे लक्ष देतच नाही. आता विजेचेच उदाहरण घ्या ना ! वीज ही जीवनातील अत्यंत आवश्यक बाब आहे, पण आपण तिच्याकडे जास्त लक्ष देत नाही.

विजेचे आपल्याला खूप फायदे होतात. वीज गेली तर घरात किती अडचण होते ! माझे तर लाईट गेल्यामुळे गृहपाठ होतच नाहीत.

मला ती वेळ आठवली. रात्रीच्या दहाच्या सुमारास आम्ही टी.व्हीवरचा एक कार्यक्रम पाहत होतो. नुकतेच जेवण आवरले होते आणि अचानक वीज गेली. मला प्रथम काही वाटले नाही. आई स्वयंपाकघरात गेली आणि दिवा शोधू लागली. पण दिवा कुठे तिला सापडतच नव्हता. मेणबत्तीसुद्धा घरात नव्हती. सगळीकडे काळाकुट्ट अंधार पसरला होता. काय करावे कोणालाच सुचेना. सगळ्यांची अगदी तारांबळ उडाली. माझी आणि माझ्या भावाची तर टक्कर झाली. माझा पाय खुर्चीत अडकून मी धपकन खाली पडलो. मी विजेवर खूप संतापलो. अर्धा तास हे नाटक असेच चालले. अर्ध्या तासानंतर वीज आली, तेव्हा कुठे बरे वाटले.

मला वाटले, आपल्याला अर्धा तासच वीज मिळाली नाही तर किती तारांबळ उडाली. मग गरिबांचे काय होत असेल ! त्यांना तर साधा दिवा सुद्धा

नसतो. ते कसे घालवीत असतील दिवस ? वीज जाते तेव्हा एकच गोंधळ होतो. उघडी दारे झटकन बंद केली जातात. धावणारी वाहनं कडेला घेऊन थांबवली जातात. कडक उन्हाळ्यात वीज गेली, तर जीव गलबलतो, हैराण होतो. अचानक वीज गेली की लिफ्ट बंद, लोकलगाड्या बंद, फ्रीज, टी.व्ही, रेडिओ बंद. या वीज जाण्यामुळे एकच गोंधळ होतो. मित्रांनो, वीज जाते तेव्हाच तिचे महत्त्व पटते, किंमत कळते. खरं ना !

माझा मित्र

आम्हा मुलांच्या जीवनात सर्वांत जास्त स्थान असणाऱ्या व्यक्तींत मित्राची गणना होते. मित्र म्हणजे आम्हा मुलांचा हितचिंतक, मार्गदर्शक असा असतो आणि मुख्य म्हणजे खेळगडी. असाच माझा मित्र अतुल आहे.

अतुल माझ्याच वर्गात म्हणजे सातवीत आहे. माझ्या घराच्या समोरच तो राहतो. त्यामुळे दिवसातील बराचसा वेळ आम्ही एकत्रच असतो. अतुल तसा शरीरयष्टीने काही फारसा धिप्पाड नाही, पण अगदी अशक्तही नाही. रंगाने मात्र माझ्यापेक्षा गोरा आहे. माझ्यासारखे फिकट कपडे त्याला आवडत नाहीत. गडद हिरवा, लालभडक रंग त्याला फारच आवडतात.

माझा मित्र अतुल अभ्यासात मात्र हुशार आहे हं ! गणित हा त्याच्या आवडीचा विषय. आमच्या पुस्तकातील कोणतीही उदाहरणे अगदी कमीत कमी वेळात तो सोडवून दाखवतो. त्याची स्मरणशक्तीही फार चांगली आहे. त्यामुळे त्याचे पाठांतर कमीतकमी वेळात होते. आवाज खणखणीत, धारदार स्वर आणि शुद्ध– स्पष्ट उच्चार त्यामुळे त्याच्या तोंडून गीतेचा अध्याय ऐकायला सगळ्यांना फार आवडते.

अतुल सर्वांना मदत करण्यास सदैव तयार असतो. वाद, भांडण ह्या बाबी त्याच्याजवळ अजिबात नाहीत. त्यामुळे तो काहीसा अजातशत्रू आहे. ह्या त्याच्या स्वभावामुळे तो घरातल्याप्रमाणेच बाहेरच्या विश्वातही अनेकांचा आवडता आहे. त्याचा आवडता खेळ म्हणजे कबड्डी. एरवी गरीब वाटणारा

अतुल कबड्डी खेळताना मात्र प्रतिस्पर्ध्यांना धडकी भरवतो. त्याचे कारण म्हणजे धाडस आणि चपळपणा. त्यामुळे तो ज्या संघात असेल, त्या संघास विजयाची आशा, नव्हे, खात्री जास्त असते.

असा हा अतुल माझा मित्र आहे, याचा मला अभिमान वाटतो.

मी गिरणी बोलतेय

मी आहे बोरगेवाडीमधली एक दळणाची गिरण ! माझे मालक शंकरशेठ मला सकाळी नऊ वाजल्यापासून सुरू करतात आणि रात्रीच्या नऊ वाजता बंद करतात. मी अनेक प्रकारची दळणे दळते. कधी गहू दळते, कधी ज्वारी दळते तर कधी बाजरी दळते.

माझ्याशिवाय या गावात दुसरी दळणाची गिरणीच नाही. त्यामुळे रोज माझ्या येथे तुडुंब गर्दी जमलेली असते. जर कधी मी बिघडले, तर गावकऱ्यांची खूप अडचण निर्माण होते. मला जपूनच वापरायला लागते.

मी माझ्या मालकांना खूप पैसे मिळवून देत असते. माझ्या चाकाचा पट्टा गाडीच्या चाकासारखा पळत असतो. माझा जोरजोराने आवाज येतो. माझ्या चाकाच्या पट्ट्यात तुम्ही हात घातला तर तुमचे हात तर लालबुंद होऊन जातील.

मला आता पंचवीस वर्षे होतील. मी आता खूप थकले आहे. माझ्यातला उत्साह आता कमी कमी होत चालला आहे. माझे अवयवसुद्धा आता जास्त काम करू शकत नाहीत. पण मला जेवढे करता येईल तेवढे काम मी करते.

माझ्या मालकाने मला खूप वेळा नीट केले आहे. पण मी आता जुनी झाल्यामुळे माझा काहीही उपयोग होत नाही. आता शंकरशेठ मला खूप कंटाळले आहेत. पण मी तरी काय करू ?

चिमणीपासुनी शिकुनी घेऊ

निसर्गातल्या प्रत्येक लहानमोठ्या गोष्टींपासून माणसाला शिकण्यासारखे असते. लहान लहान पक्ष्यांपासून देखील ! आता चिमणीचेच उदाहरण घ्या ना !

चिमणी ही देहाने आपल्यापेक्षा खूप लहान असली तरी तिचे काही गुण घेण्यासारखे असतात. चिमणी आपल्या पिलांसाठी दररोज दाणे वेचून त्यांना ते चोचीने खायला घालत असते. वाटेल ती धडपड करून ती ते दाणे वेचत असते. पण पिलांना ती असं म्हणत नाही, 'की मी तुमचं इतकं लहानपणी संगोपन केलंय म्हणजे तुम्हीसुद्धा मला वृद्धपणात संभाळलं पाहिजे !'

त्या चिमुकल्या चिमण्या, पण त्यांच्या अंगात काय ताकद असते ! पण त्या आपल्या पंखांच्या– चोचीच्या जोरावर आपलं घर उभं करतात. आपल्यासारखे त्यांना हात नसतात घर बनवायला ! माणसाला हात असूनही तो आपलं घर गवंड्यांकडून बांधून घेतो. आपल्या घरासाठी चिमण्या गवताची एक एक गाडी चोचीत उचलून आणतात. किती चिकाटी त्यांच्या अंगात असते !

आपले पिल्लू मोठे झाले की चिमणी त्याला स्वतःच अन्न मिळवायला सांगते. पिल्लात स्वावलंबनाची सवय ती रुजवते. आपल्या पिल्लांना वाढवण्याचे कर्तव्य चिमण्या बजावत असतात.

चिमणीला माणसापेक्षा श्रेष्ठ मानायला पाहिजे. चिमणीत आपल्याला चिकाटी, कर्तव्यनिष्ठा, जिद्द, स्वावलंबन हे गुण प्रकर्षाने जाणवतात. मनुष्यानेही चिमणीसारखे वागायला सुरुवात केली, तर तो सर्व प्राण्यांत श्रेष्ठ समजला जाईल.

चिमणीपासुनि शिकुनि घेई ।
बाळा तू आनंद ॥
रडणे कढणे सोडून देई ।
भलता सलता छंद ॥

ह्या ओळीतला अर्थ ध्यानात घेऊन आपण हट्ट सोडायला हवा, आनंदी राह्यला हवे.

कटलेला पतंग बोलू लागला

तो दिवस रविवार होता. मी घराच्या गच्चीवर आरामात रस्त्यावरची वाहने बघत होतो. आणि अचानक एक तुटलेला पतंग हवेत उडत उडत आमच्या घरासमोरच्या झाडावर येऊन पडला. मुले धावत धावत झाडाशेजारी आली. पण त्यांचा नाइलाज होता. त्यांना तो पतंग काढता येत नव्हता. हे सर्व मी पाहत होतो.

थोडा वेळ मी त्या पतंगाकडे पाहत होतो. मला भास झाला की, तो पतंग माझ्याबरोबर बोलतोय. तो म्हणत होता, "माझी जीवनकहाणी ऐकायचीय तुला ? मग ऐक तर. एका गरीब माणसाने मला बनविलेले आहे. तो माणूस खूप गरीब होता. तो पतंग बनवायचा आणि बाजारात नेऊन विकायचा. त्याने एकदा मला कागद आणि काड्यांच्या साहाय्याने बनविले. आणि सर्व पतंग घेऊन ते विकण्यासाठी तो बाजारात गेला. आणि पतंग विकत बसला. थोड्या वेळाने एक मुलगा आला आणि त्याने मला पैसे देऊन विकत घेतले. मला खूप आनंद झाला की मी आता आकाशात उंच उडणार. त्याने मला कण बांधली व मोठा मांजा घेऊन आकाशात उडवण्यास सुरुवात केली. बघता बघता मी खूप उंच गेलो. माझ्यासारखे दुसरे पतंगही माझ्याबरोबर होते. थोड्या वेळाने कुठूनतरी एक मोठा पतंग आला आणि माझा मांजा तोडू लागला. मी पळत सुटलो. पण तो माझ्या पाठीमागे पळतच होता. अखेर तो माझ्याजवळ आला आणि एकदम माझा मांजा तोडला. मला खूप वाईट वाटले. मनात विचार आला. एखाद्या मुलाच्या हाती पडलो तर बरे, नाहीतर माझे आयुष्यच संपले. पण दुर्दैव माझे ! मी ह्या झाडावर येऊन पडलो. आता मला खूप दुःख वाटते रे ! मला आता खूप त्रास सहन करावा लागणार. इथेच रहावे लागणार. ऊन सोसावे लागणार. पण आता काय करणार ? नाइलाजाने सहन करायलाच हवे.

एकदम आईची हाक ऐकू आली. आणि मी घरात गेलो. थोड्याच दिवसांत तो पतंग तेथून नाहीसा झाला. मला खूप वाईट वाटले.

मी एक खोपटं !

मी आहे एक खोपटं ! एका मजुराने राहण्यासाठी मला बनवले. मी एका शिवमंदिराच्या जवळच आहे. काही दिवसांपूर्वी तो मजूर मला सोडून गेला. मी इथे एकटाच असतो. दर्शनासाठी येणारे लोक विसाव्यासाठी माझ्याजवळ येऊन बसतात. एवढी एकच करमणूक आहे. लोकांचे बोल जरा ऐकायला मिळतात.

पण कधीकधी मला खूप कंटाळा वाटतो. देवळाकडे बघून मला शरम वाटते. कारण ते कसे नेहमी स्वच्छ असते. मी मात्र धुळीने माखलेला. माझे अवयव तरी आहेत का जागेवर ! एकदा एका ट्रकने जोरात येऊन एकदम मला धडक दिली. माझे काही अवयव जमीनदोस्त झाले. आता मला लपकलेलं, पेकाट मोडलेलं खोपटं म्हणतात.

मला उन्हाळ्यात ऊन सोसावे लागते. पावसाळ्यात पाऊस झेलावा लागतो. हिवाळ्यात थंडीने गारठावे लागते. माझ्या नशिबातच हे मुळी लिहिलेले आहे. हल्ली तर माझ्याकडे कोणी फिरकतसुद्धा नाही. या जगण्याला काही अर्थ आहे का ?

पण थोड्याच दिवसांत तो मजूर पुन्हा येईल. परत माझ्यात राहू लागेल. मला तो स्वच्छ करेल. माझे अवयव जोडल्यावर मी पूर्वीसारखाच छान दिसू लागेन.

मोडक्या छत्रीचे आत्मवृत्त

जेव्हा निर्जीव वस्तू माणसासारख्या बोलू लागतात, तेव्हा अगदी कमालीचे आश्चर्य वाटते. माझी मोडकी, जुनी छत्री भंगारवाल्याला दिली. ती छत्री मला काहीतरी सांगत आहे, असा भास झाला. ती सांगू लागली— "अरे सुधीर, कसला विचार करतो आहेस ? देऊन टाक मला त्या भंगारवाल्याला. उपयोगी नसलेली वस्तू कोण सांभाळून ठेवणार ! त्यांची अडगळ कमी झालेलीच बरी ! माझी

जीवन कहाणी ऐकायचीय तुला ? मग ऐक !

"काही तारा, एक लोखंडी बारीक नळी आणि काळे कापड यांच्या साहाय्याने मी एका कारखान्यात तयार झाले. तेथून मला एका दुकानदाराने घेतले. मी तुझ्या हाती पडल्यावर तुला खूप आनंद झाला. तुझ्या बाबांनी मला तुझ्यासाठी विकत घेतले. मित्रांना, नातलगांना किती अभिमानाने तू मला दाखवत होतास ! मी तुला खूप आवडले, याचा मलाही खूप आनंद झाला होता.

मला विकत घेतल्यापासून तीन वर्षे मी तुला सोबत केली. पडणारा पाऊस मी माझ्या अंगावर घेऊन तुझे संरक्षण करीत होते. तुझे आई-बाबासुद्धा माझा उपयोग करीत होते. उन्हापासून त्यांचे मी संरक्षण करीत होते. पण आतापर्यंत अजरामर कोण झालेय ! वार्धक्याचा परिणाम माझ्या शरीरावर हळूहळू होऊ लागला. दोन-तीन वेळेला माझी दुरुस्तीही तू करून आणलीस, पण नंतर मात्र मला तू माळ्यावर टाकून दिलेस. तेथे धूळ, कोळिष्टके व झुरळे यांचे साम्राज्य मी म्हणत होते. गेले वर्षभर मी अशा प्रकारे अडगळीत पडून राहिले. आता हे सर्व संपत होते. पुढे काय होणार हे समजत नाही. पण त्याचे दुःख मला नाही. इतरांची दुःखे, त्यांना होणारा त्रास कमी करता आला याचे समाधान मला मिळाले आहे. पण मनात येते, जर माझा तुम्हाला उपयोग नाही, मी सेवा करू शकत नाही, तर असे केरापोतेऱ्यातले अडगळीतले जिणे हवे कशाला ? संपवावे सारे ! पण ते माझ्या हाती थोडेच आहे ?"

माझे आवडते शिक्षक

देशपांडे गुरुजींनी फळ्यावर लिहिलेल्या गणिताकडे एकटक बघावेसे वाटते. गुरुजींच्या मनाप्रमाणे गुरुजींचे अक्षरही सुरेख आहे. सगळे आकडे वळणदार आणि स्वच्छ. गणित जरी नुसते वाचले तरी व्यवस्थित कळते. मग आम्हीही वहीत नकळत तसेच व्यवस्थित आकडेमोड करू लागतो. यामुळे तास कधी संपतो हेही कळत नाही. फळ्यावरील गणित पुसूच नये इतके ते रेखीव असते.

त्यांचा तास केव्हा संपतो, हे कळत नाही कारण अवघड गणितही ते मोठ्या

खुबीने समजावून सांगतात. गणितात दोन गाड्या धावत असल्यास गुरुजी त्या काढून दाखवतात. हौदाचे गणित असल्यास गुरुजी फळ्यावर हौद काढतात. त्यांना चित्रकलाही फार छान जमते. यामुळे हसत-खेळत शिकणे हे आम्ही देशपांडे गुरुजींच्या तासाला अनुभवतो.

ते ५ वी ते ७ वी पर्यंतच्या वर्गांना गणित शिकवतात. स्कॉलरशीप परीक्षेची तयारीही ते करून घेत असल्याने बराच वेळ आधी ते शाळेत आलेले असतात. सहल, स्नेहसंमेलन इ. प्रसंगी त्यांचा उत्साह अगदी उतू जात असतो. अशा वेळेस ते आमच्यातीलच एक होतात. ते जणू आमचे मित्रच बनतात. दर आठवड्यास एक गोष्ट ते सांगतात. पण त्या साध्या नसून गणिताच्या, शास्त्राच्या किंवा कुणा वैज्ञानिकांच्या असतात.

देशपांडे गुरुजी जसे प्रेमळ आहेत तसे कडकही आहेस. ते शिस्तप्रिय आहेत. त्यांना कडकपणा आवडतो.

संक्रांतीचा दिवस उजाडला म्हणजे आम्हाला देशपांडे गुरुजींची हटकून आठवण येते. कारण त्या दिवशी देशपांडे गुरुजी तिळगूळ वाटण्यासाठी आमची वाट पाहत असतात. मुलांवर उदंड माया करणारे, तळमळीने शिकवणारे, शाळेबद्दल अभिमान बाळगणारे आणि विद्यार्थ्यांवर सुसंस्कार करून त्यांचे व्यक्तिमत्त्व घडावे म्हणून धडपडणारे देशपांडे गुरुजी सर्वांना म्हणूनच आपले वाटतात. त्यांचे लाखमोलाचे आशीर्वाद आम्हा विद्यार्थ्यांना सदैव लाभावेत, हीच ईशचरणी प्रार्थना.

आमची सहल

मे महिन्याची सुट्टी लागली आणि कॉलनीतील आम्हा मित्रांची सहल जाण्याचे ठरले. पण सहल कोठे जायची, यावर बराच वादंग माजला. कोणी म्हणे महाबळेश्वर, कोणी म्हणे पाचगणी, कोणी म्हणे सिंहगड, कोणी म्हणे रायगड तर कोणी म्हणे डायरेक्ट जम्मू-काश्मीर. परंतु यातून भीमाशंकर या निसर्गरम्य व पुणेनजीकच्या देवालयात जाण्याचे ठरले.

दोन दिवस कार्यक्रम आखण्यातच गेले. जोशी काकांनी पहाटे पाच वाजताच गाडी बोलावली होती. सर्वजण जमून निघेपर्यंत अर्धा तास कसा गेला हे कळलेच नाही. शेवटी साडेपाचला आम्ही मार्गस्थ झालो. आठ वाजता आम्ही तेथील घाटात पोहोचलो. मग आम्ही शिदोरी सोडून जरा नाश्ता केला. नऊ ते सव्वानऊच्या दरम्यान आम्ही देवालयाजवळ येऊन थांबलो. यानंतर आम्ही काही पायऱ्या उतरून देवालयात आलो. जोशीकाकांनी मंदिरासकट तेथील अनेक गोष्टी दाखवल्या. भीमाशंकर येथे आजूबाजूला घनदाट अरण्य आहे. त्याला अभयारण्य म्हणून सरकारने मान्यता दिली आहे.

हे सर्व पाहून झाल्यावर आम्ही १२-१ च्या दरम्यान जेवायला बसलो. गप्पा मारत मारत सर्वांनी डबे साफ केले. नंतर जरावेळ आम्ही गाण्याच्या/गावांच्या भेंड्या लावल्या. पत्तेही खेळलो.

दुपारी तीनच्या दरम्यान परत येण्यासाठी निघालो. गाडीमध्ये देखील हसणे-खिदळणे चालूच होते. जोशी काकांनी काही थरारक अनुभव आम्हाला सांगितले.

सायंकाळी सहाच्या दरम्यान आम्ही पुण्यात पोहोचलो. नंतरचे दोन दिवस या सहलीचा विषय चघळण्यातच आम्ही घालवले. सहल म्हणजे मौजमजा, रंजन. सहल म्हणजे बहुविध अनुभव वेचणं, निसर्गसान्निध्याचा लाभ घेणं आणि दैनंदिन चाकोरीमुळे आलेला कंटाळा घालवणं, मरगळ झटकणं आणि मनमुराद आनंद लुटून शरीर, मन प्रसन्न, ताजंतवानं करणं, हे शिक्षकांचं सांगणं आम्ही या सहलीच्या निमित्ताने प्रत्यक्ष अनुभवलं.

मी पाऊलवाट बोलतीय !

"बाळा, आज तू शहरातून प्रथमच या खेडेगावात आलेला दिसतोस. तुला येथे नाना तऱ्हेच्या नवीन गोष्टी पाहावयास मिळत आहेत ना ? माझ्याकडे तू एवढे एकटक लावून का बरे बघत आहेस ? आवडले का मी तुला ?" तिच्या या म्हणण्यावरून मला लवकरच समजले की, या निर्जन, ओसाड रस्त्यावर दुसरे

कुणी बोलत नसून स्वतः चक्क पाऊलवाट बोलतीय.

हे समजल्यावर मी तिचे बोलणे लक्षपूर्वक ऐकू लागलो. ती म्हणत होती, "आजवर तू डांबरी रस्ते पाहिलेस. त्यांचा काळा कुळकुळीत रंग आणि गुळगुळीतपणा यामुळे ते सर्वांना आकर्षित करतात हे मला माहीत आहे. ते सौंदर्य माझ्याकडे नाही. याबद्दल मला वाईट वाटत नाही कारण माझ्याजवळील गुण त्यांच्याजवळ नाहीत. थांब ! मी तुला माझी जन्मकथाच सांगते–

माझा जन्म हा अतिविचारपूर्वक असा झालेला नाही. तसेच शहरातील रस्त्यांप्रमाणे माझे ना नकाशे तयार केले गेले,ना माझ्यावर शेकडो रु. खर्च करण्यात आले. माझा जन्म हा गावातील शेतकरी व कामकरी यांच्या वर्षानुवर्षे चाललेल्या 'ये-जा'मुळेच झाला.

माझ्या अंगावर कुणी खडी टाकली नाही की डांबर ओतले नाही. शेकडो अनवाणी पायांनीच मला घडवले. त्यामुळे पाऊलवाट हे माझे नाव यथार्थ झाले. पाषाणहृदयी डांबरी रस्त्याकडे नसलेली व माझ्याकडे असलेली एक गोष्ट म्हणजे सहनशीलता. माझ्याकडे मोठमोठी वाहने येत नाहीत पण गरीब, श्रमिक, मुके प्राणी माझ्या सहवासात येतात. त्यांना सुखी करणे हाच माझा हेतू व त्यातच मला धन्यता वाटते."

एवढे बोलून तो आवाज बंद झाला व मी घराकडे परतलो. एकाकी तरीही इतरांच्या मदतीला तत्परतेने धावून जाणारी, काट्याकुट्यांतून, दगडधोंड्यांतून, शेताडातून जवळचा मार्ग शोधत इतरांचे श्रम कमी करण्यासाठी धडपडणारी पाऊलवाट मला जणू सुचवत होती, 'यशाकडे जाण्याची पाऊलवाट शोध, रस्ता धुंडाळायला पुढे हो, योग्य वेळी तुला हमरस्ता सापडेल. मी दुवा आहे हे विसरू नकोस.'

आमचे शेजारी

तात्यांसारखे शेजारी लाभणे हे आम्ही आमचे भाग्यच समजतो. तात्या, काकू व त्यांची दोन मुले ही आम्हाला कधीही परकी वाटलीच नाहीत. ते जरी

आमचे शेजारी होते, तरी आम्ही 'शेजारी' असे न वागता एका घरातले असेच वागत होतो.

प्रथमतः तात्या शेजारी राहायला आले तेव्हा आम्हाला मोठी काळजीच वाटत होती. आपले शेजारी कोण आहेत, कसे आहेत, कोण जाणे असे मनात आले. पण दोन-चार दिवसांतच आमच्यातील शेजारपण संपून एकत्र कुटुंबपद्धती सुरू झाली. त्यांची निलू आमच्याकडे तर कधी मी त्यांच्याकडे.

एकदा तर आमची मावशी बरीच आजारी पडली. तेव्हा आईला मुंबईला जाणे भाग पडले. त्या वेळी मी आणि बाबा चार दिवस जेवणखाण, चहा-पाणी तात्यांकडेच व्यवस्थित करत होतो. त्या काकू त्यांच्या निलूसारखेच माझेही सर्व करत होत्या.

कधीही अडीनडीला, सुख-दुःखात काकू, तात्या नेहमीच तत्पर असत. परंतु तात्यांची एक नावडती गोष्ट म्हणजे त्यांना आमचाच पेपर वाचायला लागे. ते आमचे शेजारी असेपर्यंत त्यांनी कधीही पेपर विकत घेतला नाही.

त्यांची ही सवय सोडल्यास त्यांच्यासारखा शेजारी मिळणे दुरापास्तच. असं म्हणतात की निंदकाचे घर असावे शेजारी, पण आमच्या शेजारी मात्र निंदानालस्ती स्वप्नातही न करणारे साधे, दिलदार, रसिक आणि दुसऱ्याची मनापासून स्तुती करणारे तात्या राहायचे.

निसर्ग माझा सखा !

निसर्ग कुठे पाहायला जावा हे कळतच नाही. लोक टेकडीवर, बागेत अथवा निसर्ग पाहण्यास गेले की काही म्हणतात, 'निसर्गात काय एवढं पाहण्यासारखं आहे ?' हे चूक आहे. स्वतःला निसर्गरम्य वातावरणाचा आनंद लुटता येत नाही, तर दुसऱ्यास तरी निसर्गाचा आनंद लुटू द्यावा. निसर्गात जे बघण्यासारखं आहे, ते इतरत्र कुठेही नाही. निसर्गात निरनिराळे पक्षी, प्राणी, झरे, हिरवीगार झाडे ह्या मनाला शांती देणाऱ्या गोष्टी आहेत.

श्रावणात निसर्ग हिरवागार शालू व अलंकार अंगावर चढवतो. पक्ष्यांची

आनंदी दिवाळी सुरू होते. कोकिळा आपल्या गोड गळ्याने श्रावणाच्या आगमनाची खबर देते. पाऊस पडून झाल्यावर आकाशाकडे पाहताक्षणी मनोहारी इंद्रधनुष्य मनाला मोहून टाकते. ते दृश्य मोठे विलोभनीय असते. हृदयाला मोहून टाकते. मनाला आनंद देते.

एका टेकडीवरून दुसऱ्या टेकडीकडे पाहिले तर आकाश त्या टेकडीला टेकलेले दिसते. ही निसर्गाची किमया आहे. निसर्गातील झाडांमुळे ढग अडतात. पाऊस पडतो. नद्या-नाले-ओढे भरून जातात. शेताला भरपूर पाणी मिळते. शेतकऱ्यांच्या कामाचे चीज होते. शेतकऱ्याला कामाचे फळ मिळते. शेतकऱ्यावर निसर्गाचे खूप उपकार आहेत.

निसर्गामुळे दृष्टीही चांगली राहते. वाळलेली लाकडे जळणासाठी वापरतात. घरासाठीही त्यांचा उपयोग होतो. एवढेच नाही, तर त्यापासून मध, मेण, डिंक, औषधी वनस्पती मिळतात. असे निसर्गाचे फायदे होतात, म्हणून निसर्गाशी जवळीक साधा. मला तर हा बहुगुणी, दयाळू, परोपकारी निसर्ग माझा सखा, सोबती वाटतो. मी एकटा असलो की तासन्‌तास त्याच्याकडे पाहत बसतो. मी माझा एकटेपणा विसरतो. निसर्ग जणू मला सोबत करतो. शेवटी मी एवढंच म्हणेन,

निसर्ग माझा सखा, सोबती, शिकवी छान मला !

माझा आवडता पक्षी

माझा आवडता पक्षी म्हणजे पोपट. नावाप्रमाणे पोपटी, मऊ रंगाचा, लाल, गडद चोच असलेला, दोन पंख, दोन पाय, एक शेपूट असणारा पोपट. तो हरबरा डाळ, डाळिंब, पेरू इ. फळे आणि मिरची खातो. गोड आवाज काढून विठू-विठू म्हणतो.

ह्या झाडावरून त्या झाडावर, त्या वेलीवरून ह्या वेलीवर उडणारा पोपट मला फार आवडतो. पोपटाचे पिल्लू लहान असेल तर त्याला स्वतःच्या हाताने भरवावे लागते. दुधात कापूस बुडवून ते चोचीत पिळावे लागते. जणू आपल्या

मुलाप्रमाणे त्या पिलाचा सांभाळ करावा लागतो. तो कधी आपल्याला चावत नाही. जर कुणी चिडवले, शेपटी ओढली, तर तो कचकन चावतो.

म्हणून मुक्या प्राण्याला त्रास देऊ नका. माझ्या मित्राला तर मुळीच नका त्रास देऊ. माझा मित्र खूप साधाभोळा आहे. काही लोक पोपटाला पिंजऱ्यात डांबून ठेवतात. खचितच पोपट आनंदी असतात ते मालकाच्या प्रेमामुळे ! पिंजरा उघडला तरी असे पोपट उडून जात नाहीत. पण काही लोक त्यांचे पंख कापतात आणि पिंजऱ्यात डांबून ठेवतात हे चूक आहे.

आपल्या हौसेसाठी आपण एका मुक्या प्राण्याला बळी पाडतो. मला तर स्वतंत्र पक्षीच आनंदी वाटतात. कारण त्यांना त्यांच्या मनाप्रमाणे वागता येते. हिंडता येते. हवे तसे खाता येते. आणि असे स्वतंत्र पक्षी स्वावलंबी असतात. त्यांना स्वतःला सुरक्षित ठेवता येते. स्वतःचे रक्षण चांगल्या प्रकारे करता येते. माझ्या या पक्षी-मित्राला स्वतंत्र ठेवलेलंच मला आवडतं. गोड बोलून रिझवणारा, नाचून स्वागत करणारा माझा हा हिरवा मित्र माझा खास आवडता पक्षी आहे.

थवे फुलपाखरांचे

'छान किती दिसते फुलपाखरू' ही ओळ आठवली की डोळ्यासमोर हिरवळीत, खुल्या मैदानात, बागेत आणि हिरव्या निसर्गात मनमुक्तपणे बागडणाऱ्या फुलपाखरांचे थवे तरळतात. इवले इवले पंख असलेली गोजिरवाणी दिसणारी असंख्य फुलपाखरे पाहून मन वेडं होतं. आम्ही मुले तर त्यांच्या मागे धावतो.

श्रावण महिना सौंदर्याचा साज चढवून दिमाखात डौलात आपल्यासाठी येतो आणि येताना हजारो रंगीबेरंगी फुलपाखरे सांगाती आणतो. कवी बा. भ. बोरकरांनी आपल्या 'थवे' या कवितेत या फुलपाखरांचे सुरेख वर्णन केले आहे. श्रावण महिन्याने जणू आपल्या कानांत कुंडले घातली आहेत आणि ही फुलपाखरे म्हणजे त्या कुंडलांतील हलणारे, रंग बदलणारे, दिवे. नानाविध रंगांची फुलपाखरे काळी, निळी, जर्द पिवळी, अंजिरी, शेंदरी, उन्हेरी, सोनेरी,

मोरपिशी, मृदु मुलायम मखमली, मलमली अशी इंद्रधनुष्याला लाजवणारी रंगांची किमया यांच्यात दडलेली असते. श्रावणातला आनंद या मनोहारी फुलपाखरांमुळे दुणावतो. कुणाच्या अंगावर छोटे ठिपके किंवा वेलबुट्टी, चित्रांची कलाकुसर दिसते, जी नजरेत भरते. ही फुलपाखरे एका फुलावरून दुसऱ्या फुलाकडे झेपावतात. हिरवळीत बागडताना जणू नाना रंगांच्या लहरी निर्माण झालेल्या जाणवतात. मधेच फुला-पानांवर विसावतात.

एकोप्याने राहणारी, एक दिलाने वागणारी, मधु गोळा करणारी ही फुलपाखरे आपल्याला आनंदाची शिकवण देतात. एकतेचा संदेश देतात. मिळून मिसळून रहा असे सांगतात. आणि त्यांना पकडायला गेले की वाऱ्यासारखी झटकन मुसंडी देऊन दूरदूर निघून जातात. इवल्या इवल्या पंखांची फडफड गोड तान छेडते. सांगते, 'आळस सोड, अडू नकोस. आनंदी रहा आणि पुढे पुढे जा.'

मी कचराकुंडी बोलतेय !

अरे धरतीसुपुत्रांनो ! तुम्ही सर्व माझ्याकडे एवढे दुर्लक्ष का करता ? मी आपली तुमची सेवा करण्यासाठी तुमच्या आनंद कॉलनीत आले. मी इतकी स्वच्छ होते, चकचकीत होते. अगदी आतून-बाहेरूनसुद्धा. तुम्ही सर्व माझ्या रूपाला भारावून गेलात की, अक्षरशः माझी हळद-कुंकवाने तुम्ही पूजा केली. मला किती आनंद वाटला ! त्या दिवशी तर मला हॅपी कॉलनी देखील नकोशी झाली. त्या दिवशी तुम्ही सर्वांनी मला स्वच्छ ठेवण्याचा निर्धार केला होता. पण म्हणतात ना, 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे.' तुमची अगदी तशीच गत झाली.

माझे हे स्वच्छ, चकचकीत पोट तुमच्या सेवेस अर्पण केले. मला तुमच्यासाठी मी जणू वाहून घेतले. पण तुम्हाला त्याची किंमत नव्हती. 'नव्याचे नऊ दिवस' अशी स्थिती झाली. तुम्ही सर्वजण सुरुवातीला अगदी जवळून कचरा टाकत होतात व तो योग्य जागी, पण नंतर तर काय विचारूच नका ! सडकी भाजी, केरकचरा, माती, मेलेली जनावरे, मेलेल्या वनस्पती, सडकं-कुजकं अन्न ! अरे, आता तुम्हाला माझी किळस येतेय ? अरे, पण हा सर्व कचरा तुम्हीच

करून ठेवलाय. अरे, तुम्हाला तुमचीच किळस यायला पाहिजे. आणि ते कचरा वाहतूक कक्षवाले तर कधी येतच नाहीत. त्यांना कधी सवड असते का ? तुम्ही, ते, सगळे एका माळेचे मणी ना ! काय करणार ! जोपर्यंत तुम्हाला माझे अमूल्य काम समजणार नाही तोपर्यंत असेच चालणार ! मला त्यापेक्षा आता हॅपी कॉलनीतच जाणे आवश्यक आहे. तेथील लोक दर सुट्टीच्या दिवशी कचराकुंडी साफ करतात. आता मला जाणे अगत्याचे आहे. बरं, येते मी !

आला कार्तिक !

किती शीण आला आहे नाही ! असे प्रत्येकजण म्हणत असतो. हेच सर्व घरांतून चित्र दिसते. मुलांना देखील या सुट्टीचा कंटाळा आलेला असतो. तिचा हव्यास कमी झाला असतो आणि त्यातच आपल्या सर्वांचा आवडता असा कार्तिकमास पदार्पण करतो.

आपण सर्व जेष्ठ, आषाढ, श्रावण, भाद्रपद यामधील घनघोर वर्षेला कंटाळलेले असतो, वैतागलेलो असतो. तरी पाऊस काही आपला पिछा सोडत नाही. आपली या पावसातून तरी सुटका होत नाही. अश्विन महिन्यात हस्तनक्षत्राच्या पावसाने आपण त्रासून जातो. पण यातून कार्तिक आपली सोडवणूक करतो.

सगळीकडील चिखल नाहीसा होऊन हिरवेगार तृण उगवते. नवीन नवीन, छोटी छोटी रानटी झाडे उगवतात. सर्वत्र नवचैतन्य निर्माण होते. या कार्तिकात जास्त ऊन देखील नसते आणि जास्त थंडी देखील नसते. द्वाड पाऊसही नसतो. सगळे वातावरण कसे प्रफुल्लित झालेले असते. आणि सणांमुळे ते अधिकच प्रफुल्लित होते.

बलिप्रतिपदेने या महिन्याचा आरंभ होऊन हा महिना आपल्याला दानशूरतेचा मंत्र, महिमा सांगतो. बहिणीला भेटण्याचा सुवर्णक्षण म्हणजे भाऊबीज देखील कार्तिकातच येते. आपण सारे नव्या महिन्याच्या स्वागतासाठी आतुर झालेले असतो. तथापि, चातुर्मास कार्तिकी एकादशीला संपून आपली

इच्छा पुरी करतो. साऱ्या विश्वाला पसायदानाचा उपदेश करणाऱ्या ज्ञानेश्वरांची पुण्यतिथी याच महिन्यात येते. तसेत शीख धर्मसंस्थापक गुरुनानक यांची जयंतीही या महिन्यात येते.

असा हा महिना कुणाला आवडणार नाही बरे ?

दैनंदिनीचे एक पान

दैनंदिनी म्हणजे रोजचा कार्यक्रम— दिनक्रम. दैनंदिनी एक पान का होईना पण नेमाने लिहिली पाहिजे. दैनंदिनीत दिवसाच्या सर्व गोष्टी लिहायच्या. हे नाही लिहायचे की मी उद्या अमक्या अमक्या वेळेस जेवणार आहे, झोपणार आहे.

तसे मुळीच नाही. त्यात रोजचा कार्यक्रम, घडलेल्या चुका, भेटलेल्या व्यक्तींचा मनावर झालेला परिणाम, सत्कर्म हे लिहायचे. मी एक दिवस बाहेर गेलो. एक मुलगा रोज वर्तमानपत्र टाकत होता. तो आजही आला. मला वाटले ही त्याची दैनंदिनी ठरलेली असावी.

रिकाम्या वेळेचे महत्त्व दैनंदिनीमुळे कळू शकते. वेळ कसा घालविला हेही दैनंदिनीत लिहावे. जय प्रकाशजींनीही दैनंदिनी लिहिली होती.

माझी दैनंदिनी अशी आहे : रोज सकाळी साडेसहाला उठतो. स्वच्छ दात घासतो. जास्तीचा अभ्यास असेल तर तो करतो. नाहीतर एक-दीड तास खेळतो. स्नान करून शाळेत जाण्यासाठीं आवरतो आणि शाळेच्या वेळेवर शाळेत जातो.

शाळेतून आल्यावर स्वच्छ तोंड -हातपाय धुऊन देवपूजा करतो. शाळेचा अभ्यास करतो. रिकामा वेळ असेल तर लहान मुलांना गोष्टी सांगतो. कधीतरी अशिक्षित माणसांना थोडेफार शिकवतो. कोणाला कोणत्याही प्रकारची मदत हवी असेल तर मी करतो. शाळेत जाताना किंवा येताना जर का एखादी अंध किंवा म्हातारी व्यक्ती रस्ता क्रॉस करण्यासाठी थांबली असेल, तर मी त्यांना मदत करतो.

रात्रीच्या जेवणानंतर झोपताना मी दिवसभर कोणती चांगली गोष्ट केली, कोणती वाईट गोष्ट केली, याचा विचार करतो. कोणत्या व्यक्तीची कोणती गोष्ट, विचार मला आवडले हे मी आठवतो, टिपून ठेवतो आणि देवाला नमस्कार

करून मी झोपतो.

जय स्वावलंबन

लहानपणी वाटायचे हे स्वावलंबन म्हणजे काय? नंतर वाटले की स्वावलंबन एक खेळ आहे. आता कळले स्वावलंबन म्हणजे स्वतःवर अवलंबून असणे. हेच खरे स्वावलंबन हे जेव्हा कळले तेव्हा वाटले, हे काम लहान मुलांचे नाही, मोठ्या माणसांचे आहे.

मला नेहमीची सवय ! आंघोळीला गेलो की टॉवेल विसरायचो. मग आईला मागायचो. एकदा मोठी फजिती झाली. मी मावशीकडे गेलो. मी सकाळी आंघोळीला गेलो. नेहमीप्रमाणे टॉवेल विसरलो. आंघोळ झाल्यावर लक्षात येताच मोठा प्रश्न पडला. मावशीला कसे सांगायचे ?

तेव्हाच ठरवले उद्यापासून टॉवेल विसरायचा नाही. या जगात, जीवनात स्वावलंबनाला महत्त्व आहे. पक्षी कसे भल्या पहाटे चिवचिवाट करतात. ते स्वावलंबी आहेत. पण आपण परावलंबी आहोत. कारण आळशी आहोत. आज प्रत्येक देश पुढे आला आहे, तोही स्वावलंबनामुळेच. या जगात पैशाला जितके महत्त्व आहे, तितके स्वावलंबनाला आहे. कारण स्वावलंबनामुळे पैसा मिळतो.

मी एकदा सकाळी उठून बाहेर गेलो. एक मुलगा दुधाच्या बाटल्या पोचवत होता. मी लाजेने मान खाली घातली. कारण आपण रोज दिवसातून तीन वेळा जेवतो. पण काम करत नाही. पण तो मुलगा माझ्या वयाचा असून दुधाच्या बाटल्या पोहोचवतो. त्याचे आई-वडील त्याला म्हणत असतील का की 'तू रोज दुधाच्या बाटल्या पोहोचवत जा. तरच तुला जेवायला मिळेल, नाहीतर नाही.' नाही, पण त्याला कदाचित आई-बाबा नसतील. म्हणून तो हे काम करत असेल. हेच त्याचे स्वावलंबन आहे. पक्षी सुद्धा स्वतःचे अन्न स्वतःच मिळवतात. आपण रोज आईला म्हणतो, "आई, मला भूक लागली. जेवायला दे." म्हणून स्वावलंबन केले पाहिजे. सर्वांनी म्हटले पाहिजे-

जय स्वावलंबन !

मी एक श्रमिक

घामाच्या धारा लागलेल्या, अंगभर वस्त्र नाही, खायला चांगलेचुंगले नाही, राहायला स्वतःचे घर नाही आणि घडीभरची विश्रांती नाही, असा माझ्यासारखा बांधव तुम्हाला अवतीभवती दिसतो का? नाही ना! कसा दिसणार? तुम्ही आपल्याच नादात असता! ओळखलंत मला? म्हणायला तुमच्यासारखा माणूस, पण गुराढोरासारखा राबणारा! होय, मी एक श्रमिक!

कधी शेतात राबणारा, रणरणत्या उन्हात ढोर मेहनत करणारा, खाणकाम करणारा, बांधकामाच्या वेळी विटा, वाळू, डबर वाहणारा, सामानाची ओझी वाहणारा, असा श्रमिक अवतीभवती दिसतो का पहा बरे! ज्या घरात तुम्ही राहणार ते बांधताना आमची गरज, नंतर मात्र त्या घरात आम्हाला प्रवेश नाही.

आमच्या श्रमांवर-कष्टांवर दुसऱ्यांनी मोठे व्हायचे, बंगल्यात राहायचे, चांगलेचुंगले खायचे आणि आम्ही मात्र पोटाची खळगी भरण्यासाठी, गोळाभर अन्न मिळवण्यासाठी उन्हातान्हात श्रमायचे. आम्हाला का मन नाही? तुमची उपेक्षा, अरेरावी, हिडीस-फिडीस, टाकून बोलणे आम्ही का म्हणून सोसायचे? केवळ गरीब म्हणून?

माझ्यासारखे श्रमिक शेतात धान्य पिकवतात. तुमच्यासाठी गिरणीमध्ये काम करतात, तुम्हाला वस्त्र मिळवण्यासाठी. अशा रीतीने तुम्हाला अन्न मिळावे, वस्त्र मिळावे, राहायला चांगले घर मिळावे, म्हणून आम्ही कष्ट करतो, घाम गाळतो. आमच्यातल्या बायका आणि लहान मुलेही कष्ट करतात. आमच्या इतकेच काम करून त्यांना मजुरी मात्र कमी मिळते. हा भेदभाव का? मी तर बांधकामावर काम करणारा! आज इथे तर उद्या तिथे! मग आमच्या पोरांच्या शाळेचे काय? दिवसभर पोटासाठी त्यांनी राबायचे मग खेळायचे कधी? समाजात अशी विषमता का? आम्ही पण भारतीय ना? मग आम्हा बांधवांशी तुम्ही का असे वागता? श्रमानं मिळणाऱ्या मीठभाकरीची लज्जत दुसऱ्याच्या श्रमावर मिळवलेल्या श्रीखंडपुरीपेक्षा जास्त चांगली असते. ऐकलीत माझी कथा? यापुढे तुम्हीही श्रम करा, तरच आपला देश प्रगती करू शकेल.

असा न्यारा श्रावण

श्रावण मास म्हटला की अगदी ओलसर व हिरवेगार वातावरण डोळ्यासमोर उभे राहते. अशा या श्रावण महिन्यात क्षणात पाऊस तर क्षणात ऊन असा लपंडाव चालू असतो. त्यामुळे सगळीकडे हिरवेगार गवत पसरलेले असते. मातीला सुगंध आलेला असतो. अशा वेळी पाऊस पडत असताना ऊन पडले की ते दृश्य एक आगळे वेगळेच असते.

श्रावण महिन्यातील एखाद्या (पहिल्या) दिवशी चाहूल लागताच कोकिळा आनंदाने गाणे गायला सुरुवात करते. तिच्या गाण्याने जणू ती सर्वांना श्रावण आल्याची खबरच देत असते. मोरही आपली नृत्यकला सुरू करतात. आपला आनंद जणू ते नाचून व्यक्त करतात.

श्रावण महिन्यातील एखाद्या सकाळी तुम्ही लवकर उठून पहा. पहाटेच्या वेळी सगळीकडे धुके पसरलेले दिसते. जसे जसे पुढे जाल, लांबवर बघाल, तर धुके जास्तच दाट दिसेल. आणि कोवळ्या उन्हात जर हिरव्यागार पानावर दंवबिंदू असतील, तर ते बिंदू मोत्याप्रमाणे भासतात.

पावसाळा आणि उन्हाळा या दरम्यानच्या काळात जर आपली नजर नभाकडे गेली, तर आपल्या मनाला मोहून टाकणारे, डोळ्यांना आनंद देणारे असे सप्तरंगी इंद्रधनुष्य पसरलेले दिसेल. असा हा झाडांना, वेलींना, पक्ष्यांना, पशूंना व सर्व सजीवांना आनंद, उत्साह देणारा, मनाला मोहून टाकणारा न्यारा श्रावण मला पुन्हा पुन्हा हवाहवासा वाटतो.

आणि नकळत मन गुणगुणायला लागतं,

श्रावणमासी हर्ष मानसी ।
हिरवळ दाटे चोहीकडे ॥
क्षणात येते सरसर शिरवे ।
क्षणात फिरूनि ऊन पडे ॥

वृक्ष खरे संत

प्रत्येक मनुष्याला आपले जीवन जगण्यासाठी वनस्पतींची आवश्यकता असते. वनस्प़ती आपल्याला चवदार फळे, सुवासिक फुले, शीतल छाया, औषधी पदार्थ, जळणासाठी लाकडे इत्यादी सारे काही देतात. सुगंधाची खैरात करतात म्हणूनच 'परोपकाराय सतां विभूतयः' असे वृक्षांबाबत म्हटले आहे. वृक्षांच्या परोपकार या गुणामुळेच ते सर्वत्र पूजले जातात. त्यामुळेच वृक्ष हे संतच आहेत.

संत हे निःस्वार्थी असतात. आपल्याजवळील सर्व काही देण्यात त्यांना आनंदच होत असतो. परोपकार हे त्यांच्या जीवनाचे ध्येयच बनलेले असते. त्याप्रमाणे वृक्ष हे आपल्याजवळील फळे, फुले, छाया सर्व काही देण्यात कुचराई करीत नाहीत. जेव्हा वृत्रासुराला मारण्यासाठी सर्व शस्त्रे फिकी पडली तेव्हा दधीची ऋषींनी आपल्या हाडांचा उपयोग शस्त्रे करण्यासाठी केला. संतांना जरी एखाद्या परोपकाराच्या कार्यात मृत्यू पत्करावा लागला, तरी ते डगमगत नाहीत. त्याचप्रमाणे वृक्ष हे स्थितप्रज्ञ आहेत. जरी त्यांना कोणी तोडत असेल किंवा त्यांची कोणी पूजा करत असेल तरीही ते काहीही बोलत नाहीत. संत हे कधीही भेदभाव करीत नाहीत. त्यांच्या दृष्टीने सर्व समानच असतात. तसेच वृक्ष आपल्या अंगाखांद्यावर वेगवेगळ्या पक्ष्यांना खेळवतात, क्रीडा करू देतात. संत हे कुठेही गेले तरी तेथे लोकांची मने निर्मळ करून तेथील वातावरण शुद्ध ठेवत असतात. त्याचप्रमाणे वृक्ष हे आपल्या श्वासोच्छवासाद्वारे प्रदूषण थांबवून वातावरण स्वच्छ करतात. त्यामुळे संतांप्रमाणेच वृक्ष हे समाजाची उन्नती करत असतात. संत हे चांगल्या गोष्टींना धरून वागतात. ते त्यांना कधीही सोडत नाहीत. त्याप्रमाणे वृक्ष हे एकाच जागी थांबून जमिनीची धूप थांबविण्याचे काम सतत करतात. जोरदार वादळे झाली तरी ते आपली जागा सोडत नाहीत. आपल्या जीवनातला प्रत्येक क्षण ते दुसऱ्यांसाठीच घालवतात.

वृक्षांना जरी साधुसंतांप्रमाणे लोकांना प्रत्यक्ष उपदेश करता येत नसला, तरी ते आपल्या कृत्यातून लोकांना अबोलपणे शिकवीतच असतात आणि म्हणूनच आपल्या सर्वस्वाचा त्याग करणारे वृक्ष, हे खरोखर संतच आहेच.

एकाच विषयावर दोन वेगळे निबंध तुम्हीही लिहू शकता.

व्रत-वैकल्ये आणि आम्ही

स्वेच्छेने व नियमितपणे एखादी उपासना करणे, याला व्रत म्हणतात. विज्ञानाने जी सत्ये प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारे निर्विवादपणे सिद्ध केली आहेत, त्यांच्या प्रचारास अडथळा आणणारी व्रते साफ सोडून दिली पाहिजेत. ज्यामुळे स्वतःचा, स्वतःच्या देशाचा किंवा एकंदर मनुष्यजातीचा काही विकास होतो की नाही, हे पाहून मगच ते व्रत आचरावे.

आपण झाडे लावली पाहिजेत आणि ती चांगल्या प्रकारे वाढवली पाहिजेत. त्यांना नियमितपणे खतपाणी केले पाहिजे. आपण स्वतः लावलेल्या झाडाचे फूल आपल्या वहिणीस, आईस देताना आपल्याला अभिमान वाटतो. हेही एक व्रतच आहे.

आणखीही खूप व्रते आहेत. आपले घर अंगण आणि आसपासचा परिसर स्वच्छ ठेवला पाहिजे. आपले कपाट, आपले कपडे स्वच्छ ठेवावेत. आपण योग्य वेळेस झोपणे, योग्य वेळेस उठणे ही देखील व्रतेच आहेत. रोज सकाळी उठणे, बागेत फिरणे, पहाटे अभ्यास करणे ह्या सवयी आपण स्वतःला लावून घेतल्या पाहिजेत.

निसर्गाशी मैत्री करावी. निसर्गाशी मैत्री केल्यावर तोही आपणाशी बोलू लागतो. निसर्गाची बरोबरी कुणीच करू शकत नाही. विद्यार्थ्याने समाजसेवा करावी. इतरांना मदत करावी. जो विद्यार्थी वाईट संगतीला लागला असेल त्याला समजावून सांगून एक सद्‌गुणी मुलगा बनवला पाहिजे. तरच आपला भारत देश मान वर काढू शकेल आणि आपल्याला हे सर्व घडवून आणता येईल. पण त्यासाठी आपल्या अंगात धैर्य व चिकाटी असावी. ही व्रते आपण करू शकतो. ही सर्व व्रते आपण आचरली, तर आपल्या देशाचा आणि आपल्या समाजाचा फायदा आहे. राष्ट्राचाही फायदा आहे.

अशी आहेत आपली व्रते.

व्रत-वैकल्ये आणि आम्ही

भारतीय संस्कृती फार प्राचीन आहे. तिने ज्ञानावर आणि प्रेमावर भर दिला आहे. जेथे जेथे सहकार्य दिसते तेथे तेथे ती नम्र होते. ज्यांची ज्यांची म्हणून मदत होते, त्यांना ती नम्र होते, त्यांचे पूजनही करते. आपली व्रतवैकल्ये पण आपल्याला हेच दाखवून देतात.

उदाहरणच द्यायचे झाले, तर आपला बैलपोळा. भारतीय शेतकऱ्यांच्या जीवनात बैलाला केवढे महत्त्व ! त्या धेनुपुत्राने केलेल्या श्रमामुळेच आपली शेते पिकतात व आपली पोटे भरतात. मग त्यांची फेड नको का करायला ? या व्रतवैकल्यांमागे नुसती कृतज्ञताच नाही, तर या व्रतांमागे शास्त्रीय हेतूही आहेत. वडाला एक लाख प्रदक्षिणा घातल्याने व्यायाम होतो. जपजाप्य केल्यामुळे मनःशांती मिळते.

पूर्वीची जी व्रते आहेत त्यांना बदलत्या काळाबरोबरच नवे रूप आले आहे. फक्त जप करणे, पूजा करणे म्हणजे व्रत नव्हे, तर कोणतेही सत्कार्य नित्यनेमाने करणे म्हणजेच व्रत होय. यालाच आपण वसा घेणे असेही म्हणतो.

व्रते अनेक प्रकारची आहेत— अपंगांना मदत करणे, रक्तदान करणे, परोपकार करणे, फिरायला जाणे, स्वच्छता राखणे, श्लोक म्हणणे, वाचन करणे, उपवास करणे, जप करणे. आजकाल बचत करणे, हे देखील एक प्रकारचे व्रतच आहे.

या सर्व व्रतांमुळे आपल्या जीवनात शांती निर्माण होईल. ह्या व्रतांना आता नवीन स्वरूप देण्याचे काम आहे. म्हणूनच म्हटले आहे-

उतू नका मातू नका, घेतला वसा टाकू नका. जुने जाऊ द्या मरणालागुनि असे न म्हणता योग्य-अयोग्य, चांगले-वाईट, कालानुरूप-कालबाह्य याचा विचार करून जुन्यातले आणि नव्यातले चांगले वेचून आपण व्रते अनुसरायला हवीत. व्रत कुठलेही असू दे पण त्यामागे श्रद्धा, निष्ठा, समर्पण इत्यादी भावना असू देत.

मुद्दे वाचा आणि लिहून पहा

विषयांवरून प्रथम मुद्दे शोधा. पूर्वानुभव, घटना, प्रसंग यातून ते फुलवा, खुलवा. यात निश्चित क्रम असू दे. विचारांमध्ये सुसंगती असावी. वानगीदाखल काही विषय दिले असून त्यांचे मुद्देही दिले आहेत. वाचा, विचार करा, अनुभवाने जुळणी करा आणि लिहिण्यासाठी लेखणी उचला. प्रारंभ-मध्य-शेवट यांचे स्वातंत्र्य मात्र तुम्हाला दिले आहे.

१. माझे आजोबा

१. रूप, बांधा, बाह्य व्यक्तिमत्त्व— वय वर्णन.
२. दिनक्रम, आवडी-निवडी-छंद.
३. वागणूक— आदर्श-घर-शेजारी समाज.
४. तुमच्याशी असलेले नाते, जवळीक.
५. त्यांचा आदर्श, त्यांची शिकवण.
६. समारोप

२. जय स्वावलंबन

१. स्वावलंबन म्हणजे.
२. परावलंबनातले तोटे, दुःख.
३. जीवनात स्वावलंबनाचे महत्त्व.
४. तुमचे अनुभव.
५. समारोप.

३. दैनंदिनीचं एक पान

१. दैनंदिनी एक सवय, एक अनुभव.
२. वेळ कसा घालविला.
३. भेटलेली व्यक्ती— परिणाम, शिकवण.
४. घडलेली घटना वा प्रसंग.

५. झालेल्या चुका.
६. हातून घडलेले सत्कर्म.

४. माझा पक्षीमित्र

१. पक्षी तुमचा मित्र कधी व कसा झाला ?
२. थोडक्यात वर्णन.
३. दोघातले नाते.
४. स्वभाव विशेष.
५. जवळीक, आपुलकी वाटण्याची कारणे.
६. समारोप

५. निसर्ग माझा सखा

१. निसर्ग म्हणजे.
२. निसर्ग आणि आपले नाते.
३. निसर्ग सखा कसा.
४. निसर्गाची शिकवण, अनुभव.
५. आपली कर्तव्ये.
६. समारोप.

६. माझं आवडतं वर्तमानपत्र

१. वर्तमानपत्राचं घराघरांतलं स्वागत.
२. विविध वर्तमानपत्रे-वैशिष्ट्ये-जीवनातील स्थान.
३. आवडतं वर्तमानपत्र-कोणते-का-कधीपासून.
४. आवडण्याची कारणे-वर्तमानपत्राचे फायदे.
५. वर्तमानपत्रांचं स्वरूप.
६. समारोप.

७. यंत्र शाप की वरदान

१. यंत्रनिर्मिती का, कुणासाठी ?

२. जीवनात यंत्राचे स्थान.
३. यंत्रामुळे होणारे फायदे– वरदान.
४. यंत्रामुळे होणारे तोटे– शाप.
५. यंत्राचे दुष्परिणाम.
६. यासंबंधीचे व्यक्तिगत मत– माणूसच याला जबाबदार का ? कसा ?

८. आकाशी मेघच नसते तर !

१. पाऊस– एक अनुभव.
२. फायदे-तोटे.
३. मेघाविना होणारी अवघड परिस्थिती.
४. मेघांची गरज का व कुणाला ?
५. पावसाविना होणारे दुष्परिणाम.
६. समारोप.

९. क्रिकेटची बॅट बोलू लागली

१. ओळख– आजची स्थिती.
२. पूर्वीचे अनुभव.
३. केलेली सेवा, मिळालेले सन्मान.
४. मनातली व्यथा, दुःख, खंत.
५. समारोप.

१०. माझ्या जीवनातला अविस्मरणीय प्रसंग

१. जीवन म्हणजे.
२. घटना-प्रसंगांचे महत्त्व.
३. अविस्मरणीय प्रसंग– संक्षिप्त वर्णन.
४. विसरू न शकण्याची कारणे.
५. शिकवण– जीवनावर झालेला परिणाम.
६. समारोप.

११. आमचा दूधवाला (व्यक्तिचित्र)

१. बाह्य रूप— वर्णन.
२. सवयी-लकबी-वर्तन.
३. स्वभाव विशेष.
४. तुमच्याशी त्याचे असलेले संबंध.
५. त्याचे विचार, तोंडची वाक्ये (लक्षात राहतील अशी).
६. समारोप.

१२. आवडता नेता : लोकमान्य टिळक

१. विविध क्षेत्रांतले नेते— प्रत्येकाचा वेगळा विशेष.
२. लोकमान्य टिळक— जन्म-बालपण.
३. स्वभाव विशेष, गुणविशेष.
४. राजकीय, सामाजिक कार्य.
५. अन्य कार्य (लेखन विषय).
६. आवडता नेता असण्याची कारणे.
७. महत्त्वाचे विचार, शिकवण.
८. समारोप.

१३. पडका किल्ला बोलू लागला

१. आजची अवस्था.
२. गतकाळ-वैभव- आठवणी.
३. अनुभव— अविस्मरणीय घटना.
४. केलेली सेवा, मिळालेले महत्त्व, सन्मान.
५. आजच्या स्थितीबद्दल मनोगत.
६. खंत-व्यथा-शिकवण.
७. समारोप.

१४. आमची सहल

१. सहल म्हणजे.


२. सहलीचे ठिकाण-दिवस-वेळ-हेतू.
३. केलेली पूर्वतयारी.
४. प्रत्यक्ष सहलीतील अनुभव.
५. सहलीतून काय मिळाले ?
६. सहल स्मरणात का राहिली ?
७. समारोप

१५. बसच्या रांगेत एक तास

१. अनुभव रोजचा की कधीमधी येणारा.
२. रांगेची वैशिष्ट्ये.
३. आसपासचे दृश्य, कानी पडणारे शब्द.
४. त्रास, कटकट, वैताग, कंटाळा, शीण.
५. बस येताच रांगेची स्थिती.
६. समारोप.

१६. माझा आवडता उत्सव

१. उत्सव म्हणजे.
२. व्यक्ती आणि समाज जीवनातील महत्त्व.
३. उत्सवांचे प्रकार.
४. तुम्हाला आवडणारा उत्सव-स्वरूप-अनुभव.
५. आवडण्याची कारणे.
६. होणारा परिणाम, मिळणारी शिकवण.
७. समारोप.



भाग ४

पत्रलेखन

पत्रलेखन ही एक सहजस्फूर्त गोष्ट आहे. ही सहजसुंदर कला आहे. पत्र म्हणजे एका दृष्टीने दूरच्या व्यक्तीशी संपर्क साधण्यासाठी केलेली लिखित कृती. पत्र म्हणजे प्रत्यक्ष भेटीची तहान एक प्रकारे वेगळेपणाने भागवणे. पत्र म्हणजे अर्धी भेट. स्नेह, आपुलकी, जिव्हाळा वाढता ठेवण्यासाठी, संपर्क साधण्यासाठी, स्नेहाची खूण दूरच्या व्यक्तीला मनोमनी पटावी म्हणून केलेली, आंतरिक ओढीतून स्फुरलेली शब्दकृती. आपल्या मनातल्या भावभावना, महत्त्वाचे विचार दूरस्थ व्यक्तीपर्यंत थेट पोहचविण्याचे साधन, माध्यम म्हणजे पत्र. आपली मते, अनुभव, गमतीजमती, प्रगती, यश, माहिती, भावलेल्या गोष्टींचे वर्णन असे कितीतरी विषय घरगुती पत्रात सामावलेले असतात. दोन व्यक्तींना, दोन हृदयांना जोडणारा दुवा म्हणजे पत्र. पत्रलेखनाची ही कला आपल्याला केवळ परीक्षेत पेपरातील अपेक्षित प्रश्न सोडवून गुण मिळविण्यासाठी नव्हे. जीवनात वेळोवेळी कामानिमित्त, अडचणी सोडविण्यासाठी, माहिती मिळविण्यासाठी, मागणी करण्यासाठी, तक्रारी नोंदविण्यासाठी, अभिनंदन करण्यासाठी, शुभेच्छा देण्यासाठी, सांत्वन करण्यासाठी, सल्ला देण्यासाठी, सल्लामसलत करण्यासाठी, नोकरी मिळविण्यासाठी या आणि अशा अनेक प्रकारच्या कामांच्या-कारणांच्या निमित्ताने पत्रे लिहावी लागतात. रुसवा-दुरावा दूर करून मैत्रीतला गोडवा, ओढ टिकविण्यासाठीही पत्रलेखनाचा आपल्याला व्यवहारात हरघडी उपयोग होत असतो. जर तुम्ही मुलांनी लहान वयात ही कला सरावाने आत्मसात करण्याचा प्रयत्न केलात, तर मित्र जोडणे, स्नेह टिकून ठेवणे, काम करवून घेणे, तक्रारी-गाऱ्हाणी योग्य ठिकाणी नमूद करणे, नोकरी मिळविण्याची खटपट करणे आणि त्यात यश मिळविणे, अशा अनेक गोष्टी तुम्हाला चुटकीसरशी साधता येतील.

पत्रांचे पुढील प्रकार स्थूलमानाने संभवतात.

१. घरगुती पत्र— आई, वडील, बहीण, भाऊ, मित्र, अन्य नातेवाईक, शेजारी इत्यादी.

२. व्यावसायिक पत्र— पुस्तक मागणी, व्यापारविषयक इत्यादी

३. कार्यालयीन पत्र– (नोकरीसाठी) अर्ज, तक्रार निवारण अर्ज, कार्यालयीन कामकाजविषयक माहिती– देवाणघेवाण करण्यासाठी

लक्षात ठेवा–

१. घरगुती पत्राच्या सुरुवातीला श्री, ॐ, शुभं भवतु, इत्यादी लिहिले जाते.

२. सांत्वनपर पत्राच्या वेळी श्री लिहीत नाहीत.

३. सुरुवातीला उजव्या हाताच्या कोपऱ्यात पत्रलेखकाने आपला सविस्तर पत्ता व दिनांक लिहावा. काही वेळा पत्र लिहिण्याच्या वेळेचाही उल्लेख केला जातो.

४. पत्र लिहिणारा आणि पत्र ज्याला लिहिले आहे तो वाचणारा, या दोघांच्यामध्ये असलेल्या स्नेहबंधानुसार तसेच वयानुसार-अधिकारानुसार मायना आणि शेवट बदलत जातो.

५. पत्रातील मजकूर सविस्तर वा संक्षिप्त पत्रप्रकारानुसार, विषयानुसार हवा. घरगुती पत्राची लांबी, रुंदी, खोली (विचार, भावभावना) जास्त असते. याउलट व्यावसायिक, कार्यालयीन पत्र नेमके, नेटके, मर्यादित असते.

६. मोठ्या माणसांना पत्र लिहिताना भाषा ऋजू असावी आणि त्यामधून आदर, नम्रता, आपुलकी व्यक्त व्हावी. समवयस्क मंडळींना, मित्रांना पत्र लिहिताना भाषेत जिव्हाळ्याबरोबरच खेळकरपणा हवा. घरगुती पत्र बोलीभाषेत असावे. वाक्यरचना पत्रलेखक पत्र प्राप्त करणाऱ्याशी मनमोकळ्या भाषेत प्रत्यक्ष बोलत आहे, अशा प्रकारची हवी.

७. घरगुती पत्रात शेवटी एकमेकांची खुशाली, चौकशी, माहिती विचारली-सांगितली जाते. मात्र व्यावसायिक कार्यालयीन पत्रात या साऱ्या गोष्टींना फाटा असतो.

८. कार्यालयीन– व्यावसायिक पत्रे लिहिताना प्रारंभी पत्त्याच्या वर सुरुवातीला पत्रलेखकाने आपले पूर्ण नाव लिहावयाचे असते. पत्ता सविस्तर लिहावा लागतो.

९. पत्रामध्ये फापटपसारा नसावा. अनावश्यक गोष्टी टाळून पत्र सुटसुटीत बेतावे.

१०. विषयाला धरून मुद्देसूद मजकूर लिहावा.

११. व्यावसायिक पत्र किंवा कार्यालयीन पत्राच्या आधी, मायन्यानंतर

पत्राचा विषय (हेतू सुस्पष्ट कळण्यासाठी) लिहिला जावा.

१२. संबोधन-अभिवादनानंतर विषयाच्या महत्त्वानुसार मांडणीचा विस्तार वा संकोच करावा.

१३. पत्रातील संबंधानुसार शेवटी (समारोपानंतर) स्वाक्षरी करावी. (खाली कोपऱ्यात) मात्र परीक्षेत पेपरात— पत्र लिहिताना स्वतःचे नाव लिहू नये.

१४. आकर्षक भाषा, मोजके शब्द, आणि (सुस्पष्ट) मुद्द्यांनुसार परिच्छेद, ही वैशिष्ट्ये पत्रलेखनात दिसावीत, अंतर्भूत असावीत.

१५. शेवटी ज्याला पत्र धाडावयाचे, त्याचे पूर्ण नाव लिहून सविस्तर पत्ता नमूद करावा.

पत्राचा आराखडा

१. पत्रलेखकाचे नाव
पत्ता
दिनांक

२. मायना
संबोधन
अभिवादन

३. मुख्य मजकूर
(अ) पत्राचा हेतू, कारण
(ब) विवेचन
(क) मनोगत

४. समारोप

५. शेवट

आपला/आपली
स्वाक्षरी

(६) प्राप्त करणाऱ्याचे नाव व पत्ता

	ति की ट

प्रति,

प्रेषक	नाव व पत्ता
नाव व पत्ता	
पिन कोड	पिन कोड

पत्राचे पुढील प्रकार आपण ५ वी ते ७ वी आणि ८ वी, ९ वी, १० वी असे गटानुसार शिकणार आहोत.

१. निमंत्रणवजा
२. अभिनंदनपर
३. सांत्वनपर
४. खुशालीवजा
५. माहितीवजा
६. विनंती अर्ज
७. तक्रार अर्ज
८. आभार, शुभेच्छा

*

आमंत्रणवजा पत्र

शेखर सु. जोशी
४२२, नारायण पेठ,
जोशी वाडा, पुणे.
दि.

प्रिय गुणेश,

सप्रेम नमस्कार.

खूप दिवसांनी हाती पडलेले तुझे पत्र वाचून तू भेटल्याचा आनंदच जणू मला झाला. तुमच्या शाळेच्या सहलीचे वर्णन तू असे झकास लिहिले आहेस की, वाचून मीही जणू गोवा सफर अनुभवली. भेटीची ओढ तुझ्याप्रमाणेच मलाही आहे. लवकरच तशी संधी आपण वेचायची आहे, म्हणूनच हे सविस्तर पत्र.

सालाबादप्रमाणे यंदाही माझा वाढदिवस आई-बाबा धूमधडाक्यात साजरा करणार आहेत. नुकत्याच स्केटिंग स्पर्धेत मी सुवर्णपदकाचा मानकरी ठरल्याने यंदाच्या वाढदिवसाला या नव्या कौतुकाची भर पडल्याने रंग भरणार आहे. तुझ्याशिवाय हा कार्यक्रम होऊ तरी शकेल का ? दोन दिवस आधीच ये. आपले अन्य मित्रही येणार आहेत. फारा दिवसांनी भेटीचा सुयोग जुळून येणार आहे. सजावट-कलाकुसर हा तुझा प्रांत ! तू आलास की म्हणूनच दुधात साखर, खरं ना ! विसरू नकोस, रविवारची सायंकाळ (तारीख तुला पाठ आहेच.) खास माझ्यासाठी राखून ठेव. सवड काढून निवान्तपणे ये. खूप गप्पा-टप्पा करावयाच्या आहेत, तुझ्या समवेत मनसोक्त भटकायचं आहे.

तुझ्या आई-बाबांना आणि आजोबांना सादर प्रणाम. छोट्या हेमूला गोड पापा. आपला सीझर काय म्हणतोय ? पत्राचे उत्तर तूच समक्ष येऊन देणार आहेस, हो ना ?

तुझा मित्र,
राजू ऊर्फ शेखर.

नमुना पत्र

अभिनंदन पत्र

२१२, नारायण पेठ,
पुणे.
दि.

प्रिय सुयश,

सप्रेम नमस्कार.

परवा तुझा फोटो पेपरात पाहिला आणि मित्र म्हणून मला खूप आनंद झाला, अभिमान वाटला. तू आपलं नाव सर्वार्थानं सार्थ केलेलं पाहून तुझ्या आईवडिलांना आज धन्य धन्य वाटलं असेल, खरं ना !

राज्य पातळीवर झालेल्या स्केटिंग स्पर्धेत तू सर्वोच्च विजय नोंदवून सुवर्णपदक पटकावलंस ही खरंच तुला, शाळेला, कुटुंबीयांना आणि आम्हा मित्रमंडळींना भूषणावह वाटणारी, समाधान वाटणारी गोष्ट आहे. फोटोतला तुझा आत्मविश्वास (चेहऱ्यावर जाणवणारा) पाहून यशामागचे रहस्य कळले. तुझी जिद्द, चिकाटी, सरावासाठी तू केलेले सातत्याने परिश्रम आणि आत्मविश्वास या साऱ्यांचे गोमटे फळ म्हणजे तुझे नेत्रदीपक यश ! मी, आई-बाबा आणि छोटा राजू या सर्वांतर्फे तुझं हार्दिक अभिनंदन. आता थांबायचं नाही. 'यापुढे यशापुढे अखंड झेप घ्यायची.' हे सूत्र लक्षात ठेवून आगे बढो. सदैव यशस्वी हो. दूर असल्यानं आज शब्दभावफुले ओंजळीत घेऊन मी तुझं कौतुक करतोय. पण प्रत्यक्ष भेटीत एक छानशी भेट देणार आहे. तूर्तास पुन्हा एकदा त्रिवार अभिनंदन. तुझं सुवर्णपदक पाहयला. प्रत्यक्ष कौतुक करायला मी आई-बाबांसह लवकरच येणार आहे.

मोठ्यांस नमस्कार, लहानांस आशीर्वाद. पुढील यशासाठी शुभेच्छा. पत्र धाडशीलच. बाकी सब कुछ ठीक.

तुझा मित्र,
देवेंद्र

केवळ विचारार्थ–

नोकरीविषयक अर्ज लिहिताना पुढील क्रम लक्षात ठेवा–

(१) विषय

(२) पूर्ण नाव व पत्ता

(३) जन्मदिनांक

(४) शैक्षणिक योग्यता

(५) अन्य माहिती

(६) पूर्वानुभव (नोकरी)

(७) संधी देण्याबद्दल विनंती

(८) वर्तणूक– कामाबद्दल हमी

(९) आवश्यक प्रमाणपत्रांच्या झेरॉक्स प्रती

विविध प्रकारचे अर्ज लिहून पहा, भरपूर सराव करा.

पुढील तक्ता काळजीपूर्वक पहा, वाचा, मनन-चिंतन करा. आपल्या घरी येणाऱ्या काही पत्रांचा काळजीपूर्वक अभ्यास करा. त्यातल्या चांगल्या गोष्टी वेचून, स्मरणात ठेवून योग्य ठिकाणी उपयोगात आणा.

*

	पत्र प्राप्त करणारी व्यक्ती	संबंध	मायना	शेवट	स्वाक्षरी
१.	आई/वडील	मुलगा/मुलगी	तीर्थरूप शि. सा.न.वि.वि.	आपला / आपली तुमचा / तुमची तुझा / तुझी (आईसाठी)	घरगुती नाव
२.	वडील मंडळी, नातेवाईक	तीर्थस्वरूप सा.न. वि.वि.	आपला/ आपली		घरचं नाव
३.	लहान भाऊ/बहीण	वडील भाऊ/बहीण	चिरंजीव शुभाशीर्वाद	तुझा/तुझी	घरचं नाव
४.	मित्र	मित्र	प्रिय मित्र सप्रेम नमस्कार सस्नेह स्मृती	तुझा/तुझी	नाव
५.	संपादक	त्रयस्थ	श्री.स.न. वि. वि.	आपला/ आपली	पूर्ण नाव
६.	अधिकारी	त्रयस्थ	श्री स.न.वि. वि.महोदय, प्रणाम	आपला/ आपली नम्र-विश्वासू	संपूर्ण स्वाक्षरी
७.	कारखानदार व्यापारी संयोजक	त्रयस्थ	महोदय किंवा महाशय स.न. वि.वि.	आपला/ आपली नम्र	संपूर्ण स्वाक्षरी
८.	शिक्षक	विद्यार्थी	प.पू.गुरुवर्य सप्रेम वंदे सादर नमस्कार	तुमचा नम्र किंवा आज्ञाधारक	संपूर्ण नाव
९.	सन्माननीय व्यक्ती		माननीय सा. न.वि.वि.	आपला नम्र,	संपूर्ण नाव
१०.	अपरिचित		मान्यवर सा. न.वि.वि.	आपला/ आपली नम्र	संपूर्ण नाव

दिलेल्या नमुना प्रश्नात असलेले विविध पत्रलेखनाचे प्रश्न काळजीपूर्वक सोडवावेत म्हणजे आत्मविश्वास वाढेल.

सांत्वनपर पत्र

'मधुविहार'
१४, शिवाजीनगर,
पुणे
दि.

प्रिय विवेक,

सप्रेम नमस्कार. गेले काही दिवस मी तुझ्या पत्राची आतुरतेनं वाट पाहत होतो. निराशा होत असल्यानं जाम चिडलोही होतो. पण परवा रस्त्यात तुझी काकी भेटली होती तेव्हा तिच्याकडून तुमच्याकडची दुःखद घटना कळली. ऐकून खूप वाईट वाटलं. पंख लावून उडावं, तुझं घर गाठावं आणि तुझे डोळे पुसून तुला धीर द्यावा असं फार फार वाटलं. पण...

तुझ्या आजीला नुकतीच देवाज्ञा झाल्याचं ऐकलं मात्र, मन गलबललं. नकळत अश्रू ओघळले. दिवसभर कष्ट करून घरादाराला मदत करणारी तुझी प्रेमळ आजी डोळ्यासमोर आली आणि रडू कोसळलं. छान छान गोष्टी सांगणारी, सायीसारखा स्पर्श असलेली, नेमाने देवपूजा करणारी, हरिपाठ म्हणणारी, शेजाऱ्यांच्या अडचणीत त्यांना मदत करणारी तुझी आजी मलाही खूप खूप आवडायची. तुझ्याबरोबरच ती माझंही कौतुक करायची. दुजाभाव न करणारी तुझी आजी आता परत दिसणार नाही, भेटणार नाही या भावनेनं मनातलं दुःख तीव्र झालं. तुम्ही सर्व धीराचे आहात, खंबीर आहात. रडत न बसता आपण तिची शिकवण आचरणात आणण्याचा प्रयत्न करू या. खरं ना ! लवकरच नाताळची सुट्टी लागेल. त्या वेळी बदल म्हणून तू आमच्याकडे ये म्हणजे मनाला थोडाफार विसर पडेल. आम्ही सर्वजण तुम्हा सर्वांच्या दुःखात सहभागी आहोत, हे लक्षात असू दे. परमेश्वर मृतात्म्यास शांती देवो. तुझे सांत्वन करायला माझे शब्द तोकडे आहेत. बाकी सर्व भेटी अंती.

तुझा मित्र,
शेखर.

अनुपस्थितीबद्दल शिक्षकांना पत्र

४/९, सदाशिव पेठ,
पुणे
दि.

सन्माननीय अध्यापक,
वर्गशिक्षक इ. ७ वी ड
पुणे

यांना सादर प्रणाम.

गेले काही दिवस मी थंडी-तापानं आजारी आहे. डॉक्टरांनी पूर्ण विश्रांतीचा सल्ला दिलाय. आईला दिवसभर माझी सेवा करावी लागत असल्यानं तिला शाळेत येऊन तुम्हाला भेटता येणं इच्छा असूनही अशक्य आहे. बाबांना कारखान्याच्या व्यापामुळे तुमच्याशी संपर्क साधता येत नाही. क्षमस्व. मी बिछान्यात पडलेल्या वेळी पुस्तकं वाचत असतो. सुधीर व प्रसाद नेमाने घरी येतात. काय काय अभ्यास झाला ते सांगतात. अभ्यासात मदत करतात. तुम्हीही मला भेटायला येणार आहात, असं सुधीर सांगत होता. ऐकूनही खूप खूप आनंद झाला. तुम्ही जरूर जरूर या. मी वाट पाहतोय. मला फी नसल्याने उपस्थिती जास्तीतजास्त आवश्यक आहे. केवळ अशक्तपणामुळे मी शाळेत येऊ शकत नाही. दोन-तीन दिवसांत सवड मिळताच वडील स्वतः भेटून खुलासा करतील. मेडिकल सर्टिफिकेटही देतील. बुडलेला अभ्यास मी पुन्हा पूर्ववत होताच भरून काढीन, याबद्दल मी तुम्हाला हमी देतो. तसदीबद्दल क्षमस्व. सहकार्याबद्दल धन्यवाद. माझी अनुपस्थिती कृपया मंजूर करावी, ही विनंती.

आपला नम्र विद्यार्थी
देवेंद्र

पुढील पत्रांचे मसुदे तयार करा–

(१) खेडेगावी राहणाऱ्या मित्राला पत्राद्वारे आपला सुट्टीचा कार्यक्रम कळवा.

(२) आपल्या हातून घडलेल्या चुकीबद्दल वर्गशिक्षकांना क्षमायाचना

करणारे पत्र लिहा.

(३) परगावी असणाऱ्या आपल्या आईला पत्राद्वारे वसतिगृहातील आपल्या दिनचर्येबद्दल कळवा.

(४) छोट्या भावाला पत्र लिहून व्यायामाचे महत्त्व पटवून द्या.

(५) वाढदिवसाची आमंत्रणपत्रिका तयार करा.

(६) दैनिकाच्या संपादकांना शाळेच्या स्नेहसंमेलनाचे वृत्त पत्राद्वारे कळवा.

लक्षात ठेवा—

(१) पत्रलेखकाने आपला पत्ता उजव्या हाताच्या कोपऱ्यातच लिहावा. पत्ता लिहून झाल्यावर दिनांक घालावा.

(२) कुणाला पत्र लिहावयाचे आहे ते पाहून मग योग्य मायना लिहावा.

(३) मुद्द्यांनुसार परिच्छेद पाडावेत.

(४) समारोपानंतर खाली उजव्या कोपऱ्यात पत्रलेखकाची स्वाक्षरी हवी.

*

कथालेखन

तुम्हाला गोष्ट ऐकायला, वाचायला आवडते. गोष्ट लिहिताना मात्र तुमची गाडी अडते. थोडक्यात पण मुद्देसूद कसं लिहावं, परिच्छेद कसे पाडावेत, पाल्हाळ-विस्कळीतपणा हे दोष टाळून सहजसोपी, सुटसुटीत पण आकर्षक गोष्ट कशी लिहावी, असे अनेक प्रश्न तुमच्या मनात गोंधळ निर्माण करतात. आपल्याला नाही जमणार, या भावनेनं तुम्ही नाऊमेद होता आणि प्रयत्न अर्धवट सोडून देता. इथंच तुमचं चुकतं बरं का ! काल्पनिक, स्वतंत्र गोष्ट स्वतःच्या मनानं लिहिणं तुम्हाला नाही जमणार पण ऐकलेल्या, वाचलेल्या, अनुभवलेल्या गोष्टी तुम्ही मनावर घेतलं, सतत प्रयत्न करत राहिलात, तर आपल्या शब्दात सोप्या पण रसाळ भाषेत तुम्ही नक्कीच लिहू शकाल.

गोष्ट लिहिणं ही कला आहे आणि शास्त्रही आहे. घटना, प्रसंग, संवाद, संभाषण यांतून कथा तयार होते, फुलते, पुढे सरकते. उत्कंठा, जिज्ञासा वाढवणं, पुढे काय होणार ही जाणून घ्यायची इच्छा, आतुरता शिगेला पोहोचणं आणि वाचल्यावर गोष्टीचा ठसा मनावर उमटणं ही सारी चांगल्या कथेची लक्षणं आहेत. कथा, कहाणी, गोष्ट ही आबालवृद्धांना आवडणारी ललित कलाकृती आहे. सूक्ष्म निरीक्षण, बहुश्रुतता, भरपूर वाचन, श्रवण, कल्पकता, अनुभव गाठी बांधणं या साऱ्यांच्या एकत्रित परिणामातून कथा आकार घेते, शब्दरूप धारण करते. कथा लिहिताना स्थल-कालाचं, वास्तवतेचं आणि वाचक क्षमतेचं योग्य भान ठेवायला हवं. यासाठी पुढील गोष्टी ध्यानात घेऊन मगच लिहायला हवं—

१. फाफटपसारा टाळावा.

२. पुनरुक्ती नको.

३. भरमसाट पात्रे नकोत.

४. उपकथानके नकोत.

५. विसंगती नको.

६. वाचकांच्या मनात गोंधळ निर्माण होईल अशी मांडणी नको.

यासाठी–

(१) दिलेले मुद्दे नीट वाचा.

(२) संदर्भ लक्षात घ्या.

(३) उद्दिष्ट, तात्पर्य ठरवा.

(४) पात्रे, घटना, प्रसंग, संवाद यांची मनाशी योग्य जुळणी करा.

(५) मुद्द्यांच्या आधारे कथेचा कणा, मूळ गाभा शोधा.

(६) मुद्द्यांचा क्रम, सुसंगती ध्यानात घ्या.

(७) पूर्वानुभवातून शब्द, सुविचार, प्रतिक्रिया हुडका.

(८) आकर्षक, रोचक प्रभावी शैलीचा वापर करा.

(९) लिहिण्याचा सराव करा आणि आत्मविश्वास वाढवा.

(१०) कथेच्या आकाराकडे, बांधणीकडे नीट लक्ष द्या.

(११) गोष्टीचा प्रारंभ-मध्य-शेवट यांची मनाशी निश्चिती करा.

गोष्टीचे मुद्दे–

(१) एका झाडाखाली हजामत करत बसलेला न्हावी– झाडाच्या फांद्यांवर बरीच माकडं बसलेली– न्हाव्यापाशी दाढी करायला एक खेडूत– गप्पा– माकडांचं झाडावरून पाहणं– ग्राहक चहासाठी न्हाव्याला घेऊन चहा प्यायला– माकड खालती येऊन साबण फासून दाढी– माकडाचं नाक कापतं– शिक्षा– न्हाव्याचं येणं– माकडाला हुसकावून लावणं– तात्पर्य.

(२) एक राजा– राज्य– धनदौलत– सर्व प्रकारची सुखं पायाशी लोळण घेणारी– मनातून बेचैन उदास– मंत्री, दरबारी, यांचे राजाला आनंदी करण्याचे प्रयत्न– अपयश– दवंडी पिटवणे– एक सत्पुरुष– राजाला सल्ला– सुखी माणसाचा शर्ट– शोध– एका गवळ्याची भेट– गवळी सुखी पण सदराच

नाही– राजाला सत्य कळतं– निराशा दूर– तात्पर्य.

(३) एका झाडावर कावळा– चोचीत मांसाचा तुकडा– भुकेलेला कोल्हा– झाडाखाली उभा राहून पाहणी– शक्कल लढवणे– कावळ्याची खोटी प्रशंसा– गाणं ऐकविण्याची विनंती– कावळ्याची फसगत– गाण्यासाठी चोच उघडणे– तुकडा निसटून खाली पडणे– लबाड कोल्ह्याने तुकडा हस्तगत– जाता जाता सल्ला.

(४) एक कुत्रा– भुकेलेला– शोधात– पोळीचा तुकडा– तोंडात धरून निघतो– पुलावर येतो– पाण्यात प्रतिबिंब– दुसऱ्या कुत्र्याच्या तोंडातल्या पोळीचा लोभ– भुंकतो– पोळीचा तुकडा पाण्यात– निराशा– दुःख– तात्पर्य.

(५) मधमाशी आणि कबुतर– कबुतर झाडावर– मधमाशी पाण्याच्या शोधात– प्रवाहापाशी– उडताना अचानक पडणे– कबुतर बघतो– झटकन पान तोडून पाण्यात टाकतो– मधमाशी पानावर चढते– उडून जाते– काही दिवसांनी– एक शिकारी– शिकारीच्या शोधात– कबुतरावर नेम– मधमाशी पाहते– कबुतराचे उपकार आठवून– शिकाऱ्याच्या पायाचा चावा– हात हलतो– नेम चुकतो– कबुतर उडून जाते– तात्पर्य.

आता नमुन्यादाखल एक गोष्ट लिहून पाहू या.

मुद्दे–

दोन मित्र– जंगलातून प्रवास– पुष्कळ जंगली श्वापदं– एकमेकांना मदत करायचं वचन– अचानक भलं मोठ्ठं अस्वल– घाबरगुंडी– बचावासाठी एक झाडावर– दुसरा शांतपणे जमिनीवर पडून राहतो– मेल्याचं सोंग– अस्वलाचं जवळ येणं, हुंगणं, निघून जाणं– मित्राचं झाडावरून खाली येणं– प्रश्न विचारणं– अस्वल काय म्हणालं ?– उत्तर– तात्पर्य.

१. मुद्दे काळजीपूर्वक वाचा.

२. अर्थ ध्यानात घ्या.

३. तात्पर्य शोधा.

४. शीर्षक शोधा.

५. प्रसंग रंगवा.

६. संवाद काय घडेल याबद्दल विचार करा.

खाली लिहिलेली गोष्ट वाचा. आपल्या मनातल्या गोष्टीशी पडताळून पहा.
शीर्षक– (१) दोन मित्र आणि अस्वल
(२) मित्र परीक्षा
(३) अंगावर बेतले पण–
(४) प्रसंग आला बाका
(५) नकळत कानउघडणी
(६) अद्दल

मित्राची पारख

खेड्यात राहणारे शिदबा आणि म्हादबा हे दोन जिगरी दोस्त एकदा शहरात जायला निघाले. बाजार करावा, कुस्त्या पाहाव्यात आणि परत रातच्या आत माघारी परतावं असा त्यांचा बेत होता. रमतगमत, शिळोप्याच्या गप्पा मारत दोघे निघाले शहराच्या दिशेनं. जंगलाची वाट ओलांडताना जीव मुठीत होता. हिंस्र श्वापदं वाटेत आडवी आली तर– या विचारानं दोघे थरारले. क्षणभर गांगरलेही ! पण कुठल्याही प्रसंगात एकमेकांना साथ द्यायची, असं ठरवत त्यांनी वचनही दिलं.

वचनामुळे धीर आला. पावलं वेगात पडायला लागली. इतक्यात अचानक एक भलं मोठ्ठं जंगली अस्वल त्यांच्या दिशेने येतंय असं त्यांना दिसलं. भीतीनं म्हादबाची बोबडी वळली, पाय गळाठले तरीही जीव वाचविण्यासाठी म्हादबा वचन विसरून, शिदबाला एकट्याला सोडून जवळच्या झाडावर जाऊन बसला. पुढे काय घडतंय हे श्वास रोखून पाहू लागला.

बघता बघता अस्वल जवळ आलं. शिदबा तोवर सावरला होता. प्रसंगावधान राखून स्वारी मेल्यागत पडून राहिली. अस्वलाचं धूड जवळ आलं, हुंगू लागलं, गोल गोल फिरलं तरीही शिदबा आपला हालचाल न करता पडून राहिला. शिदबाचं नशीब जोरावर होतं. काळ आला पण वेळ आली नव्हती. अचानक आलेलं अस्वल धूमकेतूसारखं अकस्मात गेलंही. अस्वल निघून

गेलेलं पाहून म्हादबाच्या जिवात जीव आला. स्वारी खाली उतरली. शिदबाच्या खांद्यावर हात ठेवत म्हादबा म्हणाला, "काय रं मर्दा, त्या अस्वलानं तुज्या कानामंदी काय काय सांगितलं ? तुला काय इजाबिजा केली न्हाय ना त्यानं ?"

म्हादबाच्या मैत्रीचं पितळ उघडं पडलं होतं. मित्रानं संकटात साथ दिली नव्हती, वचनाला तो जागला नव्हता. शिदबाचा मित्रावरचा विश्वास उडाला होता. मैत्रीला तडा गेला होता, मन दुखावलं होतं. न राहून मित्राला कानपिचकी देत धडा शिकवण्यासाठी तो उत्तरला, "लक्षात ठेव. स्वार्थी मित्रावर यापुढे विश्वास ठेवू नकोस. हा अस्वलाचा लाखमोलाचा सल्ला मी यापुढे शिरसावंद्य मानणार आहे." शिदबाचं बोलणं ऐकून म्हादबा कानकुंडा झाला. त्याचे डोळे खाडकन उघडले. चूक उमगली, पण– इतक्या वर्षांच्या मैत्रीला जणू सुरुंग लागला. प्राण वाचविण्याच्या घाईत प्राणप्रिय मित्र मात्र कायमचा दुरावला.

तात्पर्य–

१. संकटकाळीही मित्राला धीर देत पाठीशी राहणं, मैत्रीला जागणं हेच खरं मित्रप्रेम, हेच खरं कर्तव्य.

२. विचारपूर्वक कृती करा. कृती करून पस्तावू नका.

३. दिलेले वचन प्राणपणाने पाळा.

*

शीर्षकावरून गोष्ट

तुम्ही मुलं गोष्टीवेल्हाळ असता. गोष्टी ऐकायला तुम्हाला मनापासून आवडतं. खरं ना ! पण ऐकलेल्या गोष्टी, वाचलेल्या गोष्टी तुम्ही आपल्या शब्दात मांडणं ही एक कला आहे. मुद्द्यांवरून गोष्ट लिहिताना गोष्टीचा सांगाडा समोर असल्यानं त्याच्या आधारे गोष्ट खुलवणं, फुलवणं तुम्हाला जमू शकतं. पण दिलेल्या शीर्षकावरून गोष्ट लिहिण्यासाठी तुम्हाला भरपूर गोष्टी ठाऊक हव्यात. त्यातले घटना-प्रसंग-तात्पर्य तुम्हाला आठवायला हवे. तरच तुम्ही दिलेल्या शीर्षकावरून मुद्दे, पात्रे, घटना, प्रसंग, संवाद, तात्पर्य हे सारे आखणी, जुळणी करून मांडू शकता. नेमक्या शब्दांत लिहू शकता. पण यासाठी तुम्ही भरपूर वाचन करायला हवं. लिहिण्याचा सराव करायला हवा. पुढील गोष्टी वाचा, विचार करा, अनुभवा, ध्यानात ठेवा, कृतीत उतरवा.

(१) शीर्षक वाचा, त्यातून सूचित अर्थ ध्यानात घ्या. पूर्वानुभवाशी तो पडताळून पहा.

(२) मनन-चिंतनाच्या आधारे कथेचा कच्चा आराखडा मनाशी तयार करा.

(३) प्रसंगांची संगतवार, क्रमवार जुळणी करा.

(४) पात्रांची संख्या, त्यांचे स्वभावविशेष, त्यांच्या प्रतिक्रिया यांची निश्चिती करून मांडणी करा.

(५) पात्रे काल्पनिक असल्याने त्यांच्यातील संवादही तसेच असायला हवेत. पण वाचणाऱ्याला मात्र ती पात्रे खरी, आसपास वावरणारी, परिचयाची वाटायला

हवीत. मांडणीतल्या नावीन्यामुळे, कल्पकतेमुळे आकर्षकता, उत्सुकता वाढती असायला हवी.

(६) आकर्षक सुरुवात, औत्सुक्य वाढविणारा मध्य आणि परिणामकारक शेवट या तीन गोष्टी साधण्याकडे विशेष लक्ष द्यावे.

(७) भाषा सहजसोपी, रसाळ, प्रसंगानुरूप अलंकारिक असावी.

(८) संवाद खटकेबाज, सुटसुटीत, नेमके-नेटके आणि प्रभावी, नाट्यपूर्ण असावेत. मात्र त्यात नाटकीपणा-बेगडीपणा नसावा.

पुढील शीर्षके वाचा आणि त्यावरून समर्पक गोष्टी लिहिण्याचा भरपूर सराव करा–

१. अति तिथे माती
२. खरा मित्र
३. लोभाचे फळ
४. एकीचे बळ
५. बळी तो कान पिळी
६. गर्वाचे घर
७. शक्तिपेक्षा युक्ती
८. करावे तसे भरावे
९. रूपापेक्षा गुण प्यारे
१०. प्रयत्नांती परमेश्वर
११. मित्रप्रेम
१२. कुसंगत म्हणजे विनाश
१३. श्रमाचे महत्त्व
१४. सत्याचा विजय
१५. देव तारी तया
१६. खरे सुख
१७. बंधुप्रेम
१८. बहिणीची माया
१९. खरी संपत्ती
२०. न्याय

उदाहरणार्थ–

कुसंगत म्हणजे विनाश

हे शीर्षक दिले आहे. याच्या आधारे आपल्याला गोष्ट फुलवायची, खुलवायची, शब्दांकित करायची आहे. हे करण्यासाठी पुढील पूर्वतयारी करा.

(१) शीर्षक दोनदा-तीनदा वाचा.

(२) पूर्वानुभवावरून हा मथितार्थ असलेल्या, हे तात्पर्य सांगणाऱ्या गोष्टी आठवा.

(३) त्यांतली जास्त आवडलेली गोष्ट निवडा.

(४) कल्पना, विचार यांच्या आधारे सुसंगत मुद्दे क्रमवार जुळवा.

(५) पात्रे, संवाद, मांडणी, घटना, प्रसंग निश्चित करा.

(६) भाषा, शब्द, वाक्प्रचार, सुभाषित या साऱ्यांचा सुरेख मेळ कसा साधावयाचा, याचा मनाशी विचार करा, आढावा घ्या.

(७) प्रारंभ-मध्य-शेवट यांत आकर्षकता, नेमकेपणा, नेटकेपणा आणि कथनात सहजता, रसाळपणा कशी आणता येईल याचा सर्वंकष विचार करा अन् मग लेखणी उचला.

तुम्ही म्हणाल, परीक्षेच्या पेपरात लिहिताना तारेवरची कसरत करावी लागते, वेळ अपुरा पडतो. यातून हे कसे जमायचे ? हे आयत्या वेळी जमणार नाही, हे एकदम मान्य, पण आकलन आणि अभिव्यक्ती या प्रक्रिया बहुश्रुतता, वाचन, लेखनसराव, आवृत्ती यांतून सुकर होतात, सहजतेने घडू शकतात. वेगवेगळी शीर्षके निवडून, विचार करून, मुद्दे मांडून जुळणी करण्याचा, शब्दांकित करण्याचा भरपूर सराव करा. एकदा अभिव्यक्तीचा आवाका आला की आत्मविश्वास वाढता राहील आणि मग तुम्हीही छान छान गोष्टी सुलभपणे, सहजतेने लिहू शकाल. अनुभव घ्या, पडताळून घ्या आणि लिहिते व्हा.

या शीर्षकावरून पुढील मुद्दे सुचतील—

• एक शिक्षक— कष्टाळू, प्रामाणिक— शाळेत जाणारा— मुलगा— कुसंगत— दुर्वर्तन— चिंता— विनाशापासून कसे वाचवावे हा प्रश्न— मुलाला घेऊन बाजारात फेरफटका— उत्तम प्रतीचे आंबे खरेदी— एक डागाळलेला— दोन दिवसांनी पाहणी— बाकीचे आंबे खराब— मुलाला प्रश्न विचारतात— प्रत्यक्ष अनुभवातून मुलाला पटते— नासक्या आंब्यामुळे बाकीचे आंबे खराब— तात्पर्य.

• लबाड कोल्हा— मूर्ख भोळसट गाढव— मैत्री— काकडी खायला शेतात— शेताची नासाडी— चाहूल — शेतकरी काठ्या घेऊन धावत— लबाड कोल्हा पलायन— बिचाऱ्या गाढवाला खरपूस मार— कायमचे पांगळेपण— धडा.

मुद्द्यांच्या आधारे घटना-प्रसंग-संवाद-पात्रयोजना हा सारा मालमसाला वापरून तुम्हीही छान गोष्ट लिहू शकाल, खरं ना !

जरूर तिथे वाक्प्रचार, म्हणी वापरा. संवाद खटकेबाज असले तर 'अधिकस्य अधिकं फलम्'.

परिशिष्ट

इयत्ता ५ वी ते ७ वी साठी

क्रम निबंधाचे विषय

१. माझे बाबा
२. माझे आजोबा
३. माझा लहान भाऊ
४. आमचा दादा
५. पांडू– घरगडी
६. आमचे फॅमिली डॉक्टर
७. माझी शाळा
८. आमची प्रयोगशाळा
९. माझा चित्रकलेचा तास
१०. माझे आवडते खेडेगाव
११. निसर्गात चला
१२. मला पंख मिळाले तर !
१३. मी शिक्षणमंत्री झालो तर !
१४. दप्तर बोलू लागले–
१५. माझे पहिले भाषण
१६. माझी पहिली सहल
१७. प्रवासातल्या गमतीजमती
१८. माझा आवडता खेळ
१९. मी पुढारी झालो तर !
२०. मी नाटक करतो
२१. मी पोहायला शिकतो

२२. आमची क्रिकेट टीम
२३. आमची गाजलेली मॅच
२४. माझा आवडता लेखक
२५. माझे आवडते पुस्तक
२६. आमचा टिपू
२७. झोपडपट्टीच्या व्यथा
२८. आम्ही चालवू हा पुढे वारसा
२९. रक्षाबंधन
३०. मी अदृश्य झालो तर !
३१. मी जादूगार झालो तर !
३२. माझा प्रिय देश
३३. मुलांचे लाडके नेहरूचाचा
३४. मी पाहिलेला अपघात
३५. वीज नसती तर !
३६. आमची मनी
३७. अविस्मरणीय प्रसंग
३८. एस.टी. स्टँडवर एक तास
३९. माझा एस.टी. चा प्रवास
४०. मी सत्कर्म करतो
४१. आला श्रावण श्रावण
४२. नको तो उन्हाळा
४३. मी एक आदर्श विद्यार्थी
४४. मी शाळा बोलतीय
४५. शाळा सोडताना
४६. सह्याद्री बोलू लागला !
४७. फाटके पुस्तक बोलू लागले !
४८. अपंगाचे मनोगत
४९. अशी घडो देशसेवा
५०. साक्षरता : एक अभियान

५१. आदर्श विद्यार्थी
५२. बस कंडक्टर बोलू लागला !
५३. एस.टी. बंद पडते तेव्हा !
५४. वसंताचे आगमन
५५. पावसातल्या गमतीजमती
५६. आमच्या घरी व्ही.सी.आर. आला !
५७. चाळीचे मनोगत
५८. जुना वाडा बोलू लागला
५९. समाजसेवा खरी ईशसेवा
६०. आमची कपिला
६१. पुण्यातील प्रेक्षणीय स्थळे
६२. नदीकाठचा देखावा
६३. सागरतीरी हिंडताना
६४. दिव्यत्वाची जेथ प्रचीती
६५. एक प्रसन्न संध्याकाळ
६६. आई नोकरी सोड !
६७. 'लापता'तला चेहरा बोलू लागला
६८. संतांची शिकवण
६९. युगपुरुष शिवाजी
७०. माय जिजाई शिवबा घडवी
७१. गणेशोत्सव आणि आम्ही
७२. बचत करा रे बचत करा
७३. चष्मा बोलू लागला
७४. काठीचे मनोगत
७५. संप आणि आम्ही
७६. नको ते बंद !
७७. नको त्या परीक्षा
७८. परीक्षेपूर्वी अर्धा तास
७९. मी व्यायाम करतो !

८०. मी एक श्रमिक
८१. जय जवान जय किसान
८२. विस्मरणाचे फायदे
८३. आई संपावर गेली तर !
८४. खेड्यात चला
८५. आमच्या घरी चोर आले तेव्हा !
८६. माझे आवडते वर्तमानपत्र
८७. मी लावलेला गुलाब
८८. माझा वाढदिवस
८९. मी उपवास करतो !
९०. पडू आजारी, मौज हीच वाटे भारी !
९१. काम करा काम, घाम गाळा घाम !
९२. गावची जत्रा
९३. माझा भाऊ हरवतो तेव्हा !
९४. महागाईचा राक्षस
९५. पाणी नसते तर !
९६. आई-बाबांचे भांडण
९७. चांदण्या रात्री
९८. मी पतंग बोलतोय !
९९. सूर्य उगवला नाही तर !
१००. संत तुकाराम
१०१. माझा विमान प्रवास !
१०२. माझे मौनाचे प्रयोग
१०३. रामदासांचा दासबोध
१०४. मी केलेला किल्ला
१०५. माझी श्रद्धास्थाने
१०६. आमच्या वर्गशिक्षिका
१०७. विज्ञानयुग आणि आपण
१०८. दानात दान रक्तदान !

१०९. गरिबी एक शाप !
११०. टेलिफोन आणि आपण !
१११. मला शास्त्रज्ञ व्हायचंय !
११२. माझा महाराष्ट्र !
११३. देश हा देव
११४. राष्ट्रभक्ताचे मनोगत
११५. स्वातंत्र्यसैनिकाची मुलाखत
११६. न कर्त्याचा वार शनिवार
११७. मी एक डहाळी
११८. मी खारोटी
११९. पक्षी घरटं बांधतो तेव्हा !
१२०. बोहारणीचे मनोगत
१२१. मी केलेला किल्ला
१२२. दिवाळी अशी साजरी करू या
१२३. माझी आवडती बाग
१२४. मामाच्या गावाला जाऊ या
१२५. मला पडलेले गमतीदार स्वप्न
१२६. मोर्चा आणि मी
१२७. आल्या, निवडणुका आल्या !
१२८. मी सुट्टी अशी घालवतो
१२९. आमची मंडई
१३०. निरोगी, सुदृढ शरीर हाच अलंकार
१३१. लहानपण देगा देवा !
१३२. बुटकेपणाचे तोटे
१३३. मी एक बालवीर
१३४. शिबिरातले अनुभव
१३५. चांगल्या सवयी अशा लावू या
१३६. आमची गंगू साक्षर झाली तर !
१३७. आमचे स्नेहसंमेलन

१३८. क्रीडामहोत्सव
१३९. मी सायकल शिकतो
१४०. माझा आवडता समाजसेवक
१४१. माझा नावडता विषय
१४२. माझे पाठांतर
१४३. माझे अवांतर वाचन
१४४. चौकाचे मनोगत
१४५. माझे आवडते वाहन
१४६. माझी खोली
१४७. माझा पहिला इंटरव्ह्यू
१४८. माझे रडे मित्र
१४९. मित्र असावा तर असा !
१५०. फटाके बोलू लागले
१५१. फिरत्या विक्रेत्याचे मनोगत
१५२. मी हातगाडी बोलतेय !
१५३. खुर्ची बोलू लागली !
१५४. देव भेटला तर
१५५. मला लॉटरी लागली तर
१५६. भिकाऱ्याचे मनोगत
१५७. मी एक उपेक्षित
१५८. माझा थापाड्या मित्र
१५९. जीवनात विनोद असावा
१६०. माणूस माझे नाव !
१६१. तुफान होते तेव्हा !
१६२. दुष्काळ आणि आपण
१६३. हॉटेलमधल्या पोऱ्याचे मनोगत
१६४. माझ्या नावडत्या गोष्टी
१६५. माझी परसबाग
१६६. मी झोपाळा बोलतोय !

१६७. सुंदर, स्वच्छ शहर
१६८. लोकल बंद पडते तेव्हा !
१६९. मला भेटलेल्या अविस्मरणीय व्यक्ती
१७०. माझी आवडती टी.व्ही. मालिका
१७१. डोळे येतात तेव्हा !
१७२. प्रदर्शनात एक तास !
१७३. माझा आवडता पक्षी
१७४. माझा आवडता प्राणी
१७५. दैव जाणले कुणी !
१७६. माझे फसलेले प्रयोग
१७७. माझे रिकामपणाचे उद्योग
१७८. मी आणि करमणूक
१७९. माझी विद्यार्थिदशा
१८०. मित्रांनो, स्वावलंबी व्हा !
१८१. ओले हिरवे दिवस
१८२. जंगलचा राजा सिंह
१८३. आपले वनमित्र
१८४. माझा आवडता क्रिकेटवीर
१८५. खेळ आणि खेळाडू
१८६. मला आवडलेला गमतीदार प्रसंग
१८७. पाखरांपासून शिकू या
१८९. राजा केळकर वस्तुसंग्रहालय
१९०. वासरू बोलू लागलं !
१९१. कल्पकता एक वरदान !
१९२. श्यामच्या शब्दात 'आई'
१९३. पाळीव प्राण्यांची कैफियत
१९४. मी एक निर्झर !
१९५. जनावरांच्या इस्पितळात एक तास
१९६. छान किती दिसते फुलपाखरू

REFBK-0026569

१९७. इतिहासातला एक
अविस्मरणीय प्रसंग
१९८. जय जय महाराष्ट्र माझा
१९९. निसर्गाची रंगपंचमी
२००. एक थोर शास्त्रज्ञ (भारतीय)
२०१. संत गाडगेबाबा
२०२. छंद हेच जीवन
२०३. संतांची कामगिरी
२०४. पुतळे बोलू लागले तर !
२०५. मी पाहिलेली आग
२०६. मी पोस्टमन
२०७. नको तो फोन
२०८. विनासहकार नाही उद्धार
२०९. साने गुरुजी असे होते !
२१०. सैनिक माझे नाव !
२११. (पानशेत) धरण फुटते तेव्हा !
२१२. नाते बहीणभावाचे
२१३. देव नाही देवळात
२१४. देवळातले देव बोलू
लागले तर !
२१५. अशी मुंबईची तऱ्हा न्यारी !
२१६. मी एक समाधी
२१७. माणूस माझे नाव,
माणूस माझी जात !
२१८. प्रिय माझी जन्मभूमी
२१९. संघटन एक शक्ती
२२०. आमचे शिबिर
२२१. वाघोबा बोलू लागले–
२२२. मला भेटलेले विसरभोळे–
२२३. मी एक मधमाशी
२२४. पायवाटेचं मनोगत
२२५. वठलेला वृक्ष म्हणाला–
२२६. सूर्य उगवला नाही तर !
२२७. माझा आवडता विषय
२२८. गणवेषाचे महत्त्व
२२९. लहानपणचे तोटे
२३०. मैदान बोलू लागले !
२३१. माझी आवडती कविता
२३२. आमच्या शाळेचा शिपाई
२३३. रविवारचा दिवस
२३४. माझा धडपड्या मित्र
२३५. माझा लोकलचा प्रवास
२३६. आदर्श बालवीर
२३७. असे असावेत पाहुणे

*

निबंध लेखन : एक प्रयत्नसाध्य कला

निबंध लेखनाचे शास्त्र, तंत्र असले तरीही निबंध लेखन ही एक सहजसुंदर पण प्रयत्नसाध्य कला आहे. 'भावको अपना बनाकर सबका बना देना' (गुरुदेव टागोर) हे तिचं सारगर्भ उद्दिष्ट आहे. सहजसुंदर भाषा, नेटके शब्द, नेमके विचार, यातून साकारणारा आकर्षक, प्रभावी निबंध तुम्ही - आम्हीही लिहू शकतो. कल्पनेची भरारी, अनुभवांची समृद्धी, विचारशक्तीला गती या साऱ्यांतून संभवतो **कलात्मक निबंधाचा आविष्कार.** म्हणून हवा

लेखनवसा निबंधाचा

उन्मेष प्रकाशन